



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार १६ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# महानगरपालिका निवडणुकांचा बिगुल वाजला

## मुंबईसह 29 महापालिकांसाठी 15 जानेवारीला मतदान, 16 जानेवारीला निकाल

**मुंबई/प्रतिनिधी :** बृहन्मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान; तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २२७ जागांसह २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. या सर्व महानगरपालिकांच्या क्षेत्रांत आचारसंहिता लागू झाल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत केली.


येथील सह्याद्री अतिथिगृहात महानगरपालिका निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यावेळी उपस्थित होते. वाघमारे यांनी सांगितले की, सर्व महानगरपालिकांची निवडणूक प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या आधीन राहून राबविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीची अधिसूचना १६ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांची अधिसूचना १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. अधिसूचना प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया संबंधित महानगरपालिका आयुक्त आपापल्या स्तरावर पार पाडतील. सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल.

**जातवैधता पडताळणीबाबत-** राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छिणा-या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. जात प्रमाणपत्र असेल; परंतु जातवैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास जात पडताळणी समितीकडे जातवैधता (पान २ वर)



### महत्वाच्या तारखा

- नामनिर्देशनपत्र स्वीकारणे- २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५
- नामनिर्देशनपत्रांची छाननी - ३१ डिसेंबर २०२५
- उमेदवारी माघारीची अंतिम मुदत- ०२ जानेवारी २०२६
- निवडणूक चिन्ह वाटप- ०३ जानेवारी २०२६
- अंतिम उमेदवारांची यादी- ०३ जानेवारी २०२६
- मतदानाचा दिनांक- १५ जानेवारी २०२६
- मतमोजणीचा दिनांक- १६ जानेवारी २०२६



### महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणीदेखील महानगरपालिकेच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला महानगरपालिका कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक असेल. त्याचबरोबर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी कायदा व सुव्यवस्थेसंदर्भातदेखील आदेश निर्गमित केले आहेत.

### बहुसदस्यीय पद्धत

बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणतः चार जागा असतील काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने किमान ३ ते ५ मते देणे अपेक्षित असेल.

### नामनिर्देशनपत्रे ऑफलाईनने

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे दाखल करण्याची सुविधा राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेली आहे; परंतु विविध राजकीय पक्ष आणि नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांतील उमेदवारांची मागणी लक्षात घेउन महानगरपालिका निवडणुकीत पारंपरिकरीत्या ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील.

### महानगरपालिकांची नावे

राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी जालना आणि इचलकरंजी या २ नवनिर्मित महानगरपालिका आहेत. ५ महानगरपालिकांची मुदत २०२० मध्ये संपली आहे. सर्वाधिक १८ महानगरपालिकांची मुदत २०२२ मध्ये संपली होती; तर ४ महानगरपालिकांची मुदत २०२३ मध्ये संपली आहे. मुदत समाप्तीची महानगरपालिकानिहाय तारीख अशी: छत्रपती संभाजीनगर: २७ एप्रिल २०२०, नवी मुंबई: ०७ मे २०२०, वसई- विरार: २८ जून २०२०, कल्याण-डोंबिवली: १० नोव्हेंबर २०२०, कोल्हापूर: १५ नोव्हेंबर २०२०, नागपूर: ०४ मार्च २०२२, बृहन्मुंबई: ०७ मार्च २०२२, सोलापूर: ०७ मार्च २०२२, अमरावती: ०८ मार्च २०२२, अकोला: ०८ मार्च २०२२, नाशिक: १३ मार्च २०२२, पिंपरी- चिंचवड: १३ मार्च २०२२, पुणे: १४ मार्च २०२२, उल्हासनगर: ०४ एप्रिल २०२२, ठाणे: ०५ एप्रिल २०२२, चंद्रपूर: २९ एप्रिल २०२२, परभणी: १५ मे २०२२, लातूर: २१ मे २०२२, भिवंडी- निजामपूर: ०८ जून २०२२, मालेगाव: १३ जून २०२२, पनवेल: ९ जुलै २०२२, मीरा-भाईंदर: २७ ऑगस्ट २०२२, नांदेड- वाघाळा: ३१ ऑक्टोबर २०२२, सांगली- मीरज- कुपवाड: १९ ऑगस्ट २०२३, जळगाव: १७ सप्टेंबर २०२३, अहिल्यानगर: २७ डिसेंबर २०२३, धुळे: ३० डिसेंबर २०२३, जालना: नवनिर्मित आणि इचलकरंजी: नवनिर्मित.

## ‘मोदी तेरी कब्र खुदेगी’

### ■ काँग्रेसच्या घोषणाबाजीवर भाजपाचा संताप ■ लोकसभा-राज्यसभेत खडाजंगी!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आणि विरोधक अनेक मुद्द्यांवर आमने-सामने आल्याचं पाहायला मिळालं. यंदाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राहुल गांधी, अमित शाह, प्रियांका गांधी, सुप्रिया सुळे अशा नेतेमंडळींच्या भाषणांमुळे निवडणूक आयोगाच्या



कारभारावर आक्रमक चर्चा पाहायला मिळाली. आता दुस-या आठवड्याची सुरु वातदेखील दोन्ही बाजूच्या नेत्यांची आक्रमक भूमिका आणि शून्य प्रहरात सभागृह तहकूब करण्याची वेळ या घडामोडींनी झाली. आणि याला कारणीभूत ठरली काँग्रेसच्या एका सभेतली घोषणाबाजी !लोकसभेत संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेचं कामकाज सुरू होताच काँग्रेसच्या एका सभेतील घोषणाबाजीचा मुद्दा उपस्थित केला. या सभेत सदर घोषणाबाजीवेळी काँग्रेसचे सर्व शीर्षस्थ नेते उपस्थित होते, असा दावादेखील किरेन रिजिजू यांनी केला. किरेन रिजिजू यांनी काँग्रेसनं माफी मागण्याची मागणी करतानाच रविवारी झालेल्या एका घोषणाबाजीचा संदर्भ दिला. आम्ही या सभागृहाचे सदस्य आहोत. आम्ही एकमेकांचे विरोधी आहोत, शत्रू नाही. २०१४ मध्ये जेव्हा भाजपाच्या एका खासदाराने विरोधकांबबाच (पान २ वर)

## नितीश कुमारांनी भर कार्यक्रमात महिलेचा हिजाब ओढला

**पाटना/वृत्तसंस्था :** बिहारमध्ये नुकतेच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महागठबंधनला अभूतपूर्व यश मिळाले. निवडणूक जिंकल्यानंतर आता संयुक्त जनता दलाचे नितीश कुमार पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसले आहेत. त्यांची सध्या भाजपासोबत युती आहे. बिहारच्या मुख्यमंत्रिपदावर बसलेले नितीश कुमार हे नेहमीच चर्चेत असतात. अनेकदा त्यांची काही विधानं चांगलीच वादग्रस्त ठरतात. तर कधी- कधी त्यांनी केलेल्या एखाद्या कृतीचीही तेवढीच चर्चा होत आहे. सध्या मात्र नितीश कुमारच्या एका कृत्यावर संताप व्यक्त केला जात आहे. बिहारमधील



विरोधकांनी नितीश कुमार यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. त्यांनी एका मुस्लीम महिला डॉक्टरने लावलेला हिजाब स्वतःच्या हातांनी काढला आहे. मिळालेल्या माहितीनुसार नितीश कुमार यांनी सोमवारी एकूण १२८३ आयुष डॉक्टरांना नियुक्तीपत्र दिले. त्यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात नितीश कुमार यांनी काही डॉक्टरांना मंचावर बोलवून नियुक्तीपत्र सोपवले. यामध्ये नुसरत परवीन या मुस्लीम महिला (पान २ वर)




## जालन्यातील नराधमाला फाशीच

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात २०१२ साली एका दोन वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार आणि हत्या केल्याप्रकरणी फाशीची शिक्षा सुनावलेल्या एका आरोपीची दयेची याचिका राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी फेटाळली असून २०२२ रोजी राष्ट्रपतिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर मुर्मू यांनी फेटाळलेली ही तिसरी दयेची याचिका आहे. आरोपीचे नाव रवी अशोक घुमारे, असे असून त्याने ८ मार्च २०१२ रोजी दोन वर्षाच्या मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून तिच्यातर बलात्कार केला आणि नंतर तिची हत्या केली होती. ही घटना जालना शहरात इंदिरानगर भागात घडली होती. या घटनेनंतर १६ सप्टेंबर २०१५ रोजी घुमारे याला स्थानिक न्यायालयाने त्याच्या नृशंस कृत्याबद्दल (पान २ वर)



**२ वर्षीय मुलीवर बलात्कार प्रकरण राष्ट्रपतींनी फेटाळली दयेची याचिका**










जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पैशाच्या जोरावरची गर्दी, कमळाच्या झेंड्याचा अवमान

## ■ यवतमाळमध्ये महाबली खली व भाजपचा रोड शो की बनावट शक्तिप्रदर्शन?

## ■ ग्रेट खलीला पाहण्याकरिता बघ्यांची मोठी गर्दी





**यवतमाळ/प्रतिनिधीः-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ शहरातील प्रचाराने आता कडेलोट गाठला असून, भारतीय जनता पार्टीकडून करण्यात आलेल्या प्रचार पद्धतीवर तीव्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भाजपच्या अधिकृत उमेदवार तथा आदिवासी मंत्री व चंद्रपूरचे पालकमंत्री अशोक उईके यांच्या कन्या प्रियदर्शनी अशोक उईके यांच्या प्रचारासाठी सोमवारी (दि. १५ डिसेंबर) जगप्रसिद्ध पैलवान महाबली खली यांचा शहरातून भव्य रोड शो काढण्यात आला.

खली यांच्या नावामुळे शहरात उत्सुकतेचे वातावरण असले तरी या रोड शोमागील वास्तव मात्र प्रचारापेक्षा पैशाच्या जोरावर उभे केलेले बनावट शक्तिप्रदर्शन असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले.

या रोड शोमध्ये कॉलेजमध्ये शिकणाऱ्या तरुणांसह मोठ्या संख्येने दुचाकीस्वार तरुण सहभागी झाले होते. मात्र ही गर्दी पक्षाच्या विचारधारेतून नव्हे, तर मोबदल्याच्या आमिषातून जमविण्यात आल्याची चर्चा उघडपणे सुरू होती. रोड शो संपल्यानंतर स्थानिक पोस्टल ग्राउंड येथे दुचाकीस्वार तरुणांनी आपापल्या गटा नुसार वाहनांच्या रांगा लावून पक्षाचा अधिकृत पदाधिकारी यांच्याकडे हिशोब दिल्याचे दृश्य अनेक नागरिकांच्या नजरेत आले. प्रत्येक गाडी आणि प्रत्येक तरुणाचा स्वतंत्र हिशोब मांडण्यात आल्याने ही गर्दी स्वयंस्फूर्त नसून भाडोत्री असल्याचा संशय अधिक गडद झाला.येथे एक विशेष बाब लक्षात आली ती म्हणजे कमळाचा झेंडा रस्त्यावर, मैदानाच्या अनेक भागात फेकण्यात आले तसेच भाडोत्री कार्यकर्त्यांकडूनच झेंड्याचा अवमान सुद्धा यावेळी झाला आहे. प्रचारासाठी देण्यात आलेले भाजपचे कमळ चिन्ह असलेले झेंडे रोड शो संपताच या तरुणांनी अक्षरशः रस्त्यावर फेकून दिले. समता मैदान परिसरात अनेक ठिकाणी हे झेंडे खाली पडलेले दिसून आले. काही ठिकाणी त्यावर पाय देण्यात आले, तर काही ठिकाणी उघडपणे त्यांचा अपमान झाल्याचे दृश्य होते.

दिल्लीपासून गागागागात कमळाचा झेंडा सन्मानाने मिरवणाऱ्या पक्षाच्या प्रचारातच असा अवमान होणे, ही बाब भाजपसाठी आत्मचिंतनाची वेळ असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे मैदानामध्ये उपस्थित असलेल्या सामान्य नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले की विकासाचा अजेंडा हरवला असून सेलिब्रिटींचा आधार घेऊन निवडणूक जिंकण्याचे स्वप्न अशोक उईके पाहत आहे.त्यांनीप्रियदर्शनी उईके यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री यांच्या सभेनंतर आता थेट महाबली खली यांना शहरात आणले. मात्र नागरिकांचा प्रश्न साधा आहे. खली दाखवून शहराला विकासाचा कोणता नारा देण्यात आला?खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यांवरून रोड शो काढताना, 'आता खलीला शहरात फिरवून आणखी खड्डे पाडणार का?' असा टोमणाही अनेक नागरिकांकडून लावण्यात आला.या प्रचारात काही अल्पवयीन तरुणांचाही वापर झाल्याचा आरोप होत असून, निवडणूक आचारसंहितेच्या दृष्टीने हा गंभीर मुद्दा मानला जात आहे. निवडणूक जिंकण्याचा अजेंडा जरी असला, तरी पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचे काम पक्षातीलच व्यवस्थापन करत असल्याचे चित्र यानिमित्ताने समोर आले आहे.मोठमोठ्या हस्तींना बोलावून, पैशाच्या जोरावर गर्दी जमवून नागरिकांना भ्रमित करण्याचा हा प्रयत्न तर नाही ना? खरा विकास आराखडा कुठे आहे? हे प्रश्न आता यवतमाळच्या चहाच्या टपऱ्यांपासून चौकाचौकात चर्चेचा विषय बनले आहेत.स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत खऱ्या विकासापेक्षा दिखाऊ शक्तिप्रदर्शनाला प्राधान्य दिले जात असल्याचे हे चित्र यवतमाळकरांसाठी विचार करायला लावणारे ठरत आहे.

पान १ व १० वरून

## महानगरपालिका निवडणुकांचा

प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा देणे आवश्यक राहील. सहा महिन्यांच्या कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यात येईल, असे हमीपत्रदेखील संबंधित उमेदवारांना द्यावे लागेल. या विहित मुदतीत म्हणजे निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या संबंधित उमेदवाराची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल.

**मतदान केंद्र आणि ईव्हीएम-** महानगरपालिका निवडणुकांसाठी ३ कोटी ४८ लाख ७८ हजार १७ मतदार असून त्यासाठी ३९ हजार १४७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्र?निक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ४३ हजार ९५८ कंट्रोल युनिट आणि ८७ हजार ९१६ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे १० हजार १११ मतदान केंद्रांसाठी ११ हजार ३४९ कंट्रोल युनिट आणि २२ हजार ६९८ बॅलेट युनिटची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**संभाव्य दुबार मतदारांबाबत दक्षता-** भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या विधानसभा मतदारसंघाच्याच मतदार याद्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरल्या जातात. संबंधित कायद्यांतील तरतुदींनुसार राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित करून, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या याद्या महानगरपालिका निवडणुकांसाठी प्रभागनिहाय विभाजित केल्या आहेत. या याद्यांतील नावे वगळण्याचा किंवा नव्याने नावे समाविष्ट करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही; परंतु त्यातील दुबार नावांबाबत मात्र राज्य निवडणूक आयोगाने पुरेपूर दक्षता घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झाल्या आहेत. मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी २० डिसेंबर २०२५ रोजी; तर मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या २७ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. मतदार याद्यांतील संभाव्य दुबार मतदारांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने सर्व संबंधित महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिका-यांना सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त त्यांच्या स्तरावर कार्यवाही करीत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने संभाव्य दुबार मतदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली (अप्लिकेशन) विकसित केली आहे. इतरही महानगरपालिकांनी विविध तंत्रांचा वापर करून संभाव्य दुबार नावांबाबत दक्षता घेतली आहे. महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर (।।) असे चिन्ह नमूद करण्यात आले आहे. असे मतदार कुठल्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहेत, याबाबत त्यांना आवाहन करण्यात आले. घरोघरी जाउनही त्यांची पडताळणी केली आणि त्यांच्याकडून असा मतदार कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज भरून घेण्यात आला आहे. त्याने नमूद केलेले मतदान केंद्र वगळता त्यास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही; परंतु काही कारणाने असा अर्ज भरून घेतला नसल्यास संभाव्य दुबार नाव असलेला मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून त्याने इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत किंवा करणार नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. त्याचबरोबर त्याची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्याची मुभा देण्यात येईल.

**मताधिकार मोबाईल ॲप-** महानगरपालिका निवडणुकांसाठीच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव, मतदान केंद्र आणि उमेदवारांविषयी माहिती जाणून घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने मताधिकार हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे. ते सध्या फक्त गुगल प्ले स्टोअरवरून डाउनलोड करता येईल. या ॲपद्वारे मतदाराचे नाव शोधण्यासाठी मतदाराला दोन पर्याय उपलब्ध आहेत. त्यानुसार मतदाराचे संपूर्ण नाव किंवा मतदार ओळखपत्राचा (EPIC) क्रमांक नमूद करून मतदार यादीतील नाव शोधता येईल. त्यानंतर जिल्हा आणि महानगरपालिकेच्या नावाची निवड केल्यानंतर आपले नाव दिसेल. याच ॲपच्या माध्यमातून आपले मतदान केंद्राचे ठिकाणही कळू शकेल. त्याचबरोबर आपल्या प्रभागातील उमेदवाराविषयी अधिक माहितीदेखील जाणून घेता येईल. मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://mahasecvoterlist.in/ हे संकेतस्थळदेखील उपलब्ध करून दिले आहे. त्यातील सर्च नेम इन व्होटर लिस्ट वर क्लिक करून ॲपप्रमाणे नाव किंवा मतदार ओळखपत्राचा (EPIC) क्रमांक नमूद करुन नाव शोधता येईल.

**मतदार जागृती-** महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मतदार जागृती करण्याचे आदेश सर्व महानगरपालिका आयुक्तांना दिले आहेत. पारंपरिक प्रसारमाध्यमांबरोबरच नवीन माध्यमांचा कौशल्यपूर्ण वापर करण्याबाबत आयोगाने १२ जून २०२५ रोजी पत्राद्वारे सर्वांना निर्देश दिले आहेत. त्याबाबत वेळोवेळी आढावाही घेण्यात आला आहे. मतदार जागृतीसंदर्भातील सर्व सूचना व निर्देश मार्गदर्शक स्वरुपात असून, स्थानिक पातळीवर काही नावीन्यपूर्ण उपक्रम सुचल्यास तेही आपापल्या स्तरावर राबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या पातळीवरूनही समाजमाध्यमांसह विविध माध्यमांसह विविध माध्यमांद्वारे मतदार जागृती करण्याचा प्रयत्न असेल. विशेषतः बृहन्मुंबईसह मोठ्या महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये अधिक प्रमाणात मतदार जागृतीवर भर देण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने महानगरपालिका स्तरावर नियोजन केले जाईल.

**ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगासाठी-** मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्या बाळासह असणा-या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य दिले जाईल. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रावर कायमस्वरुपी रॅम्पची व्यवस्था नसल्यास तात्पुरती सुविधा उभारली जाईल. व्हिलचेअरचीही व्यवस्था असेल. मतदान केंद्रावर विजेची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची, सावलीची सुविधा, शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. सर्व मतदान केंद्रांमध्ये किमान सुविधा असणे आवश्यकच असेल; परंतु याशिवाय शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्र उभारण्याचा प्रयत्न असेल. महिला मतदारांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी सर्व निवडणूक अधिकारी- कर्मचारी व पोलीस कर्मचारी महिला असतील, असे मतदान केंद्र पिंक मतदान केंद्र म्हणून ओळखले जाईल. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल दूरध्वनी नेण्यास बंदी असेल.

**मनुष्यबळाची व्यवस्था-** महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी २९० निवडणूक निर्णय अधिकारी आणि ८७० सहायक निवडणूक निर्णय अधिका-यांची आवश्यकता असून, त्याची पूर्तता करण्यात आली आहे. साधारणतः १ लाख ९६ हजार ६०५ इतक्या निवडणूक अधिकारी कर्मचा-यांची गरज भासेल, तीदेखील व्यवस्था झाली आहे. आवश्यक तेवढ्या मनुष्यबळाच्या उपलब्धतेबाबत महसूल विभागीय आयुक्त आणि सर्व महानगरपालिका आयुक्त यांना वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत; तसेच त्यासंदर्भात वेळोवेळी संबंधितांच्या बैठकाही घेण्यात आल्या आहेत.

**प्रचार समाप्तीनंतर जाहिरातींना बंदी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचार समाप्तीसंदर्भात संबंधित विविध अधिनियमांमध्ये वेगवेगळ्या तरतुदी आहेत. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि समाजमाध्यमांसह कुठल्याही माध्यमाद्वारे प्रचारविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येत नाहीत. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २७अअ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४) अन्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठीच्या मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर प्रचारावर निर्बंध असतात. त्यामुळे १५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मतदानाची वेळ संपत असल्याने १४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जाहीर प्रचाराची समाप्ती होईल. त्यामुळे १४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० नंतर जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारणसुद्धा करता येणार नाही.

**माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती-** महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच संबंधित महानगरपालिका आयुक्त आपल्या स्तरावर राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ नुसार महानगरपालिकास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करतील. महानगरपालिका आयुक्त स्वतः या समितीचे अध्यक्ष; तर महानगरपालिकेचा जनसंपर्क अधिकारी सदस्य सचिव असेल. ही समिती प्रचारविषयक इलेक्ट्रानिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी/ प्रकरणांची चौकशी, त्यांचे निराकरण; तसेच विविध प्रसारमाध्यमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि देखरेख करेल. राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर आयोगाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती कार्यरत असेल.

**प्रसारमाध्यम प्रतिनिधींना प्रवेशिका-** राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ च्या परिच्छेद २० नुसार संबंधित महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावरून प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रावरील प्रवेशासाठी प्रवेशिका दिल्या जातील. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्याच स्तरावरून प्रवेशिका देण्यात येतील.

**राजकीय पक्षांशी वेळोवेळी संवाद-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वेळोवेळी राजकीय पक्षांशी संवाद साधण्यात आला आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या आतापर्यंत तीन बैठका घेण्यात आल्या आहेत. या बैठका १४ ऑक्टोबर २०२५, ०१ डिसेंबर २०२५ आणि १२ डिसेंबर २०२५ रोजी पार पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी, बहुसदस्यीय पद्धत, विविध न्यायालयांचे आदेश, इलेक्ट्र?निक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था, ईव्हीएमसाठीच्या स्ट्राँग रूमची निगराणी इत्यादींबाबत बैठकीला उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना अवगत करण्यात आले आहे. त्यांच्या मागणीनुसार नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करावयाच्या जोडपत्र- १ आणि जोडपत्र-२ बाबत अधिक स्पष्टीकरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर मुख्य प्रचारकांची (स्टार कॅम्पेनर) संख्या २० वरून ४० करण्यात आली आहे.

**मतदार व मतदान केंद्र-** पुरुष मतदार- १,८१,९३,६६६, महिला मतदार- १,६६,७९,७५५, इतर मतदार- ४,५९६, एकूण मतदार- ३,४८,७८,०१७,एकूण मतदान केंद्र- ३९,१४७

**जागा व आरक्षित जागा-** महानगरपालिकांची संख्या- २९, एकूण प्रभाग-८९३, एकूण जागा- २,८६९, महिलांसाठी जागा- १,४४२, अनुसूचित जातींसाठी जागा- ३४१, अनुसूचित जमातींसाठी जागा- ७७, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा- ७५९

**उमेदवारांसाठी खर्च मर्यादा-** बृहन्मुंबई आणि अ वर्ग महानगरपालिका (पुणे व नागपूर)- रु. १५,००,०००/-, ब- वर्ग महानगरपालिका (पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे) - रु. १३,००,०००/-,क- वर्ग महानगरपालिका (कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छ. संभाजीनगर व वसई-विरार)- रु. ११,००,०००/-ड- वर्ग महानगरपालिका (उर्वरित सर्व १९)- रु. ०९,००,०००/-

## 'मोदी तेरी कब्र

चुकीचा शब्द वापरला होता. पंतप्रधानांनी तातडीने आपल्या खासदाराला माफी मागायला सांगितलं आणि त्या खासदारांनीदेखील माफी मागितली. पण काल काँग्रेसच्या सभेत पंतप्रधान मोदींची कबर खोदण्याची भाषा बोलली गेली. ही या देशासाठी दुःखाची बाब आहे की काँग्रेस पक्ष अशा शब्दांचा वापर करत आहे, असं किरेन रिजिजू म्हणाले. काँग्रेस पक्षाचे सर्व वरीष्ठ नेते त्या सभेला उपस्थित होते. या देशासाठी यापेक्षा लाजिरवाणी, यापेक्षा दुर्दैवी कुठली गोष्ट असू शकत नाही. देशाच्या १४० कोटी जनतेचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदींची कबर खोदण्याचा उल्लेख काँग्रेसच्या सभेत केला गेला. माझी मागणी आहे की काँग्रेसच्या शीर्षस्थ नेत्यांनी या प्रकाराबद्दल लोकसभेच्या सदनाच्या माध्यमातून देशाची माफी मागायला हव, अशी मागणी किरेन रिजिजू यांनी यावेळी केली.किरेन रिजिजू यांनी हा मुद्दा उपस्थित करताच दोन्ही बाजूच्या नेत्यांनी गोंधळ घालायला सुरु वात केली. त्यामुळे अखेर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना ११ वाजता सुरू झालेलं कामकाज पाचव्याच मिनिटाला १२ वाजेपर्यंत आणि नंतर १२ वाजता सुरू झालेलं कामकाज पुढच्या काही मिनिटांमध्येच २ वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. रविवारी दिल्लीच्या रामलीला मैदानावर काँग्रेसची जाहीर सभा झाली. या सभेला लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसचे अनेक वरीष्ठ नेते उपस्थित होते. या सभेला येणा-या कार्यकर्त्यांनी मोदी तेरी कब्र खुदेगी, आज नहीं तो कल खुदेगी, वोट चोर, गद्दी छोड अशा प्रकारच्या घोषणा दिल्याचा दावा केला जात आहे. यासंदर्भातले काही व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या व्हिडीओमध्ये काही महिला कार्यकर्त्या या घोषणा देताना दिसत आहेत.

## महिलेचा हिजाब ओढला

डॉक्टरांचाही समावेश होता. नितीश कुमार यांनी याच महिला डॉक्टरचा हिजाब हातांनी ओढला आहे. या घटनेचा व्हीडीओ सध्या सगळीकडेच व्हायरल होत असून नितीश कुमार यांच्यावर टीका केली जात आहे.

या कार्यक्रमात डॉक्टर नुसरत परवीन नियुक्तीपत्र घेण्यासाठी मंचावर गेल्या. त्यानंतर नितीश कुमार यांनी नियुक्तीपत्र देण्याआधी परवीन यांना तुम्ही डोक्यावर काय लावले आहे असे विचारले. या प्रश्नाचे उत्तर म्हणून परवीन यांनी हा हिजाब आहे असे सांगितले. त्यानंतर नितीश कुमार यांनी नियुक्तीपत्र देण्याआधी आपल्या हातांनी नुसरत परवीन यांच्या चेह-यावरील हिजाब स्वतःच्या हातांनी ओढला. त्यानंतर परवीन यांचा चेहरा दिसायला लागला. हा सर्व प्रकार पाहून परवीन थोड्याशा गोंधळल्या. तर तिथे उपस्थितांमध्ये हशा पिकला. परवीन यांचा हिजाब ओढल्यानंतर नितीश कुमार यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले.

**आरजेडीने केली सडकून टीका-** ही घटना समोर आल्यानंतर बिहारमधील राष्ट्रीय जनता दलाने संताप व्यक्त केला आहे. या पक्षाने आपल्या अधिकृत एक्स खात्यावर नितीश कुमार यांचा हा व्हीडीओ पोस्ट केला आहे. तसेच नितीश कुमार यांना नेमके काय झाले आहे, असा सवाल केलाय. नितीश कुमार आता १०० टक्के संघी झाले आहेत का? असा बोचरा प्रश्नही आरजेडीने केला आहे.

## जालन्यातील नराधमाला

फाशीची शिक्षा ठोठावली होती. ही फाशीची शिक्षा पुढे जानेवारी २०१६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवली होती. यावर घुमारे याने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असताना न्यायालयाने याचिका फेटाळत ३ ऑक्टोबर २०१२ रोजी त्याची फाशीची शिक्षा कायम ठेवली होती. फाशी कायम ठेवताना न्या. सूर्यकांत व न्या. रोहिंग्टन फली नरिमन यांनी निकालपत्रात घुमारे याच्या कृत्याला कोणतीही माफी नाही, असे स्पष्ट करत लैंगिक भूक शमवण्यासाठी सर्व नैसर्गिक, सामाजिक, कायदेशीर मर्यादा घुमारेने ओलांडल्याचे स्पष्ट केले होते. घुमारेने मुलीचे फुलण्यापूर्वीच आयुष्य निष्ठुरपणे संपविले. त्या मुलीला वडीलकीचे प्रेम, आपुलकी, संरक्षण देण्याऐवजी वासनेचा बळी बनवले. हे प्रकरण विश्वासघाताचे, सामाजिक मूल्यांच्या -हासाचे, गलिच्छ व विकृत मनोवृत्ती दर्शवणारे क्रूर प्रकरण आहे.

## भाजी बाजारात प्रॉपर्टी ब्रोकरची

आरोपींनी त्याच्याशी वाद केला आणि आपल्याजवळील चाकू काढून त्याच्या शरीरावर सपासप १३ ते १४ वार करून त्याचा खून केला. हल्ल्यानंतर पवन रक्ताच्या थारोळ्यात जमीनी वर पडला. आरोपी यानंतर तिथून पळाले. घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती नागरिकांनी खोलापुरी गेट पोलिसांना दिली. माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलीस आणि गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला आहे. मृतक पवन वानखडेचा मुलगा दिलीप वानखडे (२०) याच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात आरोपींचा शोध पोलीस घेत आहे. या घटनेमुळे परिसरात वेगवेगळ्या चर्चा आहे. परिसरात घटनेनंतर नागरिकांची बरीच गर्दी जमली होती.

## मनपा आचारसंहिता लागू होताच

चे काम बाकी आहे. मनपा निवडणुकीची आचारसंहिता घोषित होण्यापूर्वी अनेक कामांचे वर्क ऑर्डर काढले. आता प्रशासन निवडणुकीच्या कामांमध्ये व्यस्त राहणार आहे.

**प्रचारासाठी फक्त १० दिवस-** महापालिका निवडणुकीमध्ये नियमानुसार उमेदवारांना प्रचारासाठी फक्त दहा दिवसाचा वेळ मिळणार आहे. ३ जानेवारीला चिन्ह वितरण आणि अंतिम उमेदवारांची यादी घोषित करण्यात येईल. त्यानंतर प्रचाराला सुरुवात होईल. प्रत्यक्ष मतदान १५ जानेवारीला होणार आहे. निवडणुकीच्या ४८ तास पूर्वी प्रचार तोफा थंडावतील. त्यामुळे उमेदवारांना फक्त प्रचारासाठी दहा दिवसाचा अवधी मिळणार आहे. या दहा दिवसांमध्ये उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहोचावे लागेल. आपले विकास कामाची पावती मतदारांना द्यावी लागेल. राष्ट्रीय पक्षातील उमेदवारांना सोडून अपक्षांना मोठी कसरत प्रचारासाठी करावी लागणार आहे.

## अतिवृष्टी मदतीच्या निधी

शेतकऱ्यांनी थेट तहसील कार्यालयात प्रवेश करत, तहसीलदार यांच्याशी अतिवृष्टी निधीच्या विलंबाबाबत सविस्तर चर्चा केली. शासनाने मंजूर केलेला निधी जर वेळेत शेतकऱ्यांना दिला जात नसेल, तर त्याला जबाबदार कोण? शासनाने निधी मंजूर करूनही तो प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

या वेळी रमण लंगोटे, ऋषिकेश रडके, संविधान मोहोळ, श्रेयस बर्वे, जावेद पठाण, प्रवीण जामोदकर, विजय राऊत, शाम पारीसे, गौरव वैद्य, आशिष इंगळे यांच्या सह तालुक्यातील विविध गावांतील शेतकरी तथा, लोकविकास संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. केवायसी व कागदपत्रांची पूर्तता करूनही शेतकऱ्यांना, शासकीय कार्यालयात मदत का मिळाली नाही , यासाठी चकरा माराव्या लागत आहेत. यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीं सोबतच, मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.असे उपस्थित शेतकऱ्यांनी स्थानिक तहसीलदारांना सांगितले.

## वखार महामंडळाच्या कार्यालयासमोर

घेत असल्याचा आरोप सागर भवते यांनी आंदोलनादरम्यान केला आहे. राज्य वखार महामंडळाच्या अन्यायकारक धोरणाविरोधात वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेत कामगारांपासून करण्यात येणारी कमिशनखोरी बंद करून पूर्वीपासून कामावर असलेल्या कामगारांना पूर्ववत करण्यात यावे अशी मागणी ठिय्या आंदोलनातून करण्यात आली.

यावेळी वंचित चे जिल्हा महासचिव सागर भवते यांच्यासह वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट कामगार युनियनचे जिल्हाध्यक्ष विनय बांबोळे, विजय डोंगरे, जिल्हा सदस्य विनोद खाकसे, प्रमोद मुंद्रे, तालुका अध्यक्ष मनीष खरे, युवा आघाडी तालुका अध्यक्ष सचिन जोगे,तालुका महासचिव अमोल जवंजाळ, तालुका उपाध्यक्ष राहुल मनवर, राजकुमार आसोडे, नितीन थोरात सचिन डमके, पवन डमके, अनिकेत लांडे, श्रीकृष्ण निंभोरकर, हेमंत उईके, निलेश काळसरपे, रोषन गावणार, गौरव नेवारे, रवी धुर्वे, अक्षय वानखडे, विकी मंडरी, राजेंद्र नेवारे, आनंद वणवे, नितीन अतकरी, प्रवीण गावंडे, योगेश नेवारे, सुमित गावणार, संतोष धुर्वे, सुरेंद्र मडावी, प्रीतम टेकाम, संजय भलावी, अमित गावणार सह पदाधिकारी व कामगार उपस्थित होते.

**आंदोलनाला यश-** गेल्या १० वर्षापासून वखार महामंडळात हमाल म्हणून काम करणाऱ्या कमगारांनी अधिकाऱ्यांना कमिशन देण्यास नकार दिल्याने त्यांना कामावरून काढण्यात आले होते. आज महामंडळाच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आल्याने दोन्ही मागण्या मान्य करण्यात आल्या आहे.. कामगारांच्या हक्कासाठी वंचित बहुजन आघाडी कायम त्यांच्या पाठीशी असेल. - सागर भवते जिल्हा महासचिव

## अंजनगाव सुर्जी नगरपरिषद

तव्वर यांनी अनेक गरजू रुग्णांना उपचारासाठी मदत केली आहे. ते सतत राजकारण न करता सामाजिक कार्य करुन त्यांनी अनेकांना मदत केली असल्याने त्यांना सर्व जाती धर्मातील शहरात मानणारा वर्ग आहे. त्यामुळे त्यांची प्रभाग क्रमांक १२ मध्ये मतदारांत चर्चा रंगत असून अंजनगाव नगरपरिषद निवडणूकीत अपक्ष उमेदवार म्हणून निवडून येणार असल्याची चर्चा प्रभागातील मतदारांत आहे

## वेलकम पॉइंटवर ट्रॅफिक

जगदीश गुप्ता यांच्या तक्रारीला प्रतिसाद देत तत्कालीन पोलीस आयुक्तांनी शहर वाहतूक शाखेचा फिक्स पॉईंट या परिसरात लावला आहे.तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर १२२/१७७ अंतर्गत एकूण ५२१ केसेस केल्या आहेत. जगदीश गुप्ता यांनी केलेल्या पाठपुरावाला यश आल्याने हजारो प्रवाशांना फायदा झाला आहे.

## गंगोत्री सोसायटीवासी धडकले

वॉलमुळे रस्ता बंद झाला आहे. यामुळे नागरिकांना मौजे कठोरा बु. ७१/१ मधील स्मशानभूमी जवळील रस्त्याने येणे जाणे करावे लागत आहे. गेल्या कित्येक वर्षापासून याच रस्त्याने रात्री अपरात्री प्रवास करत आहे. लहान मुले व महिलांना यामुळे मोठी अडचण येत आहे. हे कंपाउंड वॉल तात्काळ हटवून देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. यावेळी नितेश बहाले, रवींद्र वानखडे, दिनेश जुमले ,सार्थक वानखडे, शंतनु गजभे, आकाश सोळंके, महेंद्र उईके, डुबा पाटील ,सुरज पाटील, हर्षल पाटील, आशिष भोयर, गजानन माहुलकर, आकाश माहुलकर, निलेश चौधरी ,अमोल तायडे, अतुल ठाकरे ,योगेश पवार, विनोद सुने सह परिसरातील नागरिकांचा सहभाग होता.

## सेवानिवृत्त रेल्वे अधीक्षकाला

वर त्यांना नफा तर दूर मुळ रक्कमही नाही दिली. आपल्याला फसवले असा आभास होताच, त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध कलम ३१८(४), ३१९(२),६६ (क),६६ (ड) व आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

## बस चालकावर हल्ला महागात;

३१ मार्च २०२५ रोजी एसटी चालक शहजाद खाँ मुस्तफा खाँ हे चांदुरबाजारहून तिवसा मार्गे बस चालवत असताना रिद्धपूर–ब्राम्हणवाडा दरम्यान आरोपींनी दुचाकी आडवी लावून बस थांबवली. चालकास ओढताण करत शिवीगाळ व मारहाण करण्यात आली. या घटनेमुळे शासकीय कामात अडथळा निर्माण झाल्याची तक्रार शिरखेड पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. तपास पूर्ण करून एपीआय आशिष बोरकर यांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. खटल्यादरम्यान सरकारी पक्षाने सहा साक्षीदार तपासले. पुरावे व युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने भादंवि कलम ३५३, ३२३ व ५०४ अंतर्गत विविध कालावधीचा साधा कारावास व दंड अशी शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारीं पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील मंगेश भागवत यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

## अकोटमध्ये उद्योगाच्या नावाखाली

उद्योगांच्या नावाखाली गैरप्रकार केल्याची चर्चा आहे. शासनाकडून दिली जाणारी सबसिडी ही सर्वसामान्य नागरिकांनी भरलेल्या करांतून दिली जाते; मात्र ती नियमबाह्य मार्गाने वळवली जात असल्याचा आरोप गंभीर आहे.

जर जिल्हा उद्योग केंद्रातील फाईल्सची सखोल चौकशी झाली, तर अकोट तालुक्यातील अनेक तथाकथित 'व्हाईट कॉलर' उद्योगप्रकरणांचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जबाबदार अधिकारी व संबंधितांवर तात्काळ कारवाई झाली नाही, तर जनतेचा रोष उफाळून येण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चर्चा सध्या सुरू आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# नवरी पळाली, दरोडा टाकला, मारहाण रिसोड हद्दीत गुन्हेगारीचा धक्कादायक पर्दाफाश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**रिसोड पोलीस स्टेशन हद्दीतील मोप गावाजवळ लोणारकडे जाणाऱ्या रस्त्यावर दरोडा टाकून मारहाण व अपहरणाचा थरारक प्रकार उघडकीस आला असून, या गंभीर गुन्ह्याचा छडा लावत वाशिम स्थानिक गुन्हे शाखा व रिसोड पोलिसांनी संयुक्त कारवाईत अपहृत व्यक्तीस सुखरूप सोडवून दरोडा व अपहरण प्रकरणातील प्रमुख आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली**



नांदेड येथील रहिवासी असलेले काही नागरिक स्विफ्ट डिझायर कारमधून दवाखान्यात उपचारासाठी रुग्णाला घेऊन जात असताना मोप गावाजवळ तीन ते चार चारचाकी वाहनांनी त्यांची कार रस्त्यात अडवली. त्यानंतर आरोपींनी कारमधील इसमांना जबर मारहाण करून त्यांच्याकडील २२ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याची माहिती वाशिम नियंत्रण कक्षास प्राप्त झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखा वाशिम व पोलीस स्टेशन रिसोड येथील अधिकारी व अंमलदार तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील तसेच आजूबाजूच्या जिल्ह्यातील दरोडा टोळ्यांबाबत माहिती घेत गुप्तबातमीदारांना सक्रिय करण्यात आले.

दरम्यान तपासादरम्यान या घटनेचा धागा एका विवाह प्रकरणाशी जोडला गेला. दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी ग्राम आसेगावपेन, जि. वाशिम येथील दीपक सिताराम खानझोडे यांचा विवाह राधा तुपे (रा. संभाजीनगर) हिच्याशी झाला होता. या विवाहासाठी दीपक खानझोडे यांनी मध्यस्थांना दोन लाख रुपये दिल्याची माहिती समोर आली. मात्र विवाहानंतर नवरी पळून जाण्याच्या तयारीत असल्याचे कुटुंबीयांच्या लक्षात आले.

दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी तीन अज्ञात चारचाकी वाहनांतून १० ते १२ जण आसेगावपेन येथे आले. नवरी घरात न आढळल्याने आरोपींनी घरातील साहित्याची तोडफोड केली व दीपक खानझोडे यांचे वडील सिताराम खानझोडे यांचे अपहरण करून नवरीच्या शोधात ग्राम मोहजा येथे नेले. तेथेही नवरी न सापडल्याने घराची तोडफोड करण्यात आली. आरोपींनी नवऱ्या मुलाच्या मोबाईलवर फोन करून 'नवरी आणून द्या, अन्यथा अपहरण केलेल्या सिताराम खानझोडे यांना जिवे मारू,' अशी धमकी दिली व ते जालना दिशेने निघून गेले. घटनेची गंभीरता लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखा वाशिमची तीन पथके व रिसोड पोलिसांचे पथक अहिल्यानगर, संभाजीनगर व जालना येथे रवाना करण्यात आले. अथक शोधमोहीम राबवत अपहृत सिताराम खानझोडे यांना अहिल्यानगर येथून सुखरूप ताब्यात घेण्यात आले. याच कारवाईत दरोडा व अपहरण प्रकरणातील आरोपी राहुल दिलीप म्हस्के (वय ३२, रा. नागेवाडी, जि. जालना) व सतीश विनायक जाधव (वय २९, रा. जालना) यांना अहिल्यानगर येथून अटक करण्यात आली. तसेच आकाश छगन गायकवाड यास जालना येथून ताब्यात घेण्यात आले. यासोबतच नवरी मुलगी व एजंट शांताराम कडुजी खराटे (रा. मोहजा रोड) यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.या प्रकरणी पोलीस स्टेशन रिसोड येथे अप.क्र. ९८०/२५ अंतर्गत भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३३३, १४०(२), ६१(२), ३२४(४), ३५१(३), ३५२ तसेच अप.क्र. ९८१/२५ अंतर्गत कलम ३१०(२), ३११, ३२४(३), १२६(२) अन्वये दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक वाशिम अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड व उपविभागीय पोलीस अधिकारी , नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, रामेश्वर चव्हाण यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखा वाशिम व पोलीस स्टेशन रिसोड येथील अधिकारी व अंमलदारांनी विशेष परिश्रम घेतले. सदर गुन्ह्यातील उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवचरण डोंगरे, पोलीस स्टेशन रिसोड करीत आहेत.

# भिलखेडा परिसरात मिळणार बांधकाम परवानगी

■ प्रतिनिधी | कारंजा ■



**- आ . सई डहाके यांच्या पाठपुराव्या मुळे नागरिकांना दिलासा**

**- नवनगर (कृषी समृद्धी केंद्र) मधून वगळलेल्या क्षेत्रात घरबांधणीचा मार्ग मोकळा**

मौजे भिलखेडा (भागशः), ता. कारंजा लाड, जि. वाशिम येथील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी आहे. नवनगर (कृषी समृद्धी केंद्र) मधून वगळण्यात आलेल्या क्षेत्रात बांधकाम परवानगी देण्याचे आदेश कारंजा (लाड) नगरपरिषदेला देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून रखडलेल्या घरबांधणीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

ही बाब सार्वजनिक व व्यापक लोकहिताची असल्याचे नमूद करत मा. मुख्यमंत्री महोदयांनी संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भात मा. विधानसभा सदस्य श्रीमती सई प्रकाश डहाके यांनी दि. १६ जुलै २०२५ रोजी शासनाकडे ठोस मागणी मांडली होती.

नगरविकास विभागाने दि. २८ ऑगस्ट २०२४ रोजी काढलेल्या शासन अधिसूचनेनुसार, अकोला-वाशिम प्रादेशिक विकास योजनेतील नवनगर (कृषी समृद्धी केंद्र) म्हणून अधिसूचित क्षेत्रातून मौजे भिलखेडा (भागशः) निर्अधिसूचित करण्यात आले आहे. तसेच या क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १६० (१) नुसार, अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर कारंजा (लाड) नगरपरिषद ही भिलखेडा (भागशः) क्षेत्रासाठी अधिकृत नियोजन प्राधिकरण ठरली आहे. या परिसरासाठी आता एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू करण्यात आली आहे.


**CHANGE OF NAME**

I have changed my old name from
MOHAMMAD AYYUB
(Passport No. [illegible])
To New Name
SHEKH AYYUB SHEKH RAHIM
Address: - Near Tondgaon Masjid
Bagban Pura Washim 444505

**CHANGE OF NAME**

I have changed my old name from
RUBINA BANO
(Passport No. [illegible])
To New Name
RUBINA BANO SHAIKH AYYUB
And
Husband old name from
MOHAMMAD AYYUB
(Passport No. [illegible])
To Husband New Name
SHAIKH AYYUB
Address: Near Tondgaon Masjid
Bagban Pura Washim 444505


# दिवसाढवळ्या घरफोडीचा गुन्हा उघडकीस!



**मालेगाव :** मालेगाव तालुक्यातील ग्राम पांग्राबंदी येथे दिवसा झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा छडा लावत मालेगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून सोन्याचे दागिने, रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ७७ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी दिवसा ग्राम पांग्राबंदी येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून ४.५ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत (किंमत अंदाजे ५५ हजार रुपये) व १० हजार रुपये रोख असा एकूण ६५ हजार रुपयांचा माल लंपास केला होता या घटनेची नोंद मालेगाव पोलीस ठाण्यात झाल्यानंतर तपासाला वेग देण्यात आला तपासादरम्यान पोलिसांनी पृथ्वीराज उर्फ काल्या संतोष वाघमारे (वय २० वर्षे, रा.गोटखेड, ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.त्याच्याकडून चोरीस गेलेली ४.५ ग्रॅम सोन्याची पोत (५५ हजार रुपये), २,४७० रुपये रोख तसेच गुन्ह्यात वापरलेली २० हजार रुपये किमतीची मोटारसायकल असा एकूण ७७,४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे ही यशस्वी कारवाई पोलीस निरीक्षक श्री.राजेश खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय दिलीप रहाटे, हेड कॉन्स्टेबल प्रदीप लांडगे, सुनिल पवार, किशोर चिंचोलकर तसेच पोलीस कॉन्स्टेबल विजय मोरे व मिलिंद राजगुरे (पोलीस स्टेशन मालेगाव) यांच्या पथकाने केली.

# जि. प . निवडणूक पुढे ढकलताच; इच्छुक भूमिगत

**मालेगाव :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे आरक्षण जाहीर होताच मालेगाव तालुक्यातील इच्छुक उमेदवारांनी अंगाला तेल लावून मैदानात उडी घेतली होती. गावोगावी फेरफटका, कॉर्नर सभा, चहा–नाश्त्याचे फड, धाब्यांवर संध्याकाळी रंगणाऱ्या बैठका आणि वाईन बारमध्ये 'ओल्या पार्थ्यांची' मैफल जोमात सुरू होती. मात्र ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर निवडणुका पुढे ढकलल्याचे संकेत मिळताच हेच इच्छुक उमेदवार अचानक अक्षरशः भूमिगत झाल्याचे चित्र सध्या तालुक्यात दिसून येत आहे.

दररोज सकाळ-दुपार-संध्याकाळ गावागावात फिरणारे, मतदारांच्या दारात हजेरी लावणारे हे भावी लोकप्रतिनिधी अचानक गेले तरी कुठे? असा प्रश्न आता त्यांच्या स्वतःच्या कार्यकर्त्यांना पडला आहे. कालपर्यंत 'साहेब' म्हणत मागे फिरणारे कार्यकर्ते आज साहेबांचा शोध घेताना दिसत आहेत.




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१ ■ मंगळवार १६ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


## बँकॉकला पलायन करण्याआधीच 'ड्रग्स किंग' गजाआड

**कारंजा ड्रग्स प्रकरण**

### १९२ कोटींच्या काळया कारखान्याने वर्ध्याला कलंक, मोठे हस्तक अजून मोकाटच?

**वर्धा रवींद्र लाखे**

महात्मा गांधींची पावन भूमी आणि विनोबा भावे यांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्धा जिल्ह्यात १९२ कोटी रुपयांचा ड्रग्स कारखाना उघडकीस येणे ही केवळ गुन्हेगारी घटना नसून, संपूर्ण प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि राजकीय व्यवस्थेवर काळा डाग लावणारी बाब ठरली आहे. जिल्ह्यातील कारंजा या छोट्या गावात डीआरआय (डायरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स) अधिकाऱ्यांनी धडक कारवाई करत अमली पदार्थांचा भलामोठा कारखाना उद्ध्वस्त केला, मात्र इतका मोठा बेकायदेशीर उद्योग इतके दिवस कसा चालू राहिला, हा प्रश्न जनतेच्या मनात ठिणग्यांसारखा पेटला आहे.

या स्फोटक प्रकरणातील मुख्य आरोपी वैभव अग्रवाल असल्याचे तपासात पुढे आले असून, सूत्रांच्या माहितीनुसार तो काळ्या पैशांच्या जोरावर थेट बँकॉकला पळ काढण्याच्या तयारीत होता. परदेशी उड्डाणापूर्वीच तपास यंत्रणांनी त्याला बेड्या ठोकल्याने तो गजाआड गेला, मात्र यामुळे प्रकरण संपले असे म्हणणे म्हणजे सत्याशी फारकत घेण्यासारखे ठरेल. कारण, १९२ कोटींचा उद्योग एखाद्या एकट्या व्यक्तीच्या बळावर उभा राहू शकतो का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे ही धडक कारवाई राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांच्या जिल्ह्यात, तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे माजी ओएसडी आणि आमदार सुमित वानखेडे यांच्या मतदारसंघात झाल्याने राजकीय वर्तुळातही अस्वस्थता निर्माण झाली आहे. आमदार सुमित वानखेडे यांनी या प्रकरणाचे पडसाद विधानसभेत उमटवण्याचा



प्रयत्न केला, मात्र आश्चर्याची बाब म्हणजे सत्ताधारी आणि विरोधक दोघांकडूनही त्यांना अपेक्षित समर्थन मिळाले नाही. त्यामुळे हे प्रकरण मुद्दाम दाबले जात आहे का, की सत्तेच्या वरच्या पातळीवर कुणाची तरी कुजबुज सुरू आहे ? असा संशय बळावत आहे.

डीआरआयने कारखाना उद्ध्वस्त केला असला, तरी स्थानिक पोलीस यंत्रणा, महसूल विभाग आणि इतर प्रशासकीय घटकांची भूमिका काय होती, इतक्या मोठ्या प्रमाणावर रसायने, यंत्रसामग्री आणि आर्थिक उलाढाल होत असताना कोणाचे डोळे बंद होते, की जाणूनबुजून झाकले गेले, असे अनेक प्रश्न आता सामान्य नागरिक विचारत आहेत.

कारंजा ड्रग्स प्रकरण हे केवळ एका आरोपीपुरते मर्यादित नसून, आंतरराष्ट्रीय ड्रग्स नेटवर्क, आर्थिक गैरव्यवहार आणि राजकीय संरक्षणाचे धागेदोरे उघड होण्याची शक्यता तपास यंत्रणा नाकारू शकत नाहीत. त्यामुळे एसआयटीकडे तपास देण्यात यावा, सर्व आर्थिक व्यवहारांची चौकशी करावी आणि 'मोठ्या माशां'पर्यंत हात पोहोचवावा, अशी जोरदार मागणी जनतेतून होत आहे.

बँकॉकला पळण्याचा प्रयत्न करणारा आरोपी आज तुरुंगात असला, तरी या काळ्या कारखान्याला खतपाणी घालणारे हात अजूनही मोकाट फिरत असतील तर हा प्रश्न वर्ध्याच्या जनतेला स्वस्थ बसू देणार नाही. कारंजा ड्रग्स प्रकरणावर पडदा पडणार की खरे चेहरे उघडे पडणार, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्यांच्या पिकांवर वन्यप्राण्यांचा हल्ला

## 'बोमा तंत्र' तातडीने राबवा

### आ. राजेश बकाने यांचा मुख्यमंत्र्यांकडे आग्रह

**देवळी जनमाध्यम** : वर्धा जिल्ह्यासह देवळी-पुलगाव विधानसभा क्षेत्रात नीलगाय, रोही, हरीण व रानडुक्कर यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे उभे पीक उद्धवस्त होत असताना शासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा संताप व्यक्त होत आहे. या गंभीर वन्यप्राणी मानव संघर्षावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आमदार राजेश बकाने यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत बोमा तंत्र' तातडीने राबविण्याची ठोस मागणी केली आहे.



शेतकरी वर्षभर राबराब मेहनत करतो, मात्र वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे त्याचे पीक क्षणात जमीनदोस्त होते. नुकसान भरपाईचे आश्वासन दिले जाते; पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नाही. या पार्श्वभूमीवर आ. बकाने यांनी मुख्यमंत्र्यांसमोर शेतकऱ्यांची व्यथा मांडत, केवळ तात्पुरत्या मलमपट्टीपेक्षा शास्त्रीय व दीर्घकालीन उपायांची गरज अधोरेखित केली.

मध्यप्रदेश शासनाने यशस्वीपणे राबविलेल्या बोमा तंत्रा'चा दाखला देत आ. बकाने यांनी ही आधुनिक, सुरक्षित आणि परिणामकारक पद्धत महाराष्ट्रात तातडीने अमलात आणण्याची मागणी केली. दक्षिण आफ्रिकेतील तज्ज्ञ संस्थेच्या सहकार्याने हेलिकॉप्टरच्या सहाय्याने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत कोणत्याही वन्यप्राण्याला इजा न करता, बेशुद्ध न करता फायबर नेटद्वारे बंदिस्त मार्गात पकडून त्यांचे सुरक्षितपणे राखीव जंगलात स्थलांतर करण्यात येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

मध्यप्रदेशातील शाजापूर जिल्ह्यात अवघ्या ११ दिवसांत ९१३ नीलगाय व हरणांचे सुरक्षित स्थलांतर करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान थांबले असून मानव-वन्यजीव संघर्षात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. हा ठोस पुरावा असताना महाराष्ट्रात हा प्रयोग का राबविला जात नाही, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत.

वर्धा जिल्ह्यातील देवळी-पुलगाव मतदारसंघात या तंत्राची सुरुवात केल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, शेती उत्पादन सुरक्षित राहील आणि वन्यजीव संवर्धनालाही चालना मिळेल, असे ठाम मत आ. बकाने यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदनाची दखल घेत वन्यप्राणी मानव संघर्ष हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे मान्य केले. या समस्येवर शास्त्रीय व दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक असून, संबंधित विभागांकडून प्रस्तावाचा सखोल अभ्यास करून योग्य निर्णय घेतला जाईल, अशी सकारात्मक भूमिका त्यांनी दर्शविल्याची माहिती आ. बकाने यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.दरम्यान, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांचा रोष उफाळून येण्याची शक्यता असून, या प्रश्नावर आक्रमक आंदोलन छेडण्याची मागणीही ग्रामीण भागातून जोर धरू लागली आहे. शेतकरी जगवायचा की वन्यप्राण्यांचा उपद्रव वाढू द्यायचा, हा प्रश्न आता शासनापुढे उभा ठाकला आहे.

## आर्वी मनरेगा निधी प्रकरणी बीडीओ मरसकोल्हेंचा खुर्चीवर जलसा

### जामिनानंतर पोलिस हाजरीसाठी आर्वी येथील पंचायत समितीत धडक; छायाचित्र सोशल मीडियावर व्हायरल

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पंचायत समितीत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या ७० लाखांहून अधिक निधी गिळंकृत प्रकरणी न्यायालयीन अटकेनंतर जामिनावर बाहेर आलेल्या गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांनी सोमवार १५ डिसेंबर रोजी थेट आर्वी पंचायत समिती कार्यालयात धडक दिली. या वेळी त्या गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात जाऊन बीडीओच्या खुर्चीवर विराजमान झाल्या, आणि त्याचे छायाचित्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात खळबळ उडाली.



> बीडीओ सुनीता मरसकोल्हे आर्वी येथे हाजरीसाठी आल्या. काही कागदपत्रे हवी असल्याने त्या कार्यालयात गेल्या. त्यांच्या निलंबनाबाबत प्रस्ताव शासनाला पाठविला गेला असून नियमानुसार कारवाई होईल.
>
> **पराग सोमण,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वर्धा
>
> बीडीओचा अतिरिक्त पदभार प्रदीप चव्हाण यांना दिला गेला होता. मरसकोल्हे यांनी खुर्चीवर बसणे नियमांचे उल्लंघन आहे. जामिन रद्द करून कडक कारवाई व्हायला हवी.
>
> **मेघराज डोंगरे,** जिल्हाध्यक्ष, पी. री. पा.: खरेतर आर्वी

आर्वी पोलिसांनी मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणी बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला होता. सुरूवातीला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर यांना अटक करण्यात आली, तर नंतर मरसकोल्हे यांना न्यायालयाच्या परवानगीने अटक करण्यात आली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद विचारात घेऊन जामिन मंजूर केला. जामिन आदेशात न्यायालयाने चार मुख्य मुद्यांवर भर दिला आहे. त्यातील चौथ्या मुद्यानुसार मरसकोल्हे यांना दोषारोपपत्र दाखल होईस्तोवर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या सोमवारी पोलिस ठाण्यात हाजरी राहण्याचे निर्देश मिळाले आहेत. सोमवार १५ रोजी, मरसकोल्हे यांनी आर्वी पोलिस ठाण्यात हाजरी लावली. त्यानंतर दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास त्या थेट आर्वी पंचायत समितीत दाखल झाल्या. गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात जात बीडीओच्या खुर्चीवर बसल्याचे छायाचित्र काहींनी काढले व सोशल मीडियावर व्हायरल केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचायत समिती कार्यालय गाठून तपास सुरु केला आणि दोन कर्मचाऱ्यांचे बयाण नोंदविले. या घटनेमुळे प्रशासनाच्या नियमांचे उल्लंघन उघडकीस आले असून, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या छायाचित्रांमुळे आर्वीत नागरिकांमध्ये संतापाची लाट उठली आहे. प्रशासनाने योग्य ती कारवाई करण्याची मागणी वाढली आहे. मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणाचा सखोल तपास सुरु असून नियमभंग करणाऱ्यांना आता बिनधास्त दंड दिला जाईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## आंजी साईबाबा यात्रा महोत्सवानंतर हिंसाचाराचे गालबोट

### फ्रूट विक्रेत्याने कापड दुकानदारावर सत्तूरने हल्ला; पिता-पुत्र गंभीर जखमी

**आंजी मोठी । जनमाध्यम-** आंजी येथे साईबाबा यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. सात दिवस चाललेल्या यात्रेच्या समारोपानंतरही बाजारपेठेत गर्दी होती. मात्र, यात्रेनंतर घडलेल्या एका गंभीर हिंसक घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली.

रविवार, दि. १४ डिसेंबर रोजी रात्री सुमारे ८ वाजता आरोपी चंद्रशेखर वामन पचारे (वय ३३, रा. आंजी मोठी) हा पुरुषोत्तम नानाजी वंजारी यांच्या कापड दुकानात आला.

तेथे किरकोळ कारणावरून वाद घालत त्याने शिवीगाळ सुरू केली. उपस्थितांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता आरोपी अधिकच आक्रमक झाला.

याचवेळी आरोपीने कमरेत लपवून ठेवलेला सत्तूर काढून चेतन पुरुषोत्तम वंजारी यांच्या डोक्यावर वार केला. या हल्ल्यात चेतन गंभीर जखमी होऊन खाली कोसळले. त्यांना वाचविण्यास धावलेल्या वडील पुरुषोत्तम वंजारी यांनाही सत्तूरचा मार लागून ते जखमी झाले.

गंभीर अवस्थेतील चेतन वंजारी यांना तातडीने सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात हलविण्यात आले, तर त्यांच्या वडिलांवर आंजी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून सुटी देण्यात



आली.

या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम ११८(२), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास तपास अधिकारी विनोद सानप, दीपक सोलंकी व हवालदार धवणे करीत आहेत.

दरम्यान, आंजी पोलीस चौकी अंतर्गत ३६ गावांचा परिसर येतो. मात्र, केवळ दोन ते तीन पोलीस कर्मचारी असल्याने पुरेसा बंदोबस्त नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

यात्रेच्या काळात अपुरा पोलीस बंदोबस्त ही गंभीर बाब असून चौकीसाठी किमान सात ते आठ कर्मचारी नियुक्त करण्याची जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## कराटे खेळाडूंच्या वाहनावर भीषण अपघात

### मंगेश व शुभम ठरले जखमींचे देवदूत

**वर्धा जनमाध्यम :** वर्ध्यातील कराटे चॅम्पियनशिप पूर्ण करून चंद्रपूरकडे परतणाऱ्या खेळाडूंच्या वाहनाला मिरापूरजवळ भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत वाहन चालकासह ८ कराटे खेळाडू गंभीर जखमी झाले आहेत. अपघात रात्री उशिरा घडल्यामुळे जखमींना तातडीची मदत मिळवणे कठीण झाले. मात्र मंगेश भडके आणि शुभम बोडे या दोन तरुणांनी जखमींच्या मदतीसाठी क्षणाचाही विलंब न करता धाव घेतली आणि रुग्णालयात सुरक्षित पोहोचवले.

प्राप्त माहितीनुसार, १४ डिसेंबरला चंद्रपूर जिल्ह्याची कराटे चमू वर्ध्यातील चॅम्पियनशिपमध्ये सहभागी झाली होती. या टीममध्ये ७ ते ११ वयोगटातील ७ मुले आणि १ मुलीचा समावेश होता. स्पर्धा आटोपल्यानंतर सर्व खेळाडू रात्री चंद्रपूरच्या दिशेने परतत होते. वाहन चालक नरेश थट्याल एम.एच. ३४ बी.वाय. ३८९४ क्रमांकाची कार चालवत होता.

वर्धा-हिंगणघाट मार्गावर मिरापूरजवळ रात्री सुमारे ११ वाजता वाहनावर नियंत्रण सुटले. कार दोन ते तीन वेळा उलटत रस्त्याच्या खाली कोसळली. या अपघातात चालकासह सर्व खेळाडू जखमी झाले, त्यातील चार बालकांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली.

दुर्घटनेवेळी संस्कार एग्रोमधून कर्तव्य पूर्ण करून परतत असलेले मंगेश भडके आणि शुभम बोडे यांनी जखमींना मदत करण्यासाठी देवदूताची भूमिका बजावली. त्यांनी तात्काळ रुग्णवाहिकेची व्यवस्था केली आणि सर्व जखमींना सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले. तसेच ते जखमींसोबत रुग्णालयात पहाटे ३ वाजेपर्यंत थांबले, त्यांची काळजी घेतली.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मंगेश भडके व शुभम बोडे यांच्या मानवतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. पालक, शिक्षक व स्थानिकांनी दोघांचे अभिनंदन केले असून, या बालकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## अंगणवाडी सेविकेवर तरुणाने केला हल्ला

### वादातून हिंसेचा उद्रेक; जखमी सेविकेला अमरावतीत दाखल

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील तळेगाव (श्या.पंत.) वॉर्ड क्र. ३ मध्ये एका जुन्या वादाने गंभीर वळण घेतले. अंगणवाडी सेविकेवर प्राणघातक हल्ला झाला, ज्यामध्ये सेविके गंभीर जखमी झाल्या. तातडीने त्यांना अमरावती येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलीसांनी आरोपीला ताब्यात घेत त्यास दोन दिवसीय पोलीस कोठडी दिली आहे.

जखमी सेविकेचे नाव कुसुम अमृत ठाकरे असून, त्यांनी त्यांच्या शेजारी राहणाऱ्या सुनिल रानोटकर यांच्या गाईच्या गोठ्याबाबत तक्रार केली होती. यावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला आणि तळेगाव ग्रामपंचायतीने रानोटकर कुटुंबीयांना नोटीस बजावली. तसेच गोठा इतर ठिकाणी हलवण्याच्या सूचना दिल्या. या निर्णयामुळे रानोटकर कुटुंबीयांमध्ये असंतोष निर्माण झाला.

वादाचा तीव्र परिणाम अंगणवाडी सेविकेवर झाला. अभय अनिल रानोटकर (वय २५) या रानोटकर कुटुंबातील सदस्याने कुसुम ठाकरे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. आरोपीने कुसुमच्या घरात घुसून त्यांच्यावर शिवीगाळ केली आणि मारहाण केली. हल्ल्यानंतर अभय घटनास्थळावरून पसार झाला.

पोलीसांनी घटनास्थळावर त्वरित दाखल होऊन तपास सुरु केला. जखमी सेविकेला अमरावती रुग्णालयात दाखल करून आवश्यक उपचार सुरु करण्यात आले. पोलीसांनी आरोपी अभय



रानोटकर विरोधात गुन्हा दाखल केला असून त्यास दोन दिवसीय पोलीस कोठडी मिळवण्यात आली आहे.

या घटनेने परिसरात गोंधळ उडवला असून स्थानिक नागरिकांमध्ये संताप आहे. अंगणवाडी सेविकांवरील हल्ला सामाजिक सुरक्षा आणि सार्वजनिक सेवकांच्या संरक्षणाची गरज अधोरेखित करतो. स्थानिकांनी प्रशासनकडे त्वरित कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.


**CHANGE OF NAME**

**KUMAR LAXMIKANT TAWARI**
Ward no. 1 at post Kelzar tal. Seloo dist. Wardha Maharashtra, India -442104
**Having Old Passport No K 1749012**
**Change his name and new name is**
**KUMAR LAXMIKANT TAORI**
As per Adhar No .38740008023
This Notice is For Passport Purpose and
**FOR ALL FURTURE PURPOSE**


## बोरगाव मेघेतील अवास्तव पाणी बिले

### अंबिका सोशल फाउंडेशनचे जलमंत्र्यांना निवेदन

**वर्धा । जनमाध्यम** वर्धा शहरालगत असलेल्या बोरगाव मेघे येथील नागरिकांना आकारण्यात येणाऱ्या अवास्तव व अन्यायकारक पाणी बिलांमुळे संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, या गंभीर प्रश्नावर अंबिका सोशल फाउंडेशनने थेट राज्य सरकारकडे दाद मागितली आहे. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा अंबिका हिंगमीरे यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान महाराष्ट्र राज्याचे जलपुरवठा व स्वच्छता मंत्री नामदार गुलाबराव पाटील यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.बोरगाव मेघे येथे काही वर्षांपूर्वी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नवीन पाणी लाईन टाकण्यात आली होती. त्यावेळी नागरिकांना प्रति लिटर २० पैसे दराने



मासिक पाणी बिल आकारले जाईल, असे स्पष्ट आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात या आश्वासनाला हरताळ फासण्यात आला असून, आजघडीला दोन खोल्यांच्या साध्या घरांनाही ५ हजार ते १० हजार रुपयांपर्यंतची पाणी बिले पाठवली जात आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित घरांमध्ये कोणताही उद्योग, व्यवसाय किंवा अतिरिक्त पाण्याचा वापर नसतानाही एवढ्या मोठ्या प्रमाणात बिले आकारली जात आहेत. पाणी मीटर, मीटर रिडींग किंवा प्रशासकीय त्रुटींमुळे ही अवास्तव आकारणी होत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अनेक गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना ही रक्कम भरणे अशक्य ठरत असून, थकबाकीच्या कारणावरून काही ठिकाणी पाणीपुरवठा बंद केल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अंबिका सोशल फाउंडेशनच्या वतीने पाणी दररचनेची तातडीने चौकशी करावी, शासनमान्य किंवा पूर्वी जाहीर केलेल्या दरांनुसारच पाणी बिल आकारणी करावी, अवास्तव थकबाकीबाबत पुनर्विचार करून नागरिकांना दिलासा द्यावा, चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही नागरिकाची पाणी लाईन बंद करू नये, तसेच पाणी मीटर व मीटर रिडींगमधील तांत्रिक व मानवी त्रुटींची स्वतंत्र चौकशी करावी, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे.यावेळी जलपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी या विषयाची गंभीर दखल घेत संबंधित विभागामार्फत चौकशी करून योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. पाणी ही जीवनावश्यक सुविधा असल्याने शासनाने या प्रश्नाकडे संवेदनशीलतेने पाहून तातडीने न्याय द्यावा, अशी अपेक्षा बोरगाव मेघेतील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# विद्यार्थ्यांना मारल्यास होणार शिक्षा



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कठोर निर्देश जारी केले आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार शारीरिक शिक्षा, मानसिक छळ आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावास पूर्णतः बंदी घालण्यात आली असून, बालस्नेही वातावरण राखण्यासाठी नवीन नियमांची अंमलबजावणी करणे सर्व शाळांना बंधनकारक आहे.महाराष्ट्र सरकारने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांना शाळेत आनंदी वाटेल असे वातावरण तयार करण्यासाठी एक खूप महत्त्वाचा शासन निर्णय जारी केला आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि शिक्षण संस्थांमध्ये सुरक्षित वातावरण सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे आता शाळेतील शिक्षक आणि कर्मचा-यांसाठी कठोर नियम लागू करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे आता राज्यातील सर्व शाळांना विद्यार्थ्यांशी सन्मानपूर्वक आणि संवेदनशीलपणे वागणे बंधनकारक असणार आहे.राज्य सरकारने या नवीन सरकारी आदेशात जुन्या शिक्षण हक्क कायद्यातील नियमांवर पुन्हा भर देण्यात आला आहे. हा शासन निर्णय काढून शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम १७ च्या तरतुदींना अधिक बळ देण्यात आले आहे. यानुसार आता विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा, मारहाण किंवा मानसिक त्रास, छळ करणे, अपमान करणे आता पूर्णपणे मनाई असणार आहे. त्यामुळे शिक्षक, मुख्याध्यापक किंवा कंत्राटी कर्मचारी कोणालाही विद्यार्थ्यांना शिक्षा देण्याचा अधिकार राहिलेला नाही.

**फोटो आणि मेसेजबाबत कडक नियम**

तसेच आता विद्यार्थ्यांना टोमणे मारणे, शिवीगाळ करणे, अपमान करणे किंवा त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होईल असे मानसिक त्रास देणारे वर्तन करणे यावर सक्त बंदी घालण्यात आली आहे. त्यासोबतच शैक्षणिक कामगिरी, जात, धर्म, लिंग, भाषा, अपंगत्व किंवा सामाजिक-आर्थिक स्थिती या कोणत्याही आधारावर विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव करणे हा देखील गुन्हा मानला जाईल. हा नियम शिक्षक, मुख्याध्यापक, तसेच तात्पुरते किंवा कंत्राटी काम करणारे कर्मचारी सर्वांना लागू असेल.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कर्मचा-यांवर खास निर्बंध लावण्यात आले आहेत. शिक्षकांनी कामाशिवाय विद्यार्थ्यांशी वैयक्तिक मेसेज, चॅट किंवा सोशल मीडियावर बोलणे बंद करायचे आहे. विद्यार्थ्यांचे फोटो किंवा व्हिडिओ त्यांच्या पालकांच्या परवानगीशिवाय वापरता येणार नाहीत. तसेच मुलांचे मार्कशीट किंवा इतर खासगी माहिती खूप काळजीपूर्वक गोपनीयता राखून हाताळावी. शाळेत तक्रार निवारण यंत्रणा तयार करणे गरजेचे असून या ठिकाणी ठरलेल्या वेळेत तक्रारी सोडवणं गरजेचे असणार आहे.

## शिक्षक, मुख्याध्यापकांसाठी नवी नियमावली जारी

**नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर शिक्षा होणार-**जर या नियमांचे उल्लंघन झाल्यास कठोर शिक्षा करण्यात येणार आहे. तसेच कोणतीही चुकीची घटना घडल्यास तिची नोंद करायची आणि कॅमेरा फुटेजसह सगळे पुरावे जपून ठेवावे. जर शाळेत लैंगिक अत्याचार किंवा बाल छळाची खूप गंभीर घटना घडली, तर शाळेला २४ तासांत पोलिसांत तक्रार दाखल करणे बंधनकारक आहे. अशा गंभीर प्रकरणांमध्ये ढडऊड कायदा आणि बाल न्याय अधिनियमांतर्गत कठोर कारवाई केली जाईल. जर कोणी घटना दाबण्याचा प्रयत्न केला किंवा खोटी माहिती दिली, तर त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई होईल. हा आदेश महाराष्ट्रातील सरकारी, अनुदानित आणि खासगी अशा सर्व प्रकारच्या शाळांना पाळणे बंधनकारक आहे. या निर्णयामुळे आता महाराष्ट्रातील शाळांमध्ये मुलांना सुरक्षित आणि सन्मानाने शिक्षण मिळेल, अशी अपेक्षा आहे.

## कोराडी वीज केंद्रात ओझोन वायू गळती; १८ कामगार अत्यवस्थ

**नागपूर/प्रतिनिधी :कोराडी येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रात दुपारी एकच्या सुमारास गंभीर घटना होता होता टळली. औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील ७ क्रमांकाच्या ६० मेगा वॅट वीज निर्मिती केंद्रातील ओझोन वायूची गळती झाल्याने तिथे उपस्थिती कामगारांचा श्वास गुदमरला .श्वासोच्छवास घेताना त्रास होत असल्याची तक्रार घेउन कामगारांची प्रकृती अस्वस्थ झाल्याने तातडीने अलार्म सिस्टिम यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. श्वास गुदरमलेल्या सर्व कामगारांना तीन रुग्ण वाहिकेतून तातडीने इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले.**



**श्वास गुदमरलेल्या या १८ कामगारांपैकी कोणाचीही प्रकृती अत्यवस्थ नसून त्यांचा श्वास सामान्य केला जात असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.दुपारी एकच्या सुमारास काही कामगारांना पोट फुगल्यासारखं वाटत होते. दरम्यान त्यांना श्वास घेताना त्रास होत असल्याची तक्रार कामगारांनी केली. त्यामुळे तातडीने सर्वांना मेयोतल्या अपघात विभागात दाखल करण्यात आले. प्रशासनाने या बाबत मध्ये प्रशासनाला अलर्ट देत टीम तयार ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या. या घडामोडीत कोराडी औष्णिक वीज निर्मिती केंद्राने वायू गळती नेमकी कशामुळे झाली याचा तपास सुरू केला आहे.**

## श्रीमंत लोक प्रदूषण करतात आणि गरिबांना भोगावे लागते

### ◆ सरन्यायाधीश सूर्यकांतं यांची टिप्पणी ◆

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाची राजधानी दिल्लीसह आसपासच्या राज्यांमधील प्रदूषणाने सर्वोच्च पातळी गाठली आहे. उत्तर भारतातील हवेची गुणवत्ता इतकी वाईट आहे की राजधानी दिल्लीतल्या शाळांना सुट्ट्या देण्यात आल्या आहेत. खासगी कर्मचा-यांना वर्क फ्राम होमचा सल्ला देण्यात आला आहे. दुस-या बाजूला वाढत्या प्रदूषणाशी संबंधित अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांवर १७ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे.



सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जायमाल्या बागची, न्यायमूर्ती विपुल एम पामचोली यांच्या खंडपीठाने वरिष्ठ अधिवक्त्या अपराजिता सिंह यांच्या युक्तिवादावर प्रतिक्रिया दिली. अपराजिता सिंह म्हणाल्या, न्यायालय जोवर स्पष्ट निर्देश देत नाही तोवर राज्य सरकारे प्रदूषणाशी दोन हात करण्यासाठी प्रभावी कार्यवाही करणार नाहीत.

**राज्य सरकारच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात कारवाया ?-** अपराजिता सिंह म्हणाल्या, प्रदूषण नियंत्रणासाठीचे नियम, शिष्टाचार आहेत. परंतु, त्यांचं पालन केलं जात नाही. दिल्लीतलं प्रदूषण पाहता सर्वोच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात डिसेंबर ते जानेवारीदरम्यान राजधानीत भरवल्या जाणा-या क्रीडा स्पर्धा व सराव सत्रांवर बंदी घातली होती. तरीदेखील अनेक ठिकाणी क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. न्यायालयाचे आदेश बाजूला करून राज्य सरकारे ज्या कारवाया करत आहेत त्याविरोधात ठोस कृती अपेक्षित आहे.

**सरन्यायाधीशांचं महानगरांमधील नागरिकांच्या जीवनशैलीवर बोट**

दरम्यान, सरन्यायाधीश सूर्य कांत यावर म्हणाले, देशातील प्रदूषणाच्या समस्येची आम्हाला पूर्ण कल्पना आहे. त्यामुळे हे न्यायालय असे आदेश पारित करेल जे प्रभावी असतील आणि ज्यांचं पालन करता येईल. काही निर्देश असे असतात जे बळजबरीने लागू करावे लागतात. परंतु, महानगरांमधील लोकांची स्वताची एक जीवनशैली असते जी बदलणं अवघड असतं. महानगरांमधील लोक त्यांची जीनवशैली बदलत नाहीत.

**श्रीमंत प्रदूषण करतात, गरिबांना फटका बसतो**

सरन्यायाधीश म्हणाले, गोरगरिबांना प्रदूषणाचा सर्वाधिक फटका बसतो. मात्र, प्रदूषण करण्यामध्ये श्रीमंत वर्ग सर्वात पुढे असतो. यावर वरिष्ठ अधिवक्त्या अपराजिता सिंह म्हणाल्या, गरीब मजूरांना प्रदूषणाचा सर्वात मोठा फटका सहन करावा लागतो. यावर सरन्यायाधीश म्हणाले, आम्ही प्रदूषणाच्या समस्येशी अवगत आहोत आणि यावर तातडीने सुनावणी घेत आहोत. येत्या १७ डिसेंबर रोजी आम्ही यासंबंधीच्या याचिकांवर सुनावणी करू.

## राज्यात थंडीचा कडाका; गारठा वाढला

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यासह देशात कडाक्याची थंडी आहे. उत्तरेकडे गारठा वाढल्याने राज्यात शीत लहरी येत असल्याने कडाक्याची थंडी पडली आहे. संपूर्ण महिनाभर अशीच थंडी राहण्याचा अंदाज आहे. ३१ डिसेंबरपर्यंत हवामान थंड राहील, तापमानाचा पारा कमी राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. मुंबईची हवा पुन्हा एकदा चिंतेचा विषय बनली आहे. धूळ, धुके आणि धुरामुळे श्वास कठीण झाले आहे. नरिमन पाईंट परिसरात धूसर वातावरण आहे.



नोव्हेंबरच्या दुस-या आठवड्यापासून राज्यात गुलाबी थंडी सुरू झाली. त्यामध्येच आता भारतीय हवामान विभागाने थंडीच्या लाटेचा अत्यंत मोठा इशारा जारी केला. राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद धुळात झाली. धुळ्यात ६ अंश सेल्सिअस तापमान होते. धुळ्यात मागील काही दिवसांपासून कडाक्याची थंडी आहे. जेउर आणि निफाडमध्ये पारा घसरला. ६ च्या आसपास तापमानाची नोंद झाली. उत्तरेकडे थंडी वाढत असल्याने राज्यातही थंडी वाढली आहे. मालेगाव, आहिल्यानगर, गोदिंया येथे ९ अंश सेल्सिअस तापमान होते. पुणे, जळगाव, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे १० अंश सेल्सिअस तापमान होते. हवेत तयार झालेल्या धुरक्यामुळे हवेची गुणवत्ता खराब श्रेणीत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे. वाढत्या प्रदूषणाचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. खोकला, सर्दी, दम्याचे तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसन आजाराने ग्रस्त रुग्ण अधिक त्रस्त. मात्र हवेत गारठा असल्याने नरिमन पाईंट परिसरात मार्निंग व करणा-या मुंबईकरांची गर्दी बघायला मिळते. महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपाययोजना करत असले तरी अपेक्षित परिणाम दिसत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. राज्यात पुढील काही दिवस थंडी असणारच आहे. भारतीय हवामान विभागाने थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे. पुढील काही दिवसांमध्ये गारठा वाढणार असल्याने आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे.

## पंतप्रधान मोदी जार्डन, इथियोपिया आणि ओमान देशांच्या दौ-यावर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन देशांच्या महत्त्वपूर्ण दौ-यावर रवाना होत आहेत. या दौ-यात ते जार्डन, इथियोपिया आणि ओमानला भेट देणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयानुसार, हा दौरा भारताचे पश्चिम आशिया आणि आफ्रिकेतील देशांशी असलेले संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरेल. या दौ-यात व्यापार, गुंतवणूक, धोरणात्मक सहकार्य आणि प्रादेशिक मुद्द्यांवर सखोल चर्चा होणार आहे. पंतप्रधान मोदी यांचा ज?र्डन आणि इथियोपियाचा हा पहिला संपूर्ण द्विपक्षीय दौरा असेल, तर ओमानला ते दुस-यांदा भेट देणार आहेत.पंतप्रधान मोदी १५ डिसेंबर रोजी जार्डनची राजधानी अम्मान येथे पोहोचतील. तेथे ते राजा अब्दुल्ला दुसरे यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करतील. त्यानंतर शिष्टमंडळ पातळीवरील बैठक होईल. भारत आणि ज?र्डन यांच्यातील राजनैतिक संबंधांना ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने हा दौरा विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. दोन्ही देशांमधील व्यापार, गुंतवणूक आणि राजकीय सहकार्यावर या भेटीत भर दिला जाणार आहे.दौ-याच्या दुस-या दिवशी पंतप्रधान मोदी आणि राजा अब्दुल्ला भारत-जार्डन व्यापार कार्यक्रमाला संबोधित करतील. या कार्यक्रमात दोन्ही देशांतील प्रमुख उद्योजक सहभागी होतील. याशिवाय पंतप्रधान मोदी जार्डनमध्ये राहणा-या भारतीय समुदायाशीही संवाद साधतील. युवराजांसोबत ते पेट्रा या ऐतिहासिक शहराला भेट देतील, जे भारतासोबतच्या प्राचीन व्यापारी संबंधांचे प्रतीक मानले जाते.जार्डननंतर पंतप्रधान मोदी १६ ते १७ डिसेंबरदरम्यान इथियोपियाच्या राजकीय दौ-यावर असतील. ही त्यांची पहिली इथियोपिया भेट असेल. तेथे ते पंतप्रधान अबी अहमद अली यांची भेट घेतील. दोन्ही देशांतील द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंवर चर्चा होईल. पंतप्रधान मोदी इथियोपियाच्या संसदेच्या संयुक्तअधिवेशनालाही संबोधित करतील. या दौ-यात अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्ष-या होण्याची शक्यता आहे. आफ्रिकेत दीर्घकालीन आणि विश्वासार्ह भागीदार म्हणून भारताची भूमिका अधिक मजबूत करण्याचा भारताचा प्रयत्न आहे. एजेंडा २०६३ अंतर्गत आफ्रिकेच्या प्राधान्यक्रमांवर आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा होणार आहे. भारतीय समुदायाशी संवाद हा देखील या दौ-याचा महत्त्वाचा भाग असेल.दौ-याच्या शेवटच्या टप्प्यात पंतप्रधान मोदी १७ ते १८ डिसेंबरदरम्यान ओमानला भेट देतील. ही त्यांची ओमानची दुसरी भेट असेल.



## इंडिगो संकट : सुप्रीम कोर्टाचा सुनावणीस नकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सुप्रीम कोर्टाने इंडिगो एअरलाइन्सच्या शेकडो उड्डाणे रद्द करण्याबाबत जनहित याचिका (पीआयएल) ऐकण्यास नकार दिला. न्यायालयाने याचिकाकर्ता नरेंद्र मिश्रा यांना त्यांच्या तक्रारींसह दिल्ली उच्च न्यायालयात जाण्यास सांगितले, कारण असाच एक खटला तेथे आधीच प्रलंबित आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने सांगितले की, दिल्ली उच्च न्यायालय इंडिगोच्या उड्डाणे रद्द करण्याशी संबंधित प्रकरणाची सुनावणी आधीच करत आहे आणि म्हणून, याचिकाकर्त्याने तेथे आपली बाजू मांडावी.न्यायालयाने असेही म्हटले आहे की, जर उच्च न्यायालयात तक्रारींचे निराकरण झाले नाही तर याचिकाकर्ता पुन्हा सुप्रीम कोर्टात जाउ शकतो. इंडिगोच्या उड्डाणे रद्द करणे आणि प्रवाशांना होणा-या गैरसोयींची चौकशी करण्यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) एक तज्ञ समिती स्थापन केली आहे, अशी माहिती न्यायालयाला देण्यात आली. ही समिती रद्द करण्याची कारणे आणि प्रवाशांवर होणा-या परिणामांचा आढावा घेईल. सुप्रीम कोर्टाने मान्य केले की, हे प्रकरण आधीच दिल्ली उच्च न्यायालय आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (DGCA) यांच्या अखत्यारीत असल्याने, सध्या ते या प्रकरणाची थेट सुनावणी करणार नाही.यापूर्वी १० डिसेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला प्रश्न विचारला होता की, इंडिगोच्या उड्डाण रद्द झाल्यामुळे निर्माण झालेल्या संकटाचे निराकरण करण्यासाठी वेळेवर कारवाई का केली गेली नाही. उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, यामुळे लाखो प्रवासी अडकले आहेत आणि इतर विमान कंपन्यांनी जास्त भाडे आकारले आहे. दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत केंद्र सरकारने प्रवाशांना मदत आणि परतावा देण्याचे निर्देश विभागाला द्यावेत अशी मागणी करण्यात आली आहे.




## सरदार पटेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त पंतप्रधानांनी केले अभिवादन



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ७५ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र आदरांजली वाहिली. ते म्हणाले की, सरदार पटेलांनी आपले संपूर्ण आयुष्य देशाला एकसंध करण्यासाठी आणि भारताला एकतेच्या सूत्रात गुंफण्यासाठी समर्पित केले.एकात्म आणि सशक्त भारताच्या निर्मितीसाठी सरदार पटेलांचे अतुलनीय योगदान समस्त देशवासियांच्या स्मरणात सदैव कोरलेले राहील, असे मोदी यांनी नमूद केले.




पंतप्रधानांनी असेही म्हटले की, 'आत्मनिर्भर भारता'च्या उभारणीसाठी सरदार पटेलांचे जीवन आजही विशेष प्रेरणा देत आहे. भारताच्या या लोहपुरुषाने रुजवलेली राष्ट्रीय एकतेची भावना 'विकसित भारता'च्या संकल्पनेसाठी उर्जेचा एक शक्तिशाली स्रोत आहे, असेही त्यांनी नमूद केले.राष्ट्रनिर्मितीतील सरदार पटेलांचे अतुलनीय योगदान, त्यांचे निर्णायक नेतृत्व आणि भारताची अखंडता बळकट करण्यासाठीची त्यांची कटिबद्धता, एका सशक्त आणि समर्थ राष्ट्रासाठी सदैव मार्गदर्शक ठरेल, असे पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले.

**मोदी यांनी स्वतंत्र एक्स पोस्ट्समध्ये नमूद केले ?** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना त्यांच्या ७५व्या पुण्यतिथी दिनी माझे सादर नमन. त्यांनी देशाला एका सूत्रात गुंफण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. एकसंध आणि सशक्त भारतवर्षाच्या निर्मितीमध्ये त्यांचे अतुलनीय योगदान हे कृतज्ञ राष्ट्र कधीही विसरणार नाही. भारत रत्न सरदार पटेल यांची ७५वीं पुण्यतिथी आत्मनिर्भर भारतासाठी प्रेरणा घेण्यासाठी एक विशेष प्रसंग देखील आहे. त्यांनी देशवासियांमध्ये राष्ट्रीय एकतेची जी भावना रुजवली, ती विकसित भारत साठी उर्जेचा स्रोत आहे. राष्ट्र निर्मितीमध्ये त्यांची अद्वितीय भूमिका सशक्त आणि सामर्थ्यवान भारतासाठी मार्गदर्शक बनेल.

## बिबट्याच्या हल्ल्यात 8 वर्षीय बालक ठार

**जुन्नर / प्रतिनिधी-**जुन्नर तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यांची मालिका थांबायला तयार नाही.पारगाव मंगरूळ येथे सोमवारी (दि.१५ ) दुपारी कांदा काढणीचे काम सुरू असताना शेताच्या बांधावर बसलेल्या एका आठ वर्षीय मुलावर दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला केला आणि त्याला उसाच्या शेतात ओढून नेले.या हृदयद्रावक घटनेत गंभीर जखमी झालेल्या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून पिंपरखेडच्या रोहन बोंबेच्या घटनास्थळा पासून पाचशे मीटरच्या अंतरावर ही घटना घडल्याने परिसरात भितीचे वातावरण पुन्हा गडध झाले आहे. पारगाव येथे श्रीराम भिकाजी भोर यांच्या शेतात कांदा काढणीसाठी आलेल्या मजुरांचा मुलगा रोहित बाबू कापरे ( रा.धामणसई , ता.रोहा जि.रायगड ) हा शेताच्या बांधावर बसला होता.याचवेळी परिसरातील उसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने संधी साधून रोहितवर हल्ला केला आणि त्याला ओढत उसाच्या दाट शेतात नेले.यावेळी महिला मजुरांनी उसाच्या शेतात शिरून बिबट्याच्या तावडीतून सोडवून पारगाव येथील खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले परंतु या हल्ल्यात रोहित बाबु कापरे हा गंभीर जखमी झाल्याने उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण जुन्नर परिसरात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना विशेषतः चिंताजनक आहे कारण, पिंपरखेड येथे काही दिवसांपूर्वी रोहन बोंबे या बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. पारगाव मंगरूळ येथील आजची घटना पिंपरखेडच्या या पूर्वीच्या घटनास्थळापासून केवळ दीड किलोमीटर अंतरावर घडली आहे.





## भाजपाकडू साधू- महंतांच्या उपस्थितीत वृक्षारोपण

**नाशिक/ प्रतिनिधी-**नाशिकमध्ये २०२७ सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. यासाठी नाशिकच्या पंचवटी भागातील तपोवन परिसरामध्ये साधुग्राम बांधण्यात येणार आहे. या साधुग्रामसाठी जवळपास १८०० झाडे तोडण्यात येणार आहेत. पर्यावरणप्रेमींनी याला विरोध केला असून नाशिककरांनी देखील त्याला पाठिंबा दिला आहे.अशात भाजपाकडून डॅमेज कंट्रोल करण्यासाठी आजपासून १५००० झाडांच्या वृक्षारोपणाचा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला गिरीश महाजन तसंच अखिल भारतीय आखाडा परिषदेचे प्रमुख साधू महंत उपस्थित होते. वृक्षारोपण कार्यक्रमाला त्र्यंबकेश्वरच्या १० तसेच नाशिकच्या ३ आखाड्यांचे प्रमुख उपस्थित होते. शहरात चार वेगवेगळ्या ठिकाणी १५ हजार वृक्ष लावले जाणार आहेत. आज पहिल्या टप्प्यात चार ठिकाणी १००० वृक्षांचे रोपण करण्यात आले.तपोवनातील झाडे तोडण्यावरून मला टार्गेट केले जात आहे. काही राजकीय विरोधकांनी तर माझे कार्टून काढलं मला लाकूडतोड्या म्हटले. मात्र माझे निसर्गावर प्रेम आहे. पंतप्रधानांचे देखील निसर्गावर प्रेम आहे. काहीजण बोलण्याच्या ओघात जास्त बोलून गेले. कुंभमेळ्याची गरज काय, साधू संत गांजा प्यायला येतात हे बोलणं आम्ही खपवून घेणार नाही. १५ हजार पैकी एकही झाड मरणार नाही. ही झाडे १३०० किलोमीटर वरून आम्ही आणली आहेत. मी स्वतः हैदराबादवरून राजमुंद्रीला गेलो पूर्ण एक दिवस देउन झाडांची निवड केली. पहिल्या टप्प्यात १२ ते १५ फुटांची २००० झाडे आणली आहेत. इतरही झाडे लवकर येतील. गेल्या कुंभमेळ्यात जेवढ्या राहुट्या होत्या, तेवढ्याच यावेळी असणार आहे. आम्हाला काही झाडे, झुडूपे काढावी लागतील. जी झाडे काढली त्याचे दुस-या ठिकाणी पुनर्रोपण करू. गेल्यावेळेची झाडे ७० टक्के जगली आहेत, असे कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटले आहे.

## तेजस्वी घोसाळकर भाजपमध्ये

**मुंबई/ प्रतिनिधी-**मुंबई महापालिका निवडणुकीपूर्वी ठाकरे गट शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. तेजस्वी घोसाळकर यांनी ठाकरे गट शिवसेना पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्या. महापालिका निवडणुकीपूर्वी मुंबईतील ही मोठी घडामोड आहे. घोसाळकर कुटुंब हे ठाकरे कुटुंबाशी निष्ठावंत मानले जाते. मनीषा चौधरीहीसर विधानसभेच्या आमदार आहेत. पण त्यांच्याआधी शिवसेना नेते विनोद घोसाळकर दहिसर विधानसभेचे आमदार होते. तेजस्वी घोसाळकर या त्यांच्या सूनबाई आहेत. तेजस्वी घोसाळकर यांचे पती अभिषेक घोसाळकर यांचं एका दुर्दैवी घटनेत निधन झालं होतं. त्याआधी वॉर्ड क्रमांक १ मधून अभिषेक घोसाळकर २०१२ ते २०१७ पर्यंत नगरसेवक होते. त्यांच्यानंतर तेजस्वी घोसाळकर २०१७ ते आतापर्यंत नगरसेविका होत्या. पण वार्ड क्रमांक १ साठी आता ओबीसी आरक्षण घोषित झालं आहे. त्यामुळे तेजस्वी घोसाळकर वॉर्ड क्रमांक ७ किंवा ८ आणि संधी मिळाली तर वॉर्ड क्रमांक २ मधूनही निवडणूक लढवू शकतात असं म्हटलं जात होत. पण त्याआधीच त्यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिली आहे. आज त्या भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्या. विनोद घोसाळकर हे मुंबई उपनगरातील ठाकरे गटाचे एक मोठं नेते आहेत. मातोश्रीसोबत त्यांची विशेष जवळीक मानली जाते. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड पुकारल्यानंतरही विनोद घोसाळकर हे उद्धव ठाकरे यांच्यासोबतच राहिले. पण त्यांच्या सूनेने तेजस्वी घोसाळकर यांनी वेगळा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. ठाकरे गट शिवसेना सदस्यत्वाचा राजीनामा देत असताना तेजस्वी घोसाळकर यांनी एक भावनिक पोस्ट केली आहे. आज आपल्याशी संवाद साधताना माझं मन प्रचंड उद्विग्न झालं आहे. आयुष्यात असा क्षण कधी येईल आणि असे शब्द लिहावे लागतील, याची कल्पनाही मी कधी केली नव्हती. आज मन जड आहे शब्द अपुरे पडत आहेतङ्घपण तरीही हा संवाद आवश्यक आहे.असं तेजस्वी घोसाळकर यांनी लिहिलं आहे.




## मुख्यमंत्र्यांचा दौरा;शिक्षिकेचा मृत्यू

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील नवले पुलानंतर कात्रज, कोंढवा रस्ता मृत्यूचा सापळा ठरतोय. सोमवारी या परिसरात झालेल्या एका अपघातात शिक्षिकेला प्राण गमवावे लागले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्रमासाठी वाहतूक वळवताना नियोजनाचा अभाव दिसून आला. त्यातून निर्माण झालेल्या कोंडीत अडकून अपघातग्रस्त शिक्षिकेला वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत आणि त्यातच तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. इस्कान चौकाच्या पुढे हनुमान मंदिराजवळ ही घटना घडली. रमा कापडी (वय ५३, रा. कात्रज, कोंढवा रोड) असे मृत्युमुखी पडलेल्या दुर्दैवी महिलेचे नाव आहे. नेहमीप्रमाणे त्या दुचाकीवरून जात असताना, रस्ता वळवण्यात आल्याची कल्पना न आल्याने त्या घाईत उलट्या दिशेने गेल्या. याच वेळी त्या एका भरधाव कंटेनरच्या चाकाखाली सापडल्या. अपघातात त्यांच्या पायाला गंभीर दुखापत होउन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सेलेब्रिटी मेस्सी

कोलकात्यातील विवेकानंद युवा क्रांती मैदानात अर्जेंटिनाचा फुटबॉल स्टार लियोनेल मेस्सी याचे आगमन झाल्यावर त्याला पाहण्यासाठी हजारो प्रेक्षकांनी गर्दी केली होती. त्यामुळे शानदार समारंभाचे रूपांतर अभूतपूर्व गोंधळात आणि निषेध निदर्शनांत झाले. प्रचंड रक्कम भरून हजारो प्रेक्षकांनी मेस्सीच्या एका दर्शनासाठी या मैदानात गर्दी केली होती पण त्यांच्या पदरी अखेर निराशाच आली आणि चाहत्यांचा संताप झाला. नंतर जे झाले ते कधीही न कल्पना केलेले होते. बकेट, सीट्स, व्हीआयपी सोफ्यांची मोडतोड आणि जेथे हा कार्यक्रम होता तेथे नासधूस आणि काही ठिकाणी तर आग लावण्यात आली. अखेर आयोजकांना मेस्सीची भेट थोड्या वेळातच आटोपती घ्यावी लागली. आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणी चौकशी जाहीर केली आणि कार्यक्रमाची गैरव्यवस्था आणि गोंधळ का झाला याचा तपास सुरू आहे. पण या प्रकारात भारताची अब्रू गेली आणि जो देश विकासाच्या वाटेवर आहे त्याची लक्तरे कोलकात्यात निघाली. लोकांनी एका तिकिटासाठी तब्बल दहा हजार आणि १२ हजार इतके प्रचंड पैसे मोजले होते. पण त्यांना मेस्सीचे दर्शनही नीट होऊ शकले नाही. ममता बॅनर्जी यांनी या प्रकरणी चौकशी जाहीर करताना मेस्सीची मनापासून माफी मागितली आणि या दुर्दैवी प्रकाराबद्दल आयोजकांना दोषी ठरवले. पण मुळात आपल्याकडे अशा कार्यक्रमांसाठी चोख व्यवस्था नाही? मेसीसारखे लोकप्रिय खेळाडू आपल्याकडे येत असताना आपल्याकडे अशा वेळेस प्रचंड गर्दी कशी हाताळायची त्याचे तंत्रच नाही? मुळात हे साल्ट लेक स्टेडियम इतक्या सेलेब्रिटीचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पुरेसे होते का हा प्रश्न आहे. त्या ऐवजी इडन गार्डन या स्टेडियमवर हा कार्यक्रम ठेवला असता, तर अशी गर्दी आणि ममता सरकारची बेअब्रूही झाली नसती. आता मेस्सीचा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या आयोजकाला पोलिसांनी विमानतळावर अटक केली आहे. त्याच्याविरोधात आता कडक कारवाई केली जाणार असे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. आता या गोंधळाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जोरदार शाब्दिक युद्ध जुंपले आहे. या गैरव्यवस्थेबद्दल दोघांनीही एकमेकांवर जबाबदार असल्याचे आरोप केलेत. पण सर्वात जास्त जबाबदारी ही तृणमूल काँग्रेसची होती. कारण तो पक्ष सत्ताधारी आहे. पश्चिम बंगालमध्ये २०२७ मध्ये विधानसभा निवडणूक होत आहे. त्यादृष्टीने ममतांसाठी हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडणे हे महत्त्वाचे होते. पण कोलकाता प्रशासन त्याबाबतीत अपयशी ठरले.कोलकाता, गोवा या शहरात फुटबॉल हा खेळ लोकप्रिय आहे. त्यामुळे या शहरांना वेगळाच दर्जा आहे. हे लक्षात घेऊन तरी निदान कोलकात्यात तरी फुटबॉल इव्हेंट असला तर तो व्यवस्थित पार पडावा अशी तेथील राज्य सरकारांनी दक्षता घ्यायला हवी. पण राज्य सरकारने आपली जबाबदारी नीट पार पाडली नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. या सर्व प्रकारात एकच गोष्ट समोर आली आहे ती म्हणजे गर्दी व्यवस्थापन आणि तिचे तंत्र याबाबतीत आपण अजून खूप मागे आहोत. गर्दीचे व्यवस्थापन आणि राजकारण यांची सरमिसळ यात आपण कुशल नाही हे या घटनेवरून सिद्ध झाले. जी घटना कोलकात्यासाठी ऐतिहासिक प्रसंग होऊ शकली असती ती या गैरव्यवस्थेमुळे आणि चाहत्यांच्या गोंधळामुळे बाजूला पडली आणि राजकीय युद्ध सुरू झाले. आता यातून मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा घटना घडतात तेव्हा त्यांची जबाबदारी निश्चित केली जाणे आवश्यक आहे. कायदा आणि सुव्यवस्था कोसळण्यास जे प्रसंग घडले ते भविष्यात पुन्हा घडू नयेत अशी उपाययोजना आपण करायला हवी. आता राज्यपालांनीही सी. व्ही.आनंदा बोस यांनी आयोजकांवर प्रखर टीका केली आणि ते म्हणाले की अत्यंत निष्ठूरपणे आयोजकांनी लियोनेल मेसीची गोट इंडिया टूर आयोजित केली आणि फुटबॉल प्रेमींच्या भावनांकडे दुर्लक्ष केले. आयोजकांनी या प्रकरणी केवळ आपल्या तुंबड्या भरून घेण्याकडे लक्ष दिले आणि त्यात प्रेक्षकांकडे दुर्लक्ष करून त्यांच्या भावनांचा खेळ केल्याचा आरोप केला जात आहे.आपल्याकडे परदेशी खेळाडू आणि अभिनेत्यांचे आकर्षण आहे आणि याचेच प्रत्यंतर आले. त्यामुळे अनेक मंत्री, खासदार आणि आमदारांनी मस्सीला पाहण्यासाठी गर्दी केली होती. हजारो लोक मेस्सीला पाहण्यासाठी आले होते पण त्याची झलकही पाहू शकले नाही. काही प्रेक्षकांनी हा गैरव्यवहार असल्याचा आरोप केला. सुरक्षा व्यवस्थेचे या सर्व प्रकारात तीनतेरा वाजलेच. लियोनेल मेस्सीच्या आगमनाने फुटबॉल प्रेमी आनंदित झाले होते पण त्यांना निराशाच पदरी आली. आता बऱ्याच फुटबॉल प्रेमींनी विश्वासघात झाल्याचे जाणवते अशी प्रतिक्रिया दिली आहे आणि ती योग्य आहे. कारण या गोंधळाला जबाबदार सर्वस्वी आयोजकांचे गैरव्यवस्थापन आणि सावळागोंधळ होता. मेस्सीच्या कार्यक्रमाला साल्ट लेक स्टेडिमवर ८० हजार लोक जमले होते. त्यांनी गैरव्यवस्थापनामुळे तोडफोड केली. कोलकाता म्हणजे सिटी ऑफ जॉय म्हटले जाते, पण ८० हजार प्रेक्षकांसाठी सिटी ऑफ डिसॅस्टर ठरले. फुटबॉल चाहत्यांसाठी ही सायंकाळ म्हणजे मोडतोडीचा कार्यक्रम ठरला. साल्ट लेक स्टेडियमवरील आसनव्यवस्था मोडीत काढण्यात आली. चाहत्यांचा अमूल्य वेळ आणि अफाट पैसा यात वाया गेला आणि त्याची आयोजकांना ना खंत ना खेद. त्यामुळे असे प्रकार होऊ नयेत असे वाटत असेल तर आयोजकांनी अतिदक्षता घेतली पाहिजे. बहिष्कार हा उपाय नाही पण लोकांनीही अशा कार्यक्रमांना जाण्यापूर्वी हजारवेळा विचार केला पाहिजे. मेस्सीचे दर्शन दुर्मीळ पण जेव्हा घडतो तो प्रसंग आयुष्यातला यादगार प्रसंग बनला पाहिजे. मेस्सी मानिया हे सांगतो, की कोलकात्यात मेस्सीचे दर्शन ज्यांना घडले नाही, त्यांना पैसे मोजूनही काहीच पदरी पडले नाही. कोलकात्यातील लोक निश्चितच असे कमनशिबी नाहीत.

# तिरूवनंतपुरम महापालिकेवर भाजपाचा झेंडा!

**भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआने तिरूवनंतपुरम महानगर पालिकेतील विजयासह एक जिल्हा पंचायत,५० ब्लॉक पंचायत आणि १३६३ ग्रामपंचायतींमध्ये यश संपादन केले आहे.इतकी वर्षे केरळमध्ये संघर्ष करणाऱ्या, भाजपाची, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतील ही सर्वोत्तम कामगिरी मानावी लागेल.**



केरळमध्ये नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीने भव्य यश मिळवले आहे.या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआने तिरूवनंतपुरम महानगर पालिकेत विजय मिळवून इतिहास घडवला आहे.गेली ४५ वर्षे सलगपणे तिरुवनंतपुरम महानगर पालिका आपल्या ताब्यात ठेवणाऱ्या, मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीचा या खेपेच्या निवडणुकीत भाजपा प्रणीत रालोआने पराभव केला असून, केरळमधील सत्ताधारी डाव्या लोकशाही आघाडीसाठी हा मोठाच धक्का मानावा लागेल.

१०१ सदस्यांच्या तिरुवनंतपुरम महानगर पालिकेत भाजपा प्रणीत रालोआचे ५० सदस्य विजयी झाले आहेत.महापालिकेत गेल्याखेपेस सत्तेवर असणाऱ्या डाव्या लोकशाही आघाडीला यावेळी फक्त २९ जागांवर विजय मिळाला आहे,तर काँग्रेस प्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला केवळ १९ जागांवर विजय मिळाला आहे.भाजपाच्या दृष्टीने दिलासा देणारी गोष्ट म्हणजे तिरुवनंतपुरम महानगर पालिका निवडणुकीत विजय मिळवून, भाजपाने आपले प्रतिस्पर्धी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि काँग्रेस यांना एक प्रकारे इशारा दिला आहे.

गेली कित्येक वर्षे भाजपा, केरळमध्ये आपले पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहे.मात्र मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डावी लोकशाही आघाडी आणि काँग्रेस प्रणीत संयुक्त लोकशाही आघाडी या केरळमधील प्रमुख आघाड्यांसमोर भाजपाची डाळ शिजत नव्हती.वरील दोन आघाड्या गेली अनेक वर्षे केरळमध्ये आलटून पालटून सत्तेवर येत आहेत.मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीत,सीपीआय, सेक्युलर जनता दल,केरळ काँग्रेस (एम) आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे, तर काँग्रेस प्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीत इंडियन युनियन मुस्लिम लीग, केरळ काँग्रेस (जोसेफ),केरळ काँग्रेस (जॅकोब),रिव्हॉल्युशनरी सोशालिस्ट पार्टी आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे.भाजपा प्रणीत रालोआमध्ये भारत धर्म जनसेना आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे.

भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआने तिरूवनंतपुरम महानगर पालिकेतील विजयासह एक जिल्हा पंचायत,५० ब्लॉक पंचायत आणि १३६३ ग्रामपंचायतींमध्ये यश संपादन केले आहे.इतकी वर्षे केरळमध्ये संघर्ष करणाऱ्या, भाजपाची, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतील ही सर्वोत्तम कामगिरी मानावी लागेल.२०१६ मध्ये झालेल्या केरळ विधानसभा निवडणुकीत भाजपाचे नेते ओ.राजगोपाल हे नेमोम मतदार संघातून विजयी झाले होते.केरळ विधानसभा निवडणुकीच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपाचा आमदार विधानसभेत निवडून आला होता.२०१४ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तिरुवनंतपुरम मतदार संघातून भाजपाचा उमेदवार अगदी कमी मतांच्या फरकाने पराभूत झाला होता.२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत केरळमधील त्रिशूर मतदार संघात भाजपाच्या सुरेश गोपी यांनी मिळवलेला विजय हा ऐतिहासिक होता. तिरुवनंतपुरम महापालिकेत भाजपाला विजय मिळाल्याने,२०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत, तिरूवनंतपुरम मतदार संघात विजय मिळवणे भाजपासाठी अवघड असणार नाही.तसेच तिरुवनंतपुरम लोकसभा मतदारसंघात, विधानसभेच्या ज्या जागा येतात त्यापैकी एक दोन जागा भाजपा जिंकू शकेल.

२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत केरळमध्ये मोठा विजय मिळवणाऱ्या काँग्रेस प्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही आपली विजयी घोडदौड सुरूच ठेवली आहे.केरळमधील सहा महानगर पालिकांपैकी चार महानगर पालिकांत विजय मिळवून संयुक्त लोकशाही आघाडीने, डाव्या लोकशाही आघाडीचा दारुण पराभव केला आहे.कोल्लम,कोची,त्रिशूर आणि कन्नूर या महानगर पालिका संयुक्त लोकशाही आघाडीने जिंकल्या आहेत.कोझीकोडे महानगर पालिकेत डाव्या लोकशाही आघाडीला विजय मिळाला असून, केरळमधील सर्वात मोठी महानगर पालिका (तिरूवनंतपुरम) भाजपा प्रणीत रालोआने जिंकली आहे.

पुढील वर्षी केरळमध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत आणि नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मोठे यश मिळाल्याने काँग्रेस प्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीचे मनोबल निश्चितच वाढले असेल.२०१६ आणि २०२१ मध्ये झालेल्या केरळ विधानसभा निवडणुकीत विजय मिळवणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीला २०२६ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळवून विजयाची हॅट्ट्रिक साध्य करायची आहे.मात्र लोकसभा निवडणूक आणि नंतर झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील डाव्या लोकशाही आघाडीच्या दारूण पराभवानंतर, पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळवणे डाव्या लोकशाही आघाडीसाठी सोपे असणार नाही.

**अभय गोखले**

# केरळमध्ये भाजप-संघाचा ‘कमळ’ बहर!

केरळमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सामाजिक कार्याला आता यश मिळत असून, तेथील कार्यकर्त्यांची संख्या वाढत आहे आणि त्याचा समाजावर प्रभाव दिसून येत आहे. काहीवेळा राजकीय विरोध असला तरी, संघ आपली कार्यपद्धती सुधारून समाजात हिंदुत्व आणि राष्ट्र उभारणीचे कार्य करत आहे. याचा परिणाम आता हळूहळू दिसून येत आहे. यासाठी मागील तीस-चाळीस वर्षांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी येथील सामाजिक कार्यासाठी आपले मोठे योगदान दिले आहे, तसेच अनेकांनी बलिदानही दिले आहे.

संघावर काहीवेळा धार्मिक ध्रुवीकरण आणि समाजातील एका विशिष्ट गटाकडे झुकण्याचा आरोप केला जातो, परंतु संघाचे स्वयंसेवक नेहमीच या आरोपांना नकार देत आले आहेत. कितीही आरोप झाले तरी ते आपले काम निष्ठेने आणि नि:स्वार्थपणे करीत आहेत.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचा मुख्य उद्देश ‘राष्ट्र उभारणी’ आणि ‘नि:स्वार्थ सेवा’ आहे. येथील संघाच्या स्वयंसेवकांनी नैसर्गिक आपत्ती आणि आपत्कालीन परिस्थितीत नेहमीच अग्रभागी राहून काम केले आहे.उदा. पूर, त्सुनामी किंवा करोनासारख्या महामारीच्या काळात स्वयंसेवकांनी पीडित लोकांना मदत,अन्न आणि निवारा पुरवण्याचे कार्य अत्यंत समर्पितपणे, सातत्याने केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित अखिल भारतीय शैक्षणिक संस्था, विद्याभारती केरळमध्ये अनेक शाळा चालवते. यापैकी अनेक शाळा मागासवर्गीय आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आहेत.



भाजप हा एक राष्ट्रीय राजकीय पक्ष आहे. या पक्षाची विचारधारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न आहे. या सगळ्यांचा राजकीय परिणाम केरळच्या निवडणुकीत दिसून पडत आहे. राज्यातील इतिहासात पहिल्यांदा गेल्या लोकसभा निवडणुकीत त्रिशूरमध्ये भाजप खासदार सुरेश गोपी विजयी झाले. राज्यातील लोकसभा निवडणुकीत भाजपला एकूण मतदानापैकी १६.६८% मते मिळाली, तर सीपीआय(एम) आणि काँग्रेसला अनुक्रमे २५.८२% आणि ३५.०६% मते मिळाली. भाजप-भारत धर्म जनसेना युतीला १९.२१% मते मिळाली होती.

नुकत्याच दोन टप्प्यात पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राज्याची राजधानी असलेल्या तिरुवनंतपुरमसह त्रिपूनिथुरामध्ये भाजपचा विजय झाला. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने तिरुवनंतपुरम महापालिका निवडणूक जिंकली, त्याचबरोबर केरळमधील सत्ताधारी डाव्या लोकशाही आघाडीचा त्रिपूनिथुरा नगरपालिका निवडणुकीत पराभव केला. या दोन्ही शहरांमधील पालिका सत्ता काबीज करण्यासाठी भाजपने चार दशकांचा संघर्ष कायम ठेवला होता. तिरुवनंतपुरममध्ये पहिल्यांदा भाजपचा महापौर बसणार आहे.

केरळच्या लोकसंख्येचा विचार केला तर केरळमध्ये ४५टक्के लोकसंख्या मुस्लीम आणि ख्रिश्चन लोकांची आहे. येथील हिंदू ५४ टक्के आहेत आणि वेगवेगळ्या विचारसरण्यांमध्ये वाटले गेले आहेत. यातले बहुसंख्य आजपर्यंत डाव्या पक्षांचं समर्थन करीत होते. आज येथील ख्रिश्चन समाज हा उच्चभ्रू आणि शैक्षणिक दृष्टीने मोठा आहे. येथील ख्रिश्चनांना हे समजले आहे की भाजप जरी मिशनऱ्यांच्या विरोधात असला तरी तो एकंदरीत समाजाचे कधीही नुकसान करणार नाही.

सातत्याने कट्टरपंथी इस्लामवाद्यांचे समर्थन सत्तारूढ पक्षाला हानिकारक ठरत आहे. ‘लव्ह जिहाद’ ही समस्या मोठ्या प्रमाणात आहे. मध्यंतरी केरळमध्ये सायरो-मालाबार चर्चच्या पाल डायससच्या बिशपने त्यांच्या डायससच्या पाद्र्यांना एक पत्र लिहिले होते.त्यात त्यांनी डायससशी संबंधित कुटुंबातील मुलींना ‘काही समुहाचे लोक फसवण्याचे प्रयत्न करत असल्यामुळे त्यांच्यापासून सावध राहा’, असा सल्ला दिला होता. या पत्रामध्ये बिशप मार जोसेफ कल्लारंगट यांनी विशिष्ट समुहाचा उल्लेख केला नसला, तरी ख्रिस्ती युवतींना ‘लव्ह जिहाद’पासून सावध करण्यासाठीच हा इशारा होता. अशा प्रकारे, या सगळ्या सामाजिक-राजकीय बदलांचा, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अथक प्रयत्नांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या बलिदानाने आज चार दशकानंतर केरळमध्ये कमळ फुलले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी मागील चार दशकांत दिलेल्या योगदान आणि बलिदानामुळे, तसेच राज्यातील सामाजिक-राजकीय बदलांमुळे आज केरळमध्ये कमळ फुलले आहे. ‘राष्ट्र सेवा’ आणि ‘संघटन’ या तत्त्वांवर आधारित कार्य भविष्यात केरळच्या राजकारणावर अधिक मोठा प्रभाव टाकण्याची शक्यता आहे.

**अविनाश देशपांडे**

## अनेक शहरांवर बुडण्याचे संकट

आयपीसीसी २०२३ च्या अहवालानुसार जागतिक तापमानवाढ ही समुद्राच्या पाणीपातळीत वाढ , औष्णिक विस्तार व हिमालयीन बर्फ वितळणे याला जबाबदार आहे . त्यामुळे जागतिक तापमान वाढ हे भविष्यकाळातील फार मोठे संकट मानव जातीला होणार आहे. सुंदरबन मधील खारफुटीची जंगले जगातील सर्वात मोठी नसर्गिक ठेवा मानले जाते पण हवामान बदलामुळे ही बने नष्ट होत चालली आहेत.भांगाडुनी व जंबुद्वीप ही दोन बेटे केव्हाच नाहीशी झाली आहेत.देशातील खारफुटीचे आच्छादन २०२१ पासून ७.४३ चौरस किलोमीटरने कमी होत चालले आहे . महाराष्ट्रातील मुंबई हे शहर दरवर्षी दोन मिलीमीटर ने कमी होत आहे.याचा परिणाम जवळपास दोन कोटी लोकांवर झाला आहे . केरळमधील कोची हे शहर कि जेथे सुमारे ५ लाखाहून अधिक लोकांवर परिणाम झाला आहे सर्वसाधारण पणे २०५० पर्यंत ११३ किनारी शहराचे काही भाग पाण्याखाली जाऊ शकतात.भावनगर,कोची, विषागपट्टणम ,कोलकत्ता , चेन्नई, ,मुंबई ही २०५० पर्यंत पाण्याखाली जाणारी शहरे आहे.

**शांताराम वाघ**

## बालपण डिजिटल संकटात

खासदार सुधा मूर्ती यांनी राज्यसभेच्या हिवाळी अधिवेशनात लहान मुलांच्या सामाजिक माध्यमांवर झळकण्याच्या प्रकाराविषयी महत्त्वाचे भाष्य केले आहे.त्यांनी मुलांना ऑनलाइन कंटेंट मशीन म्हणजेच ऑनलाइन सामग्री प्रसारित करणारी यंत्रे बनविण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याचे सांगितले. लहान वयात अशा प्रदर्शनामुळे मुलांची दीर्घकालीन मानसिक हानी होऊ शकते.त्यामुळे सरकारने डिजिटल कंटेंटसाठी नियम करण्याची मागणी केली आहे.अनेक पालक जाणते-अजाणतेपणे मुलांच्या भावनिक विकासावर,गोपनीयतेवर आणि बालपणावर होणाऱ्या दीर्घकालीन परिणामांची जाणीव न ठेवता लाईक्स, व्हूज आणि कमाई साठी त्यांच्यावर सतत व्हिडिओमध्ये दिसण्यासाठी दबाव आणतात.बालपण हा खेळणे,शिकणे आणि निरागसता यांनी भरलेला टप्पा मानला जातो. त्याऐवजी ऑनलाइन कंटेंटच्या प्रवाहात अडकल्यामुळे मुले स्वतःला मोबाईलच्या कॅमेरात बंदिस्त करतात.त्यामुळे त्यांचे जीवन सामाजिक माध्यमांच्या हातात गेले आहे. नृत्य, गाणे, नकला, विनोद, गोंडस बोलणे - हसणे ते पोशाखांच्या चित्रीकरणापर्यंत अनेक प्रकारच्या रिल्समध्ये मुले वारंवार दिसतात.ज्याचे व्हिडिओ अति वेगाने पसरतात त्यामुळे लहान मुले सार्वजनिक व्यक्तिरेखा बनू लागली आहे आणि अनोळखी लोकांकडून त्यांचे मूल्यांकनही होत आहे.या दोन्हीचा अर्थ लहान मुलांना समजत नाही आणि पालकांना तो समजून घ्यायचा नाही अशी आजची स्थिती आहे.मुले लाईक आणि कमेंट्स वर अवलंबून राहू लागल्यामुळे खरे यश आणि आनंद याविषयीची त्यांची समज विकृत होऊ शकते. पालकांनी हा धोका ओळखून ट्रेंड आणि अलगोरिदम पेक्षा मुलांवर संस्कार करणे, खेळ खेळायला लावणे, चांगल्या सवयी लावणे याकडे लक्ष केंद्रित करायला हवे.भारत सरकारने ही बालपणातील डिजिटल संकटाच्या निवारणासाठी नियम लागू करणे आवश्यक आहे त्यामुळे सामाजिक माध्यमांमुळे हरवत चाललेले मुलांचे बालपण सावरण्यासाठी भारत सरकारकडून कठोर नियमावलींची आणि कारवाईची अपेक्षा आहे.

**लीना गाडगीळ**

# विदर्भालाही अमली पदार्थांचा विळखा

विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील कारंजा या छोट्या गावात तब्बल १९२ कोटी रुपयांचे एमडी ड्रग्स जप्त झाल्याच्या धक्कादायक प्रकरणाने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. दिल्लीहून आलेल्या डायरेक्टरेट ऑफ रेवेन्यू इंटेलिजन्स (DRI) च्या पथकाने ही कारवाई केली असून, स्थानिक पोलिस यंत्रणेला याची कोणतीही कल्पना नसल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या प्रकरणावर स्थानिक भाजप आमदार सुमित वानखेडे यांनी महाराष्ट्र पोलिसांवर ताशेरे ओढले आहेत.वर्धा जिल्ह्यातील कारंजा सारख्या छोट्या गावात १९२ कोटी रुपयांचे एमडी ड्रग्स मिळणे अत्यंत चिंतेची बाब आहे.वर्धा गांधींचा जिल्हा आहे. वर्धा जिल्ह्यात दारूबंदी असताना मादक पदार्थांची विक्री व रॅकेट चालत असताना पोलीस काय करत होते?

विशेष पथकाने या धडक कारवाईत तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, बेकायदेशीर ड्रग्ज निर्मितीसाठी उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या भट्ट्या, मोठी भांडी, केमिकल्स आणि विविध उपकरणेही जप्त करण्यात आली. परिसरात मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज तयार केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले होते.नागपूर शहरासह नागपूर तालुका व ग्रामीणमधील कळमेश्वर तालुक्यात अंमली पदार्थांपासून दूर राहिलेले युवक आता एम.डी (मेथैम्पेटामिन) पावडरच्या व्यसनात अडकत आहेत.ग्रामीण भागातही पावडरची तस्करी मोठ्या प्रमाणात होत असून, काही टोळ्यांकडून तरुणांना स्वस्त दरात ते उपलब्ध करून दिले जाते. नुकतेच गुन्हे शाखेच्या युनिट क्र,५ ने कारवाई करुन ५ लाख ४२ हजार रुपयांचे एम.डी.पावडर जप्त केल्याच्या घटनेवरुन ग्रामीण भागातील चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

नागपुरात शेजार चंद्रपुरात गांजासह गर्दा पावडर, डुडा भुकटीची धूम -दारूबंदीनंतर ड्रग्सला समांतर अशा गर्दा पावडर, डुडा भुकटी, गांजा यासारख्या अमली पदार्थांचे अड्डेच तयार झाले होते. तेलंगणा, मध्यप्रदेशातून वर्ध्यात येतो गांजातेलंगणा,कर्नाटक, मध्य प्रदेशासह इतर नक्षलबहुल डोंगराळ भागातून रेल्वे, एसटी तसेच स्पेअरपार्ट्स वाहतुकीच्या माध्यमातून वर्धा जिल्ह्यात गांजा येतो. पाच वर्षांत ५० कारवाया झाल्या. शहरात सुमारे शंभरावर गांजाविक्रेते सापडले होते. अमरावती जिल्ह्यात देखील पाच वर्षांत ८२ कारवायांमध्ये १ कोटी ५५ लाख ५० हजार २१९ रुपयांचा गांजा जप्त व १२७ आरोपींना अटक करण्यात आली होती.आंध्र प्रदेश व तेलगंणा राज्यातून गांजा जिल्ह्यात येतो. गोंदिया -गोंदियात गांजा, ब्राऊन शुगर, इंजेक्शन व गोळ्यांचेही सेवन करून नशा केली जाते. .भंडारा - मध्य प्रदेशातून आयात गांजाची जिल्ह्यात ठिकठिकाणी विक्री केली जाते. यवतमाळ जिल्ह्यात तेलंगणा व मध्य प्रदेशातून गांजा येतो.

तरुणाईला अमली पदार्थाच्या विळख्यापासून दूर ठेवण्यासाठी विविध महाविद्यालयांत समुपदेशन करण्यात येत असताना देखील तरुण अंमली पदार्थांच्या आहारी जात आहे.

वेळेत पावले उचलली नाहीत, तर ही समस्या भयावह रूप धारण करू शकते.एमडी पावडरमुळे मानसिक विकृती, चिडचिड, झोपेचा अभाव, आत्महत्येचे विचार यासारखे परिणाम होतात. या व्यसनामुळे ग्रामीण भागातील तरुण शैक्षणिक व सामाजिक मार्गांपासून भरकटत आहेत. शहरातील टोळ्यांचे ग्रामीण क्षेत्रात जाळे, नागपूर व अकोल्यातील टोळ्यांनी गावागावात एजंट तयार केले असून, हे एजंट तरुणांना आधी नशेच्या गर्तेत ओढतात व नंतर त्यांच्याच हातून विक्री करवून घेतात.

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल**
वर्धा-९५६१५९४३०६

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# खाकी वर्दीतील ‘धीर’ ठरला महागात !

## यवतमाळच्या मातीत नरेश रणधीर गारद, लाचखोरीच्या अटकेमागे गुन्हेगारी दबदबा, आर्थिक वसुली आणि संतापाची ठिणगी

जनमाध्यम प्रतिनिधी





यवतमाळ : शहर व जिल्ह्यात काही ठळक नाव हे व्यवहार, वाद आणि पोलिसी हस्तक्षेपाशी जोडले गेलेले सुप्रसिद्ध नाव मानले जाते. या पार्श्वभूमीवर व्यवहारातील रक्कम परत मिळवण्यासाठी पोलीस खात्याचा आधार घ्यावा लागेल असा अनुभव नाही. हाच ‘अनुभव’ आणि स्थानिक वास्तवाचा चुकीचा अंदाज अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे ठाणेदार नरेश रणधीर यांना अटक होण्यास कारणीभूत ठरल्याची चर्चा सध्या शहरात रंगली आहे.

१२ डिसेंबर रोजी यवतमाळ येथील नव्या इमारतीत स्थलांतरित झालेल्या अवधूतवाडी पोलीस स्टेशनचे ठाणेदार नरेश रणधीर यांना अमरावती अँटी करप्शन ब्युरोने एक लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली. ही कारवाई जरी लाच स्वीकारण्यापुरती मर्यादित असली, तरी यामागील घटनाक्रम अत्यंत गुंतागुंतीचा व गंभीर असल्याचे चित्र शहरात उमटत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, तक्रारदारावर झालेला मानसिक ताण, आर्थिक पिळवणूक आणि गुन्हेगारी वर्तुळात असलेला ठाणेदारांचा कथित दबदबा यामुळेच हा स्फोट झाला की काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. खाकी वर्दीच्या आधारे मिळणारी कथित ‘अहवेलना’ आणि अरेरावीचा अनुभव अनेकांनी घेतल्याची चर्चा आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी एका प्रतिष्ठित डॉक्टरांच्या खासगी ड्रायव्हरविरोधात एका हिंदू कुटुंबातील मुलीच्या संदर्भात अवधूतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मात्र अपेक्षित कारवाई न होता संबंधित व्यक्तीला अभय देण्यात आले आणि मोठी आर्थिक उलाढाल झाल्याची माहिती बाहेर येत आहे. या प्रकरणात राजकीय नेत्यांनी मध्यस्थी करून प्रकरण थांबवण्याची विनंती केल्याचेही बोलले जात असले, तरी आर्थिक व्यवहारांमुळे कारवाई टळल्याचा आरोप शहरात ऐकू येतो. या घटनेमुळे आधीच संतप्त असलेल्या तक्रारदाराच्या मनात रोष निर्माण झाला. काही असंवेदनशिल सारख्या गंभीर प्रकरणात काहींना कथित त्रास दिला जात असताना, तर काहींकडून मोठ्या रकमा वसूल केल्या गेल्याचे आरोप आहेत. संबंधित व्यक्तीला पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिसू नये, असा दम दिल्याची चर्चाही आहे. या सर्व घटनांमुळे ठाणेदारांची अरेरावी वाढत गेली आणि ‘कायमचा बंदोबस्त’ व्हावा या हेतूनेच जवळपास तीन महिन्या पासून प्रयत्न सुरू ठेवत एसीबीकडे तक्रार गेल्याचे बोलले जात आहे. याचबरोबर, अवधूतवाडी पोलीस स्टेशनमध्ये तडजोडीचा मार्ग काढण्यासाठी ‘चिरीमिरी’शिवाय काम होत नसल्याची कुजबुज असून, आर्थिक पिळवणूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे या प्रकाराला खाकी वर्दीतील काही कर्मचारीही त्रस्त असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. शासकीय वर्तुळात आणखी एक चर्चा रंगली आहे ती म्हणजे नरेश रणधीर यांना दुसऱ्या शाखेतील पीआय होण्याची तीव्र इच्छा होती. त्या अनुषंगाने आजी-माजी नेते आणि पालकत्व स्वीकारलेल्या राजकीय व्यक्तींकडे शिफारसीसाठी प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. यासाठीच मोठ्या प्रमाणावर आर्थिक ‘माया’ गोळा करण्याचा सपाटा लावण्यात आला आणि हीच हव्यासाची साखळी अखेर अँटी करप्शन ब्युरोच्या जाळ्यात अडकली, अशी चर्चा शहरभर सुरू आहे. खाकी वर्दीचा धीर, सत्ता-संपत्तीचा हव्यास आणि स्थानिक वास्तवाचा चुकीचा अंदाज यवतमाळच्या मातीतच ठाणेदार रणधीर गारद झाले, अशीच भावना आता उघडपणे व्यक्त केली जात आहे.

# पुसद सां.बां.विभाग न्यायालयीन इमारतीला न्याय कधी देणार ?

## दोन महिन्यापूर्वी पैसे जमा केले : परंतु मर्जीतील ठेकेदारांना काम देण्यासाठी अडले !

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - येथिल सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता यांचे मार्फत ई निविदा सुचना क्रमांक ०७/२५-२६ जा.क्रं.३५३८/निली/ दिनांक २२/०९/२०२५ रोजी क्रं. एक ते पंधरा पर्यंतच्या निविदा/नोटीस काढण्यात आल्या होत्या.

यापैकी महत्त्वाचे अर्जंट काम असल्यामुळे वि.दिवाणी व फौजदारी न्यायालयाची भव्य दिव्य इमारत उभी असुन सदर इमारतीचे डागडुजी व किरकोळ दुरुस्ती पुसद येथिल सार्वजनिक बांधकाम विभाग कडे असल्यामुळे कामाची निविदा काढण्यात आली होती. मागील ४ ते ५ वर्षा पासुन या कामासाठी दुरुस्तीच्या नावा खाली कोटी रुपये काढत आहे. परत आता नविन दुरुस्तीच्या नावा खाली ४० लक्ष रुपयाची निविदा काढण्यासाठी वि.जिल्हा न्यायालयाने पैसे सुद्धा सा.बा.विभाग पुसद कडे वर्ग केले-ठेव म्हणुन जमा करण्यात आले. सा.बा. विभाग याबाबत निवीदा बोलावुन एका एजन्सी/मंजूर सोसायटीची नेमवणुक करुन त्या ठेकेदार कडुन काम करुन घेतो. दर वेळी विविध डागडुजी या नावाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी हाथ साफ करुन घेतात.असेच काही अत्यावश्यक बाधंकाम करुन देण्यासाठी सा.बा. विभाग पुसद यांचेकडे आपली मागणी केली व त्यानुसार सा.बा.विभागाने ४० लाख रुपयाचे अंदाजपत्रक तयार केले. आणि न्यायविभागाने ४० लाख सा.बा.विभागकडे वळते केले जेणे करुन सा.बा.विभाग लवकरात लवकर काम करुन घेईल. वि. न्यायालयीन इमारतीचे काम असल्याने सा.बा. विभागाने सुद्धा तात्परता दाखवून एकुण १५ कामाच्या निवीदा असतांना यापैकी न्यायालयाची निविदा सूचना ही एकच टेंडरला लावली लावली. आणि बाकी कामाच्या निवीदा काही तांत्रिक अडचणींमुळे निवीदा भरण्याची तारीख ही पुढे ढकलण्यात आली. पण वि.न्यायालयीन कोर्टाचे महत्वाचे काम असल्याने हे एकच कामाची निवीदा बोलावुन घेतली हे विशेष. या निवीदा भरण्याबाबत स्पर्धा पण झाली यामध्ये ३ (तीन) निविदा पण आल्या,आता निवीदा रितसर उघडुन कमी दर मध्ये निविदा भरलेल्या ठेकेदारास कार्यारंभ (वर्क ऑर्डर)आदेश देवुन २-४ दिवसांत काम सुरु करणे अपेक्षित होते.परंतू खेळ वेगळाच सुरु झाला. पैसा न्याय व विधी विभागाचा मात्र उपयोग घेत आहे सा.बा.विभाग येथिल अधिकारी यांनी आपल्या मर्जीतील ठेकेदारास ही निवीदा भरण्यास सांगितली होती त्या नुसार त्यांनी २ निवीदा भरली, परंतु ३री निविदा एका इतर ठेकेदाराने भरुन खेळ खराब करुन टाकल्याने सा.बा.विभागाने लगेच निविदा प्रक्रिया नुसार दुसर्याच दिवशी निविदा उघडुन ३रा ठेकेदार हा कोण आहे हे तपासुन कागद पत्रांची तांत्रिक तपासणी करुन घेतली.आता तिसरा ठेकेदार कोण हे उघड झाल्यावर त्याची मनधरणी सुरु केली होती, त्यासाठी पुढील प्रक्रिया थांबविण्यात आली यामध्ये सतत ८ दिवस वाट पाहण्यात आली, यामध्ये काहीच तडजोड झाली नसल्याने, नंतर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकाबाबत आचार संहिता लागु झाली. वास्तविक पाहता सदर निविदा प्रक्रिया ही आचारसंहीता अगोदरची असल्यामुळे तांत्रिक तपासणी सुद्धा झाली होती, लगेच आर्थिक बाबी उघडुन त्याच दिवशी कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) पण देवु शकले असते पण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी/ अभियंता यांच्या मर्जीप्रमाणे झाले नाही. आज जवळपास दोन महीन्याचे वर होत आहे न्याय व विधी विभागाने दिलेली पैसे सा.बा.विभागाच्या अधिकार्यामुळे पडुन आहे, यात काहीही ठोस कारण नसतांना फक्त आपल्या मर्जीतील ठेकेदारास काम मिळावे आणि आपले टक्केवारी हिस्सा मिळावा या उदेशातुन सदर काम न्यायालयाचे हे धूळ खात पडुन आहे. यामध्ये विद्यमान न्यायालयाने सदर बाबीची सखोल चोकशी करुन सा.बा.विभागाचे खोडसर निवीदा लिपीक,लेखाधिकारी व कार्यकारी अभीयंता यांना काम का सुरू करण्यात आले नाही या बाबतीत तात्काळ प्रश्न विचारला पाहिजे ? सर्व सामान्य व्यक्ती न्याय मागणयास न्यायालयाच्या दारी जातो, आता न्यायालयच न्यायाच्या प्रतिक्षेत असेल तर या देशाचा काय होणार अशी चर्चा पुसद मधील सुज्ञ नागरीकांमध्ये सुरु आहे.

# • वेचक

## एका अल्पवयीन मुलीचा सातत्याने पाठलाग, तरुणाकडून जीवे मारण्याची धमकी !

उमरखेड - शहरात अल्पवयीन मुलीचा सातत्याने पाठलाग करून मानसिक त्रास देण्याचा प्रकार उघडकीस आला असून संबंधित तरुणाने थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पीडित मुलीने आई-वडिलांसह उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. येथील एका महाविद्यालयात शिक्षण घेत असलेली अल्पवयीन मुलगी ती दररोज सायकलवरून परिसरातील खासगी क्लासेससाठी ये-जा करत असते.दि. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५.१५ वाजताच्या सुमारास एका अनोळखी तरुणाने मोटारसायकलवरून येत “थांब, तुला बोलायचे आहे” असे म्हणत तिचा अडथळा करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो ओळखीचा नसल्याने पिडीतीने दुर्लक्ष करून थेट घरी जात हा प्रकार आई-वडिलांना सांगितला. यानंतर दि. १२ डिसेंबर रोजी त्याच ठिकाणी पुन्हा तोच तरुण मोटारसायकलवरून तिच्या मागे आला व बोलण्याचा आग्रह धरू लागला. त्या मुलीने स्पष्ट नकार देऊन पाठलाग करू नये असे सांगितले असतानाही तो घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुढे जाऊन थांबला. भीतीपोटी तीने दुसऱ्या रस्त्याने घरी जाणे पसंत केले. त्यानंतर दि. १३ डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ४ वाजता संबंधित तरुण पुन्हा मोटारसायकल क्रमांक MH-14 AH 8072 वरून तिचा पाठलाग करत असल्याचे दिसून आले. क्लास सुटल्यानंतर एका शाळेजवळ तो थांबून त्या पिडीते कडे पाहत होता. इतकेच नव्हे तर घराजवळील परिसरात तो पुन्हा फिरत असल्याचे निदर्शनास आले. या वेळी पीडित मुलींची आई घराबाहेर आल्यानंतर संबंधित तरुणाने “मला तिला बोलायचे होते, तुम्हाला मारायचे असेल तर मारा; ती मला बोलली नाही तर मी तुम्हा दोघींना खतम करून टाकीन,” अशी थेट धमकी दिली. शेजारी राहणारे नागरिक बाहेर आल्याने तो तेथून पळून गेला. सदर तरुणाचे नाव रामदास धुमाळे (रा. बेलखेड) असे असल्याचे कळाले असून तो अनेक दिवसांपासून वाईट उद्देशाने पाठलाग करत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

## पत्रकार रवि ढुमणे यांची गळफास घेऊन आत्महत्या



वणी – परिसरात सुपरिचित असलेले पत्रकार रवि ढुमणे यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना आज सोमवारी १५ डिसेंबर ला सकाळच्या सुमारास उघडकीस आली. रवि ढुमणे हे मुळचे वणी शहरानजीक असलेल्या चिखलगाव येथील रहिवासी होते.ते सध्या वणीतील नांदेपेरा बायपास रोडवरील विद्या नगरी चामाटे ले आऊट येथे कुटुबीयांसह राहत होते. सकाळी चहा देण्यासाठी कुटुंबीय गेले असता त्यांनी आतून दार उघडले नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी खोलीत जाऊन बघितले असता ही घटना उघडकीस आली. त्यांनी घराच्या खिडकीच्या गजाला दोर बांधून गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.रवी ढुमने हे अभ्यासू आणि धाडसी व्यक्तिमत्त्व होते. त्यामुळे आत्महत्या सारखें टोकाचं पाऊल त्यांनी का उचलले ? याचे कारण सध्यातरी कळू शकले नाही.मात्र काही कारणास्तव ते काही काळापासून नैराश्यात होते, असे त्यांचे परिचित सांगत आहेत. रवी ढुमने यांच्या आत्महत्येची बातमी शहरात कळताच हळहळ व्यक्त होत आहे.तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्याबाबत सहवेदना व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी वणीच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुलं,सुन असा मोठा आप्त परिवार आहे.

## २१ तारखेला निवडणूक निकाल : एकच चर्चा



ढाणकी - नगरपंचायत निवडणुकीचे निकाल 21 तारखेला जाहीर होणार आहेत, ज्यामुळे स्थानिकांमध्ये एकच चर्चा सुरू झाली आहे. कोणता उमेदवार निवडून येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कोणत्या उमेदवाराने आपल्या क्षेत्रात किती काम केले आहे, यावरून चर्चांना उधाण आले आहे. मतदारांनी कोणत्या उमेदवाराला मतदान केले आहे, यावरून अंदाज बांधले जात आहे. 21 तारखेला निकाल लागल्यावरच कळेल, कोण जिंकणार," असे स्थानिक नागरिक म्हणत आहेत. "आम्ही निकालाची वाट पाहत आहोत," असेही ते म्हणाले. 21 तारखेला निकाल लागल्यावर, विजयी उमेदवाराला स्थानिक नागरिकांचे अभिनंदन मिळेल आणि पराभूत उमेदवार आपली पुढची रणनीती ठरवतील.

# शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव द्या

## राष्ट्रीय किसान मोर्चाचा पुसद कृषी उत्पन्न बाजार समिती समोर धरणे आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - आज दिनांक १५ डिसेंबर रोजी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा यासाठी पुसद कृषी उत्पन्न बाजार समिती समोर राष्ट्रीय किसान मोर्चा तर्फे धरणे आंदोलन करण्यात आले.शेतकऱ्यांसाठी कृषी आयोग लागू करावा,सरसकट शेतमालाला हमीभाव भेटला पाहिजे, शेतकऱ्यांच्या सर्व प्रकारच्या शंभर टक्के कृषी उत्पन्न आज हमीभाव मिळावा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातच किमान आधारभूत किमतीने एम.एस.पी खरेदी झाली पाहिजे त्याकरिता महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन विकास व विनीयमन अधिनियम १९६३ मधील कलम ३२ घ कलम ९४ डी १,२, ३,तसेच कलम ६, ७,यांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

तसेच ज्या शेतकऱ्यांना एम एस पी पेक्षा कमी दर मिळाला आहे त्या सर्व शेतकऱ्यांना शेतकरी हक्क मूल्य व भावांतर मूल्य फरकाची रक्कम शासनाकडून त्वरित देण्यात यावी, शेतकऱ्यांचा वाढता उत्पादन खर्च व मिळणारा भाव कमी आहे, तसेच व्यापाराकडून होणारी शेतकऱ्यांची फसवणूक, लुबाडणूक, सरकार करत असलेली दिशाभूल, अशा अनेक कारणामुळे, तसेच सततची दुष्काळ, नापिकी,नैसर्गिक संकटे,वीज बिलाचा प्रश्न, यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंनदिवस बिकट होत असून महाराष्ट्रामध्ये अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शेतकऱ्यांच्या मुला बाळाचा शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, अशा अनेक समस्येवर धरणे आंदोलनात मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षता गणपत गव्हाळे सर राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद, तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरदचंद्र कांबळे तालुकाध्यक्ष बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क पुसद,तसेच दीपक कांबळे सर भारत मुक्ती मोर्चा प्रभारी पश्चिम विदर्भ, तसेच बंडू गंगावणे जिल्हाध्यक्ष बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क पुसद, हरिभाऊ कांबळे राष्ट्रीय किसान मोर्चा,प्रा.साखरकर यांनी विचार मांडले राहुल इंगोले यांनी आपल्या कवितेतून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या या धरणे आंदोलनात ग्रामीण भागातून महिला तसेच अनेक शेतकरी उपस्थित होते.

# साखरा केंद्राअतर्गत केंद्रस्तरीय खेळ व क्रीडा सामने आणि शिक्षण परिषद दत्तापूर येथे संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी



घाटंजी - विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा साखरा केंद्रांतर्गत केंद्रस्तरीय खेळ व क्रीडा सामन्याचे आयोजन जि प प्राथमीक शाळा दत्तापूर येथे करण्यात आले. दिनांक 10 /12/25 ते 12 /12/ 2025 या दरम्यान क्रीडा स्पर्धा व शिक्षण परिषद संपन्न झाली. कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री सुनील भाऊ तोडसाम उपसरपंच श्री संतोष भाऊ कारेवार सौ. हीनाताई पवार पोलीस पाटील श्री रमेश भाऊ तोडसाम श्री. अंजन वाढई श्री.सुभाष भाऊ मुनेश्वर श्री.किशोरजी भोयर श्री. बबलू राठोड श्री.अशोक पवार श्री. किशोर राठोड श्री गजानन मुळे श्री. संजय उमरखेडे श्री सुधाकर राठोड श्री. संजय पडलवार कु. ताराताई मसराम कु उषाताई बावनकुळे इत्यादी मान्यवरांचे हस्ते पार पडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा सचिव श्री. किशोर भोयर सर यांनी केले.

यावेळी विस्तार अधिकारी शिक्षण या पदावरून सेवानिवृत्त झालेले श्री. सुभाषभाऊ मुनेश्वर सर यांचा केंद्रातील सर्व शिक्षक वृंदातर्फे सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक क्रीडा सचिव श्री. किशोर भोयर सर यांनी केले. यावेळी तीन दिवस चालेल्या या केंद्र स्तरीय खेळामध्ये कबड्डी, लंगडी, खो खो,लांब उडी, उंच उडी,धावणे, गोळा फेक, बुद्धिबळ, कॅरम इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. केंद्रातील सर्व शाळेने सहभागी घेतला. यावेळी अनेक कबड्डी व लंगडीच्या सामन्यांमध्ये अतिशय चुरस निर्माण झाली यावेळी साखरा बेलोरा आमडी मुरली खापरी करमना येथील विद्यार्थ्यांनी मैदान गाजवले. सामन्याच्या अखेरच्या दिवशी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली या परिषदेमध्ये सकारात्मक शिस्त व डॉक्टर जयंत नारळीकर गणित विज्ञान अध्ययन समृद्धी व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा इत्यादी विषयावर मार्गदर्शन केंद्र प्रमुख श्री संजय पडलवार व तज्ञ मार्गदर्शक श्री.अमोल चौधरी यांनी केले. विध्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून बक्षीसाकरिता सर्व मुख्याध्यापक यांच्या वतीने योगदान देण्यात आले. या क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रम समारोपीय दिवशी करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री हनुमान कुमरे व श्री शैलेश निबुदे यांनी केले स्पर्धा यशस्वी करण्यासाठी म्हणून श्री उमेशचंद्र ठाकरे श्री. रवींद्र उमाटे श्री अमित वानखडे श्री संतोष चौधरी श्री सुरेश मुनेश्वर श्री.तुकाराम नागरगोजे श्री राम हेमके श्री. संजय साळवे श्री. राजेंद्र कुळसंगे श्री. संतोष गावंडे श्री. अनिल वाढोणकर श्री. गजानन बेजारपवार श्री निखिल पांगुळ श्री. गौरव अढाऊ श्री. शरद सोयाम श्री. सिद्धार्थ मुजमुले श्री.ओमप्रकाश जाधव श्री. अनिल निमजे श्री. प्रकाश बघेले श्री.विशाल गोडे श्री ओंकार आडे कु. उमदेवी बुटे कु. मेघना जाधव कु. प्राजक्ता लालसरे कु. कांबळे मॅडम कु. कनाके मॅडम कु. मायाताई भोयर कु. प्रतिभा किनगे कु. वर्षा गुंडेवार कु. रूपा कुटे कु. श्रद्धा ठाकरे कु. उमा पंधरे व केंद्रातील सर्व शिक्षक वृंद व दत्तापूर गाव वासियांचे सहकार्य लाभले.

# मतपत्रिकेत घोळ : मतदार स्लिपवर महिला आणि पुरूषाचे नाव एकच..!

## नगरपालिका निवडणुकीपूर्वी निवडणूक विभागाचा निष्काळजीपणा उघडकीस

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - नगरपरिषद निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. मतदानासाठी फक्त चार दिवस शिल्लक असताना, सर्व राजकीय पक्षांचे उमेदवार मतदारांशी संपर्क साधण्यासाठी घरोघरी जाऊन जोरदारपणे संपर्क साधत आहेत. मतदानाची माहिती देण्यासाठी मतदार स्लिप देखील जलद गतीने वाटल्या जात आहेत.

नियमांनुसार, मतदारांना मतदार स्लिप पोहोचवण्याची जबाबदारी संबंधित बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) ची आहे. तथापि, यवतमाळ शहरात, हे काम मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून केले जात आहे. दरम्यान, शहरातील एका प्रभागात गंभीर अनियमितता आढळून आल्याने निवडणूक विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एकच नाव, दोन वेगवेगळ्या ओळखपत्रे मिळालेल्या माहिती नुसार, एकाच नावाच्या मतदारांसाठी दोन वेगवेगळ्या मतदार चिठ्ठ्या तयार करण्यात आल्या आहेत. एका चिठ्ठीवर महिला मतदाराचा फोटो आहे आणि महिला मतदाराच्या नावा ऐवजी पुरुष मतदाराचे नाव प्रकाशित केले आहे. दुसऱ्या चिठ्ठीवर पुरुष मतदाराचा फोटो आहे, परंतु यातही मोठा गोंधळ करण्यात आला आहे. दोन्ही चिठ्ठ्या एकाच नावाचा उल्लेख असल्याने मतदार गोंधळले आहेत. या विसंगती मुळे परिसरातील मतदारांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. निवडणूक विभागाने तयार केलेल्या मतदार यादी आणि मतदार चिठ्ठ्यां मध्ये लक्षणीय चुका असल्याचा आरोप अनेक मतदारांनी केला आहे. यामुळे मतदारांचा विश्वासच डळमळीत झाला नाही तर निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेवर ही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवडणूक प्रक्रियेत इतक्या मोठ्या त्रुटी आढळल्याने निवडणूक निर्णय विभागाच्या भूमिकेवर शंका निर्माण झाली आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जर ही चूक तातडीने दुरुस्त केली नाही तर मतदानाच्या दिवशी वाद निर्माण होऊ शकतो. मतदान केंद्रावर पोहोचल्यावर मतदारांना त्यांच्या ओळखी बद्दल गोंधळ होऊ शकतो, ज्यामुळे मतदान प्रक्रियेत अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही केली आहे.

# लोकनेत्यांना जातीमध्ये बंदिस्त करू नका

## राम देवसरकर माजी जिप सभापती अर्थ व बांधकाम

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांचे कार्य तळागाळातील सर्व समाजातील लोकांसाठी आहे. त्यांनी वंचितांना संधी देण्यासाठी आपले पूर्ण आयुष्य खर्च केले. त्यांच्यामध्ये अफाट संघटन कौशल्य होते त्याचबळावर त्यांनी महाराष्ट्रात विरोधी पक्षात असलेल्या पक्षाला सत्तेत आणून बसवलं. एवढ्या मोठ्या लोकनेत्यांना जातीत बंदिस्त करू नका ते सर्वांचे नेते होते असे आवाहन चातारी येथे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त बोलताना माजी अर्थ व बांधकाम सभापती यवतमाळ यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक बापूराव माने तर प्रमुख अतिथी म्हणून राम देवसरकर माजी अर्थ व बांधकाम सभापती ,चितानराव कदम माजी जि. प. सदस्य एडवोकेट अनिल माने विधानसभा अध्यक्ष भाजप ,शिवाजी माने अध्यक्ष आपला जीन प्रेस उमरखेड, सतीश कदम पोलीस पाटील ,बंटी माने माजी सरपंच अश्विन माने माजी सरपंच, डॉ. व्यंकट माने ,अशोकराव माने, जाबुवंत माने , सरपंच रंजना माने, सदाशिव वाठोरे, ग्रामसेवक प्रकाश राठोड इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अध्यक्ष व प्रमुखांची पुष्पहाफ अर्पण करण्यात आले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी डॉ. श्रीराम साबळे, डॉ. अभय विरखडे, डॉ. अभिजीत गोरे, डॉ.घुटे इत्यादींनी रुग्णांची तपासणी केली यावेळी जवळपास दीडशे रूग्णांची तपासणी करून त्यांना औषधी वाटप करण्यात आले. पुढच्या वर्षी 12 डिसेंबरला गोपीनाथरावजी मुंडे यांची 77 वी जयंती असल्यामुळे कार्यक्रमातील प्रमुख उपस्थित असलेले राम देवसरकर यांनी यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेतर्फे उमरखेड येथे 770 रक्तदात्यांचे रक्तदान करून घेण्याचा संकल्प जाहीर केला. तसेच मुंडे साहेबांच्या पुतळ्यासाठी लागणारी सर्व मदत मी करण्यास तयार आहे असे आश्वासन सुद्धा दिले. यावेळी गावातील सर्व समाजातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून संतोष ढवळे यांची हकालपट्टी

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ – जिल्हा विधानसभा प्रमुख संतोष ढवळे यांची पक्षविरोधी कारवायांसाठी शिवसेनेतून (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. शिवसेना उबाठाचे जिल्हा सहसंपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाने जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

पत्रकार परिषदेत राजेंद्र गायकवाड यांनी सांगितले की, संतोष ढवळे यांनी पक्षाच्या धोरणाला आव्हान देत यवतमाळ नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अधिकृत नगराध्यक्ष आणि इतर शिवसेना नगरसेवक उमेदवारांविरुद्ध काँग्रेस पक्षासाठी प्रचार केला.

ही गंभीर बेशिस्त आणि पक्षविरोधी कृती लक्षात घेऊन त्यांच्यावर ही कठोर कारवाई करण्यात आली आहे.तसेच काँग्रेस आणि शिंदे सेना,भाजप मतदारांना छायाचित्र असलेल्या मतदार स्लिप वाटत आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. या मतदार स्लिप बीएलओंकडून वाटल्या जातात. पण विरोधी पक्ष हे करत आहेत.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली जाईल. पत्रकार परिषदेत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष किशोर इंगळे, चेतन शिरसाट, तुषार देशमुख, राजेंद्र धोटे, गजानन पाटील, शोएब शाह, सलमान शेख, दिनेश चव्हाण, गजानन पोटे आणि साजिद रहमान उपस्थित होते.

# तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांचा पाच टक्के निधी व संजय गांधी निराधार वाढीव निधी त्वरित वाटप करा

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - पुसद येथील प्रहार दिव्यांग संघटना मार्फत आज१५ डिसेंबर रोजी तहसीलदार पुसद यांना दिव्यांगाना शासनाने वाढीव २५००/ रुपये ठरविलेले मानधन त्वरित लाभार्थ्यांना वाटप करण्यात यावे तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती, पुसद यांनाही संपूर्ण तालुक्यातील ग्रामपंचायत मार्फत सर्व दिव्यांग लाभार्थ्यांना ५ टक्के निधी सन २०२४-२५ चा निधी वाटप करण्यात यावे अशा विषयाचे प्रहार दिव्यांग क्रांती संघटना पुसद मार्फत निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की पुसद तालुक्यातील पंचायत समिती अतंर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायत मार्फत दिव्यांग ५ टक्के निधी गटवर्ष २०२४-२५ चा वाटप करण्यात आलेले नाही. तरी सदर निधी हा २६ जानेवारीच्या अगोदर वाटप करण्यात यावा. अन्यथा सर्व प्रहार दिव्यांग क्रांती संघटना पंचायत समिती समोर आंदोलन तथा उपोषण करणार. असा इशारा निवेदनातून देण्यात आला सोबतच तहसीलदार पुसद यांना संजय गांधी निराधार मार्फत दिव्यांग लाभार्थ्यांना मिळणारे मानधन १५००/रुपये ऐवजी शासनाने मंजूर केलेले २५००/ रुपये वाढीव मानधन हे सुद्धा लवकरात लवकर वाटप करण्यात यावे अशा विषयाचे निवेदन प्रहार दिव्यांग क्रांती संघटना पुसद मार्फत देण्यात आले आहे. यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेचे निवेदन देणारे कार्यकर्ते, संतोष काईट यवतमाळ जिल्हाध्यक्ष, संजय गोदमले पुसद तालुकाध्यक्ष, मांगीलाल जाधव पुसद उपाध्यक्ष, सचिन सोनटक्के सदस्य, प्रशांत सोनटक्के, समाधान वाढवे, विनोद राठोड, श्रीकांत येलतकर, रोहिदास चव्हाण इत्यादी पदाधिकारी लोकांच्या निवेदनावर सह्या आहेत.

# ढाणकी येथे राष्ट्रीय किशोरी स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर


जनमाध्यम प्रतिनिधी



ढाणकी - डॉ. स्वाती मुनेश्वर (वैद्यकीय अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. महेश भाले (द्वितीय वैद्यकीय अधिकारी) यांच्या उपस्थितीत ढाणकी येथे राष्ट्रीय किशोरी स्वास्थ्य कार्यक्रम तसेच आंतरराष्ट्रीय किशोरी कार्यक्रम याअंतर्गत विशेष आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात किशोरींना आरोग्यविषयक मार्गदर्शन, समुपदेशन, सिकल सेल तपासणी, रक्त तपासणी तसेच मासिक पाळी स्वच्छतेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. किशोरींच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची जाणीव वाढवणे, पोषण, स्वच्छता व नियमित तपासणीचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमात डॉ. अक्कवार, डॉ. जाधव यांच्यासह आरोग्य सहाय्यक चव्हाण सर, सूर्यवंशी सर, श्री. वाघडे सर, LHV सोननकर, श्रीमती परसनकर, श्रीमती पटोले, MPW श्री. वणवे, श्री. हंबर्डे, गेडे, लॅब असिस्टंट दिगंबर, श्री. संजय भाऊ, श्रीमती चव्हाण ताई, गतप्रवर्तक वाळूतकर ताई तसेच ढाणकी परिसरातील सर्व आशा ताईंनी सक्रिय सहभाग नोंदवला. या शिबिरामुळे किशोरींमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढली असून नियमित आरोग्य तपासणी, सिकल सेलसारख्या आजारांची लवकर ओळख आणि मासिक पाळी स्वच्छतेबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला.

# चिखलदऱ्यात होणार जगातील तिसरा काचेचा स्कायवॉक



## मेळघाटाचे सौंदर्य पाहण्यासाठी मिळणार नवा अनुभव

**अमरावती/का.प्र.**
विदर्भातील निसर्गरम्य चिखलदरा आता पर्यटकांसाठी आणखी आकर्षक बनणार आहे. 'विदर्भाचे काश्मीर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या या ठिकाणी भव्य काचेचा स्कायवॉक उभारण्याचे काम जलद गतीने सुरू झाले आहे. काचेच्या या स्कायवॉकवरून चालण्याचा थरार आणि मेळघाटच्या दऱ्याखोऱ्यांचे मनोहारी दृश्य एका वेगळ्या उंचीवरून पाहण्याचा रोमांच पर्यटकांना मिळणार आहे.

चिखलदऱ्यातील हा स्कायवॉक नेहमीचे पर्यटन अनुभव बदलून टाकणार आहे. कारण या स्कायवॉकची उंची बघितली तर ती तब्बल १,५०० फुटांवर असणार आहे.

भारतात याआधी अशा प्रकारचा कोणताही स्कायवॉक नाही. त्यामुळे हा देशातील पहिला आणि लांबीच्या बाबतीत जगातील सर्वात मोठा स्कायवॉक ठरणार आहे.

काचेचे स्कायवॉक आहेत. स्वित्झर्लंडचा स्कायवॉक ३९७ मीटर तर चीनचा ३६० मीटर आहे. पण चिखलदऱ्यात उभारत असलेला हा स्कायवॉक ५०० मीटर लांबीचा असणार आहे. त्यामुळे तो एकाच वेळी जगातील तिसरा आणि सर्वात मोठा स्कायवॉक ठरेल.चिखलदरा पर्यटन विकास आराखड्यात या प्रकल्पाचा समावेश असून गोराघाट पॉइंटपासून हरिकेन पॉइंटपर्यंत हा काचा स्कायवॉक बांधला जात आहे.

दोन उंच टेकड्यांना काचेच्या पुलाने जोडले जात असल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांचा अनुभव आणखी खास होणार आहे.

या स्कायवॉकवरून फिरताना खाली पारदर्शक काचेमधून दरी आणि घनदाट जंगल दिसणार असल्याने अनेकांना अक्षरशः हृदयाचा ठोका चुकल्यासारखे वाटेल. पण त्याचबरोबर मेळघाटच्या अप्रतिम निसर्गाचे दर्शन उंचावरून घेण्याची संधी पहिल्यांदाच मिळणार आहे.सिडकोचे कार्यकारी अभियंता देवेंद्र जामनेरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या स्कायवॉकला ३४ कोटींचे बजेट मंजूर असून साधारण दोन वर्षांत हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. कोरोनामुळे काही काळ प्रकल्प अडकला होता, मात्र यानंतर सर्व कामे पुन्हा सुरळीत सुरू झाली आहेत.

चिखलदरा स्वतःमध्येच एक लोकप्रिय पर्यटनस्थळ. गाविलगड किल्ला, भीमकुंड, कीचकदरी, पंचबोल पॉइंट, सनसेट पॉइंट, याशिवाय मेळघाट व्याघ्र प्रकल्पामुळे येथे वर्षभर पर्यटकांची गर्दी असते. आता या यादीत काचेचा स्कायवॉकही समाविष्ट होत असल्याने चिखलदऱ्याचे पर्यटन आणखी उज्ज्वल होणार आहे.

# अमरावतीत ५४ हजार घरकुल अर्धवट

## पीएम आवासमध्ये निधी मिळूनही कामे रखडली, प्रशासनावर दबाव



**अमरावती/का.प्र.**
केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेची अमरावती जिल्ह्यातील प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रश्नांकित ठरत आहे. दुसऱ्या टप्प्यात मंजूर झालेल्या घरकुलांपैकी मोठा हिस्सा अद्याप अपूर्ण असल्याने सर्वांसाठी घर हा दावा केवळ घोषणाच ठरत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. जिल्ह्यात मंजूर झालेल्या ६९ हजार ३७ घरकुलांपैकी तब्बल ५४ हजार ३२० घरकुलांची कामे अर्धवट असून, आतापर्यंत केवळ ११ हजार ७०१ घरकुलच पूर्ण झाली आहेत.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाने पीएम आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात मोठ्या प्रमाणावर घरकुलांना मंजुरी दिली. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत ६२,६०८ घरकुलांना मंजूर आदेश देण्यात आले. यातील ५९,६७२ लाभार्थ्यांच्या खात्यात पहिल्या टप्प्याचा निधी थेट जमा करण्यात आला. मात्र निधी वितरित होऊनही प्रत्यक्ष बांधकामांची गती अत्यंत मंद असल्याचे चित्र समोर आले आहे. पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण केल्यानंतर २९,५५५ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता देण्यात आला. त्यानंतर कामे रखडल्यामुळे लाभार्थ्यांची संख्या कमी होत गेली. तिसरा टप्पा २१,९७४ तर चौथा टप्पा केवळ ६,०४६ लाभार्थ्यांपर्यंत मर्यादित राहिला. परिणामी हजारो कुटुंबे अद्यापही घरकुल पूर्णत्वास जाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. घरकुलांची कामे वेळेत पूर्ण न झाल्याने प्रशासनावर राजकीय दबाव वाढत असून, तालुकास्तरावर अधिकाऱ्यांना कडक सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात या सूचना कितपत परिणामकारक ठरणार, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे.

शबरी आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या १५,१९६ घरकुलांपैकी ३,८४१ घरकुले अद्याप अपूर्ण आहेत. तसेच रमाई आवास योजनेत मंजूर २३,२८० घरकुलांपैकी ५,८९७ घरकुले रखडलेली आहेत. या दोन्ही योजनांमधील अपूर्ण कामांमुळे सामाजिक न्यायाच्या दाव्यांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.महानगरपालिकेच्या वतीने घटक क्रमांक तीन व चार अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देण्यात आला.

घटक क्रमांक तीनमध्ये ८६० पैकी २५० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून ६०४ लाभार्थ्यांना अजूनही प्रतिक्षा करावी लागणार आहे, तर घटक क्रमांक चारमध्ये पहिल्या टप्प्यात ४८०० लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर करण्यात आले होते, त्यापैकी ४२५० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

# मोदीजी 'ते' ३ कृषी कायदे परत आणा



## श्रमराज्य परिषदेच्या बैठकीत मागणी

**दर्यापूर/वार्ताहर**
वर्षानुवर्षे शेतकऱ्यांच्या मानेला घट्ट विळखा घालून असलेल्या व्यवस्था व कायद्यामुळे आजही देशातील ७०/८० कोटी शेतकरी(शेतमालक, शेतमजूर व बारा बलुतेदार) गर्ततेचे जिवन जगतो आहे. यातून त्याची कायमस्वरूपी सुटका व्हावी यासाठी २०२१ साली पंतप्रधान नरेन्द्र मोदीच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने ३ कृषी कायदे संसदेत पारीत करून घेतले.राष्ट्रपतींनी सुध्दा या कायद्यांना मंजुरी देत अंमलबजावणीसाठी हिरवी झेंडी दाखविली.असे असतांना शेतकऱ्यांच्या वेशातील खलिस्थान्यांनी या क्रांतीकारक कायद्यांच्या विरोधाच्या नावाखाली देशात बांगला देश नेपाळसारखी अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या तीन कृषी कायद्याचा बळी गेला, त्यामुळे हे तीन कृषी कायदे केंद्र सरकारने परत घ्यावे, अशी मागणी श्रमराज्य परीषदेच्या बैठकीत करण्यात आली.

दर्यापूर येथे आयोजित या बैठकीला विविध क्षेत्रातील कृषी विचारवंत, बुध्दीजीवी व राजकीय पक्षातील नेते प्रामुख्याने उपस्थित होते. श्रमराज्य परिषदेचे अरविंद उर्फ बाबुजी नळकांडे यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीला वनराईचे मधुकर धारड, माजी जिल्हा कृषी अधीक्षक अनिल इंगळे, लोकसंग्राम पक्षाचे दिलीप देशमुख, अमरावतीचे प्रदीप इंगळे, भाजपचे माणिकराव मानकर, फार्मर प्रोड्युसर, कंपनीचे संजय आसरे, शितल ठाकूर, रुपरावतिडके, राजेश गावंडे, वंचित बहुजन आघाडीचे अशोक नवलकार,उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे किशोर टाले, शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेनेचे लिंबाजी डोईफोडे, समाधान कणखर, प्रा. जयकिरण गावंडे, राजाभाऊ पुसदेकर, सुभाष राजूरकर, विजय लाजूरकर, प्रबुद्ध भारत मंचचे प्रमोद इंगळे, शेषराव वानखडे, सुरेश भटकर, इंद्रजीत खोब्रागडे, बसंत पाखरे, गोपाल गवई, हिवराळे आदी उपस्थित होते.

# संक्षिप्त

### ४ जानेवारी रोजी परिचय महासंमेलन

**अमरावती**- अंबाडा सकल सर्वशाखीय माळी समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतीसाठी ३० वे बहुराज्यस्तरीय परिचय महासंमेलन अमरावती येथे संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे ४ जानेवारी रोजी सकाळी १०:३० वाजता आयोजित केले आहे. सर्वशाखीय माळी संघाच्यावतीने आयोजित या महासंमेलनामध्ये देश-विदेशात नोकरी व व्यवसाय करणारे गासे, कासे, फूल, जिरे, भौरे, मरार, लोणारी, सैनी, कोसरे, हळदे, सावता, काच लिंगायत, कडू, बावने, वनमाळी आदी सर्व शाखा-उपशाखांतील विवाहेच्छुक युवक-युवतींची निःशुल्क नोंदणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

### ज्ञानेश्वर वानखडे यांना पीएचडी

**शिराळा**- अमरावती जिल्ह्यातील अमरावती तालुक्यातील शिराळा गावातील युवक बुद्धभूषण ज्ञानेश्वर वानखडे यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी (महाराष्ट्र) येथे संपन्न झालेल्या २७ व्या दीक्षांत समारंभात मृद विज्ञान या विषयात पीएच.डी. (आचार्य पदवी) यशस्वीरीत्या प्राप्त केली.कृषी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या मृद विज्ञान विषयात त्यांनी सखोल संशोधन करून ही पदवी मिळवली असून, त्यांच्या या यशामुळे शिराळा गावासह संपूर्ण अमरावती तालुका व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पत्रकार डीआर वानखडे यांचा मुलगा आहे वडील ज्ञानेश्वर वानखडे, आई वनमाला वानखडे मोठा भाऊ सुगत व मित्र परिवार यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.



### विनायक ताथोड यांना राष्ट्रीय समरसता पुरस्कार

**अमरावती**- भगवना बहुउद्देशीय संस्था, नाशिक यांच्या वतीने देण्यात येणारा राष्ट्रीय समरसता पुरस्कार – २०२५ अमरावती येथील शिक्षणतज्ज्ञ व श्री रामकृष्ण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कांडली (परतवाडा) येथील प्राचार्य श्री विनायक विश्वनाथ ताथोड यांना प्रदान करण्यात आला. आय. एम. ए. हॉल, नाशिक येथे झालेल्या समारंभात डॉ. भारती पवार यांच्या शुभहस्ते व रमेश चौधरी,शिवाजीराव शिरसाठ, बी. जी. चौधरी, मा. रशीद अख्तर अब्दुल अजीज व शैलेशचंद्र रायकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधिष्ठित शिक्षण व सामाजिक समरसतेसाठी देशपातळीवर केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सन्मानपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.



### सिकलसेल आजाराबाबत जनजागृती

**अमरावती**- पंचायत समिती भातकुली मधिल उत्तमसरा येथे आयुष्मान आरोग्य मंदिर उत्तम सरा अंतर्गत सिकलसेल जनजागृती सप्ताह राबविण्यात आला. यामध्ये डॉक्टर सोनाली देशमुख यांनी सिकलसेल विषयी विस्तृत माहिती सांगण्यात आली.सप्ताहाचे उद्घाटन उत्तमसरांचे सरपंच धर्मेंद्र मेहरे यांच्या हस्ते करण्यात आले.सिकलसेल जनजागृती सप्ताह यशस्वी करण्याकरिता तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर श्वेता सालफळे, तसेच वैद्यकीय अधिकारी डॉक्टर प्रवीण खराटे, डॉक्टर सोनाली देशमुख,आरोग्य सहाय्यक आकाश हिंगलासपुरे, आरोग्य सविका मंगला वानखडे, आरोग्य सेवक चेतन राठोड, सिकलसेल समुपदेशक मेघा चर्जन , सुरेखा सवयी, संगीता निंभोरकर अंगणवाडी सेविका जयश्री पेठेकर , अनुराधा भिंगारे, वर्षा मानकर,रुपाली बेलसरे जिल्हा परिषद शाळेच्या मीनाक्षी इंगळे, सचिव नितीन आंबेडकर, शुभम अवचार, व ग्रामपंचायतचे इतर सदस्य तसेच गावातील ग्रामस्थ आणि जि प उत्तम सरा शाळेचे विद्यार्थी या सर्वांचे सहकार्य लाभले.




### रमाबाई उमप यांचे निधन

**अंजनगाव सुर्जी :** मोझरी (गुरुकुंज) तालुका तिवसा येथील श्रीमती रमाबाई नत्थूजी उमप यांचे ६ डिसेंबर २०२५ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले, त्यांच्यावर मोझरी येथे स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चातदोन मुले, विनोद व नरेंद्र एक मुलगी पुष्पाताई, नातवंडे व मोठा आप्त परिवार आहे.

# मालमत्ता कराद्वारे ८८.२८ लाख वसूल

**अमरावती/का.प्र.**
महानगरपालिकेच्यावतीने रविवारी आयोजित करण्यात आलेल्या विशेष मालमत्ता कर वसुली शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या माध्यमातून शहरातील विविध प्रभाग समित्यांमधून एकूण ८८.२८ लाखांची मालमत्ता कर वसुली करण्यात आली.

यात प्रभागनिहाय झालेली वसुलीमध्ये प्रभाग समिती १ मध्ये १२.८० लाख, प्रभाग समिती २ मधून २६.८५ लाख, प्रभाग समिती ३ मध्ये २५.१० लाख, प्रभाग समिती ४ मध्ये ८.७५ लाख तर प्रभाग समिती ५ मधून १४.७९ लाख मालमत्ता कर वसुली करण्यात आली.



महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना वेळेत मालमत्ता कर भरण्याचे आवाहन केले असून, आगामी काळातही अशा प्रकारची कर वसुली शिबिरे सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली. या उपक्रमामुळे महानगर पालिकेच्या महसूल वाढीस चालना मिळून शहराच्या विकासकामांना गती मिळणार आहे.

# विकासाचा वाटा अंतिम व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट - आ. सुलभा खोडके

## नवसारी प्रभागातील रुपये ६४ लक्ष निधीतून होणाऱ्या विकासकामांचे भूमिपूजन

**अमरावती/का.प्र.**
अमरावती शहरात पिण्याचे पाणी, घनकचरा, द्रव कचरा यांचे व्यवस्थापन योग्यरित्या झाले पाहिजे, यावर आपला भर आहे. शहरातील वंचित घटकांबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांना सहकार्य करणे, शासकीय योजनांचा लाभ वंचित घटक, निराधार, विधवा, दिव्यांग व्यक्तींना मिळवून देणे यासाठी आपण कटीबद्ध आहोत.शहरामध्ये हरित क्षेत्र वाढवणे, वातावरण कृती आराखड्यात सुचवलेल्या उपायांची कठोर अंमलबजावणी करित नियोजन टप्प्यापासून अंमलबजावणी पर्यंत ही संकल्पना साकारण्यासाठी अधिकाधिक व्यापक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचून सर्व घटकांशी संवाद साधित सुंदर व विकसित शहर उभारण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत. असे प्रतिपादन आमदार सुलभा खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.



प्रभाग क्रमांक -३ नवसारी अंतर्गत छत्रसाल नगर- हनुमान नगर- गजानन कॉलनी येथे रुपये ६४ लक्ष निधीतून करण्यात येणाऱ्या विविध विकास कामांच्या भूमिपूजन प्रसंगी त्या बोलत होत्या. सर्वप्रथम आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते छत्रसाल नगर स्थित संदीप रडके यांच्या घरापासून ते रुपेश नितनवरे यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे तसेच नालीचे बांधकाम करणे या विकासकामाचे भूमिपूजन करण्यात आले. तदनंतर न्यू हनुमान नगर स्थित शुभम तायडे यांच्या घरामागील नालीचे बांधकामाचे भूमिपूजनाची त्यांनी कुदळ मारीत औपचारिकता साधली. यासोबतच हनुमान नगर व गजानन कॉलनी येथील नालीचे बांधकाम करणे या कामाचे त्यांनी भूमिपूजन केले. यावेळी यश खोडके यांच्या समवेत स्थानिक नागरिक तसेच छत्रसाल नगर, हनुमान नगर, गजानन कॉलनी येथील ज्येष्ठ नागरिक - महिला भगिनी - युवक - युवती प्रामुख्याने उपस्थित होते.

# मोठ्या भावाने केली किडनी दान, धाकट्या भावाचे वाचले प्राण

**अमरावती/का.प्र.**
आपल्या लहान भावाला मोठ्या भावाने आपली किडनी दान करून नवे जीवनदान दिले आहे. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे ही ६३ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.





विभक्त कुटुंब पद्धतीमुळे भावा-भावामधील नाते दुरावल्याचे चित्र एकीकडे पाहायला मिळत असताना दुसरीकडे भावा-भावामधील प्रेमाचे नाते अधिक घट्ट करणारी बातमी समोर आली आहे. दोन वर्षापासून किडनीच्या आजाराने त्रस्त असलेल्या आपल्या लहान भावाला मोठ्या भावाने आपली किडनी दान करून नवे जीवनदान दिले आहे. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे ही ६३ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शहरातील चपराशीपुरा येथील ३३ वर्षीय शेख नईम शेख रहमान हे दोन्ही किडनी निकामी झाल्याने त्यांच्यावर डायलिसिस उपचार सुरू होते; परंतु आपल्या भावाला होत असलेला त्रास लक्षात घेता ४० वर्षीय शेख नदीम शेख रहमान यांनी त्यांना किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. सर्व तपासण्या व चाचण्या पूर्ण केल्यानंतर शुक्रवारी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनात नेफ्रोलॉजिस्ट डॉ. प्रणीत काकडे, यूरो सर्जन डॉ. राहुल पोटोडे, डॉ. विक्रम देशमुख,. विशाल बाहेकर, डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बागवाले, डॉ. दीपाली देशमुख, डॉ. रमणिका ढोमणे, डॉ. अश्विनी मडावी, डॉ. विक्रांत कुळमेथे, डॉ. माधव ढोपरे, डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ. नाहीद, डॉ. रणणीय, डॉ. उज्ज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव यांनी यशस्वी केली.

# गाडेगाव-आलोडा मार्गावर 'चेंज स्कॅनिंग'

## सोन्याची अंगठी व रोख रक्कम लंपास
## दिवसाढवळ्या शेतकऱ्याची फसवणूक

**अमरावती/का.प्र.**
वरुड तालुक्यातील बेनोडा शहीद पोलीस स्टेशनच्या हद्दीत भुरट्या चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढत दिवसाढवळ्या शेतकऱ्याची फसवणूक केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. 'चेंज स्कॅनिंग' या प्रकारातून सोन्याची अंगठी व रोख रक्कम हिसकावून नेल्याने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

आलोडा येथील रहिवासी व शेतकरी श्री. साहेबराव जी. गावंडे हे १२ डिसेंबर २०२५ रोजी तलाठी कार्यालय, गाडेगाव येथील शासकीय काम आटोपून दुचाकीने आपल्या गावी परतत होते. दुपारी साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास गाडेगाव ते आलोडा या रस्त्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांना थांबवले.'तुमच्या हातातील अंगठी सोन्याची आहे की पितळची?' अशी चौकशी करून त्यांनी विश्वास संपादन केला. अंगठी तपासण्याच्या बहाण्याने ती हातात घेत चलाखीने अदलाबदल करत बनावट अंगठी देऊन मूळ सोन्याची अंगठी तसेच काही रोख रक्कम लंपास केली. प्रकार लक्षात येताच आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

घडलेल्या प्रकाराची माहिती गावंडे यांनी तात्काळ बेनोडा पोलीस स्टेशन येथे दिली असून, अज्ञात आरोपीविरोधात भारतीय दंड विधानातील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन व गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे.दरम्यान, बेनोडा पोलीस स्टेशन हद्दीत यापूर्वीही अशाच स्वरूपाच्या 'चेंज स्कॅनिंग' व भुरट्या चोरीच्या अनेक घटना घडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. वारंवार घडणाऱ्या गुन्ह्यांमुळे शेतकरी, ज्येष्ठ नागरिक व सामान्य प्रवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.


दिवसाढवळ्या रस्त्यावरच अशा घटना घडत असताना पोलीस गस्त वाढवावी, संशयितांवर कडक नजर ठेवावी व गुन्हेगारांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलली नाहीत तर नागरिकांमधील रोष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# महापालिकेच्या सभागृहात राहणार किमान नऊ व कमाल १२ स्वीकृत नगरसेवक

**अमरावती /का.प्र.**

राज्य मंत्रिमंडळाने महानगरपालिकांच्या कामकाजात अधिक गतिमानता आणण्यासाठी नगरसेवकांच्या संख्येत स्वीकृत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे अमरावती महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवकांची संख्या पाचवरून थेट नऊ अथवा १२ होणार असून, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय इच्छुक व नाराज कार्यकर्त्यांकरिता किती प्रभावी ठरतो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येच्या दहा टक्के (नऊ) किंवा १३ नगरसेवकांमागे दोन (१२) स्वीकृत नगरसेवक अशी सुधारित तरतूद लागू होणार आहे. त्यामुळे अमरावती महापालिकेच्या पुढील सभागृहात किमान नऊ व कमाल १२ स्वीकृत नगरसेवक राहणार



आहेत. महापालिका निवडणुकीत इच्छुकांची संख्या मोठी आहे. मात्र सामाजिक, राजकीय आणि प्रभागनिहाय समीकरणांमुळे अनेक कार्यकर्त्यांना उमेदवारी मिळत नाही. अशा कार्यकर्त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी स्वीकृत नगरसेवक पद प्रभावी ठरणार असल्याचे मत राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे. यामुळे पक्षांतर्गत नाराजी कमी होण्यास मदत होईल, असा अंदाज आहे. स्वीकृत नगरसेवकांना विषय समिती अध्यक्ष किंवा उपाध्यक्षपदासाठी निवडणूक लढविता येणार नसली, तरी त्यांची सभागृहनेता किंवा विरोधी पक्षनेता म्हणून नियुक्ती होऊ शकते. तसेच मतदानाचा अधिकार नसला, तरी प्रभागातील विकासकामांसाठी निधी उपलब्ध असून स्थानिक प्रश्नांवर भूमिका मांडण्याची संधी त्यांना मिळते. स्वीकृत नगरसेवकांची संख्या वाढणार असल्याने या पदासाठी इच्छुक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये स्पर्धा वाढण्याची चिन्हे असून, आगामी काळात अमरावतीच्या राजकारणात नवी समीकरणे तयार होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

स्वीकृत नगरसेवकांची संख्या ही निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्याबळावर ठरते. आतापर्यंत १३ नगरसेवकांवर एक स्वीकृत नगरसेवक अशाप्रमाणे पाच नगरसेवक देण्यात आले होते. नवीन विधेयकानुसार कुठलेही पत्र मनपाला प्राप्त झाले नाही.

**संदीप बहुळकर,** नगरसचिव

कार्यकर्त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्याकरिता हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे शहराचा विकास होणे तर शक्य नसेल मात्र महापालिकेवर आर्थिक भुर्दंड वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्वीकृत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार नसल्याने त्यांच्या भूमिकेची मर्यादा राहते.

**बबलू शेखावत,** शहराध्यक्ष काँग्रेस

**सन २०१७ चे मनपा नगरसेवक संख्याबळ**

भाजप- ४५
काँग्रेस- १५
शिवसेना- ७
बसपा -६
अपक्ष- १
युवा स्वाभिमान - ३
आठवले गट- १

## पीरिपा लढविणार महापालिकेच्या १२ जागा

**अमरावती/ का.प्र.**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वाखालील पीपल्स रिपब्लिकन - पार्टीच्या बैठकीमध्ये अमरावती - महानगरपालिकेच्या १२ जागा - लढविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. निवडणुकीच्या पूर्वतयारी करिता रविवारी (ता. १४) दुपारी स्थानिक शासकीय विश्रामभवन कॅम्प येथे शहरातील प्रमुख पक्ष पदाधिकाऱ्यांच्या मंथन बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष चरणदास इंगोले यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तथा जिल्हा निरीक्षक डी. जे. खडसे यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या निवडणूक विषयक मंथन बैठकीमध्ये प्रभागनिहाय आढावा घेऊन संभाव्य उमेदवाराबाबत चर्चा करण्यात आली.बैठकीला चरणदास इंगोले यांनी मार्गदर्शन केले. पीपल्स रिपब्लिकन पार्टीची शिवसेनेसोबत (शिंदे) युती आहे. त्यामुळे महानगरपालिका निवडणूक ही युतीमध्ये राहून लढण्याची पक्षाची भूमिका आहे. शिवसेना (शिंदे) गटाकडून पक्षाला योग्य जागा मिळतील, अशी अपेक्षा आहे. त्याबाबत शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ तथा शिवसेना उपनेते माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांच्याशी चर्चा करण्यात आलेली आहे. संभाव्य उमेदवाराची चाचपणी व उमेदवार निश्चित करण्याकरिता ७ सदस्यीय निवडणूक समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

निश्चित केलेल्या सात प्रभागातील ६ एस.सी. व ६ सर्वसाधारण अशा १२ जागांवर ही समिती उमेदवार निश्चित करेल, असे अधिकार समितीला दिले आहे, असे चरणदास इंगोले यांनी सांगितले. जिल्हा निरीक्षक डी. जे. खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये अमरावती शहराध्यक्ष सुरेश बहादुरे, बाळासाहेब इंगोले, ॲड. दीपक आकोडे, वासुदेव सामटकर, डॉ. अशोक गुर्जर, साहेबराव वानखडे, यांचा समावेश आहे.बैठकीला डी. जे. खडसे, सुरेश बहादुरे, ॲड. किरण यावले, लक्ष्मण वाघमारे, भीमरावजी बुद्धदास इंगोले, वासुदेव सामटकर, ढबाले, अशोक वासनिक, जगदीश रामटेके, सुनील इंगोले, जयकिसान नागदिवे, सुनील इंगोले, चंद्रभान मोहोड, पंजाबराव सुरवाडे, साहेबराव वानखडे, सुरज मोहोड, रामराव शेंडे यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### अंजनगाव नगरपालिका निवडणुकीत

## नगराध्यक्ष पदासाठी सात तर सदस्य पदासाठी १७३ उमेदवार रिंगणात

**अंजनगाव सुर्जी /वार्ताहर**

अंजनगाव नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी सात उमेदवार रिंगणात आहेत तर सदस्य पदासाठी १७३ उमेदवार रिंगणात उतरले आहे.



अमरावती जिल्ह्यातील पुढे ढकलेली एक मेव अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेची निवडणूक आहे . आता दुसऱ्या टप्प्यातील निवडणूक कार्यक्रम २० डिसेंबरला मतदान होणार आहे . आवाजी प्रचार तीन दिवसांपासून सुरू झाला मात्र या निवडणुकी मतदारांत उत्सूकता दिसून येत नाही तर उमेदवारांनी खर्चावर ब्रेक लावला आहे. त्यामुळे अंजनगाव नगरपरिषदेची निवडणूक आहे की ग्रामपंचायतीची निवडणूक आहे असे चित्र शहरात पाहायला मिळत आहे. इच्छुक उमेदवारांची उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी इच्छुक उमेदवार उमेदवारी मिळाल्यास एक कोटी रुपये निवडणुकीला खर्च करु म्हणवणारे उमेदवार आज पक्षाच्या निधीच्या भरवशावर निवडणुकीचा खर्च भागवतांना दिसत आहेत. अंजनगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी सात उमेदवार रिंगणात असून त्यातील पाच उमेदवार मतदारांत ओळख परिचित आहेत तर या पाच उमेदवारा पैकी दोन उमेदवार आर्थिक परिस्थितीने गरीब आहेत तर तीन उमेदवारांन पैकी दोन उमेदवार कोट्याधीश आहेत तर एक लखपती आहे या कोट्याधीश उमेदवारांचा प्रचार कार्यकर्त्यांवर खर्च सर्वात कमी होत असल्याची माहिती त्याच पक्षातील प्रभागाचे उमेदवार सांगत आहे. नगराध्यक्ष पदाच्या या दोघांचा निवडणूक खर्च निवडणूक संपेपर्यंत एक ते दोन लाखाच्या जवळपास खर्च होणार असल्याची माहिती समोर येत आहे तर एका नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांचा खर्च सत्तेत सहभागी असलेल्या पक्षाच्या वतीने फंड मिळाला त्यातून प्रचार खर्च उमेदवार करीत असल्याचे समजते. सत्तेत सहभागी असलेल्या पक्षाने शहरातील एका इच्छुक उमेदवाराला समाजांचे मतदान जास्त असल्याने व आर्थिक बाजू दनकट असल्याने नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली मात्र आर्थिक बाजू दनकट असली तरी उमेदवार मात्र खर्च करीत नसल्याचे पाहून उमेदवाराला सत्तेत सहभागी असलेल्या पक्षाने लाखो रुपये फंड खर्चा करीता दिला मात्र नगराध्यक्ष पदाचा उमेदवार खर्च न करीता त्या पक्षाच्या फंडातील रक्कम खिशात ठेवण्याचा प्रयत्न प्रयत्न करीत आहे अशी माहिती दबक्या आवाजात त्याच पक्षातील प्रभागातील उमेदवार सांगत आहे. त्यामुळे या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचा पराभव खर्चा मुळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे आम्हाला सुद्धा पराभवाचा सामना करावा लागेल अशी भावना प्रभागातील एका सत्ताधारी पक्षाच्या उमेदवाराने बोलून दाखवली आहे.

## मतदार यादीत गोंधळात गोधळ

### एका घरातून २०० मतदारांची नावे
### मुन्ना राठोड व समीर जवंजाळ यांचा आरोप

**अमरावती/ का.प्र.**

महानगर पालिकेच्या आगामी -निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेल्या प्रारूप मतदार यादीत आश्चर्यकारक व गंभीर खुलासा झाला आहे. प्रभाग क्रमांक १८ (राजापेठ कवरनगर) मधील एका घरातून तब्बल २०० मतदारांची नावे नोंदवली गेली असल्याने राजकीय व प्रशासनिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.



माजी नगरसेवक मुन्ना राठोड आणि युवक काँग्रेसचे समीर जवंजाळ यांनी या प्रभागातील मतदार संख्येत असामान्य वाढ झाल्याचा आरोप आधीच केला होता. त्यांच्या माहितीनुसार, सदर प्रभागातील संख्या अचानक साडेतीन हजारांपर्यंत वाढली आहे. मात्र आता सारंग राऊत या व्यक्तीच्या नावाखाली २०० मतदारांची नावे असल्याचे समोर आले आहे, ज्यामुळे मतदार अनेकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. यात विविध आडनावाची नावे देखील आहेत. निवडणूक पारदर्शकतेला मोठा धक्का लागतो. प्रक्रियेतील पारदर्शकतेला मोठा धक्का लागतो.

निवडणूक आयोगाशी संपर्क साधल्यावर त्यांनी स्पष्ट केले की, आमच्याकडे या प्रारूप यादीत फेरफार करण्याचा किंवा मतदारांची नावे कमी करण्याचा अधिकार नाही. सद्यस्थितीत कोणताही अधिकाऱ्याला यावर निर्णय घेण्याची जबाबदारी नाही. त्यामुळे या मतदारांची भविष्यातील भूमिका काय असेल, हे अजून एक मोठे प्रश्नचिन्ह आहे. विशेषज्ञांचे मत आहे की, अशा प्रकारच्या अनियमिततेमुळे मतदारांचा विश्वास कमी होतो आणि निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता धोक्यात येते. स्थानिक राजकारणात यामुळे चर्चेला जोर मिळाला आहे आणि नागरिकांमध्येही अनेक शंका निर्माण झाल्या आहेत. राजापेठ कवरनगर प्रभागातील ही घटना आता सर्वच पक्षांची लक्षवेधक ठरली आहे. अनेक पक्षांनी या घटनेवर दखल घेत प्रशासनाला त्वरित तपास करण्याची मागणी केली आहे. स्थानिक राजकारण्यांपासून नागरिकांपर्यंत सर्वांच्या मनात एकच प्रश्न आहे एका घरातून इतक्या मतदारांची नावे कशी समाविष्ट होऊ शकली ? महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही घटना प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आणि निवडणूक आयोगाच्या तत्परतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत आहे. आता बघायचे राहिले आहे, की या गोंधळाचे सरकार आणि प्रशासन एकत्रितपणे निराकरण करतात की, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकतेला कायमस्वरूपी धक्का लागतो.

## नोकरी द्या नाहीतर भत्ता द्या...

### संतप्त एनएसयुआयचा विधानभवनावर घेराव मोर्चा
### कठड्यावर चढत विधान भवनाकडे जाण्याचा प्रयत्न
### अमरावतीचे २००-२५० विद्यार्थी आंदोलनात सहभागी

**अमरावती/ का.प्र.**

केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांनी तरुणांना रोजगार देण्याचे गाजर दाखवून मते मिळवली. परंतु सत्तेवर आल्यावर प्रत्यक्षात तरुणांना रोजगार मिळत नाही. त्यामुळे शुक्रवारी नागपुरातील विधान भवनावर नॅशनल स्टुडेन्ट्स युनियन ऑफ ऑफ इंडियाने इंडियाने मोर्चा मोर्चा काढला. काढला. मोर्चा पोलिसांनी अडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कार्यकर्ते संतापले. त्यांनी पोलिसांच्या कठड्यावर चढतविधान भवनाकडे जाण्याचा प्रयत्न केला. यामुळे येथे तणाव निर्माण झाला होता.

प्रदेश अध्यक्ष सागर साळुंखे, प्रभारी अक्षय क्रांतिवीर, प्रदेश उपाध्यक्ष संकेत कुलट यांच्या नेतृत्वात हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सरकारच्या उदासीन धोरणांचा तीव्र निषेध केला. अमरावती जिल्ह्यातून प्रदेश उपाध्यक्ष संकेत कुलट व जिल्हाध्यक्ष सर्वेश खांडे यांच्या नेतृत्वात २५० हून अधिक विद्यार्थ्यांचा ताफा नागपुरात आंदोलनात सहभागी झाला.

नोकरी द्या, नाहीतर भत्ताद्या! अशीएकच घोषणा राज्यभरातून आलेल्याविद्यार्थ्यांनी दिली. विद्यार्थ्यांना नोकरी किवा भत्ता द्या, विद्यार्थी संघ निवडणुकांची त्वरित पुनरुस्थापना करा,



आदिवासी, दलित व ओबीसी विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व वाढवून त्यांच्या समस्या सोडवा, विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर फी वाढीस तात्काळ विरोध करा व फी वाढ रद्द करा, विद्यार्थिनींच्या वसतिगृहांत व सार्वजनिक सुविधांमध्ये सॅनिटरी वेंडिंग मशीनची उपलब्धता सुनिश्चित करा, कॅम्पस संबंधित पर्यावरण, स्वच्छता व आरोग्य सुरक्षा मजबूत करा सरकार फक्त घोषणा करते, मात्र प्रत्यक्ष कृती शून्य आहे. हा विद्यार्थ्यांचा आक्रोश आहे आणि तो थांबणार नाही जोपर्यंत सरकार मागण्या मान्य करत नाही. एन.एस.यू.आय.हा लढा असाच सुरू ठेवेल आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरेल. सरकारने त्वरित दखल घेऊन मागण्या पूर्ण कराव्यात, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र होईल असा इशारा यावेळी देण्यात आला.


आंदोलनात प्रामुख्याने सर्वेश खांडे, निलेश गुहे, नितीन काळे, रोशन पिठेकर, स्वप्निल सावं, पंकज मांडळे, छोटू दाभाडे, आशिष काळे, निलेश नांदणे, सुयश श्रीराव, वैभव भोरे, आदित्य साखरे, शिवा खांडे, स्वराज पोटे, वेदांत साखरे, आयुष निर्मळ, अजिक्य खरळ, सचिन छापाणी, आदित्य देशमुख, अनिकेत प्रधान, वैभव तानोळकर अजिक्य धवणे, निकेत रोड, सुरज खैरे, यासिन, देवांग सगणे, रोहित तायडे, विनय आगलावे, प्रथमेश सगणे, वल्लभ गंडाळे, मोहम्मद उमेर, राज भेंडे, ताबीश खान, जय सागळे, आदेश तायवाडे, प्रणय जुनघरे, प्रज्वल धोंडे, साहिल जुनघरे, राजू तंबाखे, क्रिश भिसणे, आदींसह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले.

## अं. सुर्जी नगरपरिषद निवडणुकीत अपक्षांचा बोलबाला

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १२ मधून अपक्ष उमेदवार म्हणून सामाजिक कार्यकर्ते मनिष तव्वर यांना पसंती दिसत आहे.

सामाजिक कार्यात सक्रिय आणि प्रभागातील नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवणाऱ्या मनिष तव्वर यांनी यापूर्वी विविध स्थानिक प्रश्नांवर पुढाकार घेतल्याचे मानले जाते. त्यांच्या उमेदवारीनंतर प्रभागातील स्थानिक राजकारणाला नव्या चर्चांना उधाण आले आहे. मनिष तव्वर हे अपक्ष उमेदवार असून त्यांना बोधचिन्ह म्हणून निशाणी बॅट मिळाली आहे.निवडणूकीत प्रचारात या चिन्हाभोवती प्रभाग क्रमांक १२ मध्ये बटन क्रमांक तीन वर रणनीती अधिक गती घेण्याची शक्यता व्यक्त होत आहे.प्रभागातील पायाभूत सुविधांचा विकास, नागरिकांच्या मूलभूत सुविधा व स्थानिक प्रश्नांवर उपाययोजना या प्रमुख मुद्यांवर येणाऱ्या दिवसांत चर्चा रंगतील, अशी अपेक्षा आहे. अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसतसे प्रभाग १२ मधील राजकीय वातावरण अधिक उत्सुकता निर्माण करत असल्याचे चित्र आहे.



# अनुपम्य : धनुर्मास (धुधुंरमास)

आपली भारतीय संस्कृती विविध अंगाने नटलेली आहे.आहार, विहार, विचारांच्या अनुसरनाने, पुराण काळापासून ते आज पावतो ; यापुढे ही अनंत युगे संस्कृतीचा वारसा अबाधित राखण्यास समर्थ काळात संक्रमण करीत आहोत.भारतीय कालगणना आणि पौराणिक संदर्भानुसार, नवग्रहाचा राजा सूर्य मानला गेला आहे.सूर्य सुमारे तीस दिवस एका राशीत विराजमान असतो. या गणनेनुसार, सूर्य वर्षाला सर्व बारा राशीतून एकदा भ्रमण करतो. केवळ अडीच ते तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासात सूर्याचे एका राशीतून दुसऱ्या राशीत संक्रमण होत नाही. मात्र सामान्यरित्या वर्षभर वर्षभर सूर्य सर्व राशींमध्ये विराजमान होतो.सूर्याच्या या संक्रमणाला संक्रांति ओळखल्या जाते. त्यामुळे सूर्य ज्या राशीत असेल त्या नावाच्या राशीने संक्रांती संबोधल्या जाते. डिसेंबर महिन्याच्या मध्यावर आणि मकर संक्रांतीच्या एक महिना आधी दिवसाच्या उत्तरार्धात सूर्य वृश्चिक राशीतून धनु राशीत प्रवेश करीत आहे. सूर्याच्या या संक्रमणाला धनु संक्रांति असे म्हटले जाते. आणि सूर्याचे हेच भ्रमण ङधनुर्मासङ म्हणून ओळखले जाते. मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी येणारी भोगी, हा धनुर्मासाच्या शेवटचा दिवस असतो. हा कालखंड दक्षिणायानात हेमंत-शिशिर ऋतूमध्ये असतो. या धनुर्मासाला ' धुधुंरमास' 'खरमास' 'शून्यमास'अशा नावांनी ओळखल्या जाते. इंग्रजी किंवा मराठी दिनदर्शिकेत या महिन्याचा स्वतंत्र उल्लेख बघायला मिळत नसला,तरी धनुर्मासाला आपल्या संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे.

आपल्या पूर्वजांनी भौगोलिक आणि खगोलशास्त्रीय गतिविधिंचा मानवी जीवनाशी संबंध जोडलेला दिसतो. धनुर्मास सुद्धा त्याला अपवाद नाही. पौराणिक कथेनुसार, ब्रम्हादी देवगणांनी भगवान विष्णूंना प्रार्थना केली की, आम्हाला दैत्य दानवांच्या त्रासातून मुक्त करा. प्रार्थनेनुसार, भगवान विष्णूंनी हातात धनुष्य घेऊन दैत्याचा संहार केला. ही घटना सूर्य धनु राशीत असताना घडली. म्हणून याला धनुर्मास किंवा धुधुंरमास अशी संज्ञा मिळाली. आयुर्वेदानुसार, मकर संक्रमणाच्या आधी हेमंत ऋतू मध्ये येणाऱ्या धनुर्मासात सामान्य लोकांचा जठराग्नी (पोटाची भूक) भल्या पहाटे जागृत होते. त्यामुळे या महिन्यात पहाटे उठून हेमंत ऋतूत उपलब्ध असणाऱ्या हंगामी फळे, विविध भाज्या, बाजरी सारखे धान्य खायचे महत्त्व आहे.हे खाद्य पचण्यास जड असले, तरी या ऋतूत मात्र राजस मानलं गेले आहे.संपूर्ण वर्षभराच्या खाद्यांन्नातून जी ऊर्जा मिळवीता येत नाही, ती या एका मिळण्याचे सामर्थ्य असते. याचे महत्त्व आपण आपल्या वाडवडील, पूर्वजांकडून ऐकत आलो आहे.आपल्या जठराग्नींचे इंधन आपले खाद्य होय. उदरातील अन्न अग्नी प्रदीप्त झाल्यावर ते मिळालेच पाहिजे. त्याच्या अभावानेच रस, रक्त आदीं धातूंच्या नाश पावतो. म्हणून मानवास शारीरिक थकवा दुर्बलता येते. हे सर्व टाळण्यासाठी धनुर्मासात सूर्योदय झाल्यानंतर सकस आहारांची गरज आयुर्वेदाने दर्शविली आहे. धनुर्मासात पहाटे कितीही कडाडून भूक लागली,तरी ताजे गरम अन्न आधी सूर्याला अर्पण करावे. अर्थात, नैवेद्य दाखववा. मग मानवाने सेवन करावे.अशी आपली सांस्कृतिक परंपरा आहे.आपले सर्व आहार अन्न सूर्याच्या शक्तीने निर्माण होते. कृतज्ञतेचा भाव भोग म्हणून सूर्य देवाला अर्पण करणे, ही त्या मागची भूमिका असते.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केल्यास या कालावधीत भल्या पहाटेला; म्हणजेच ब्रह्म मुहूर्ताच्या काळात, वायुमंडलात ओझेन प्राणवायूच्या लेअर अतिशय शुद्ध असतो. शुद्ध ऑक्सिजनचे प्रमाण भरपूर असते. पहाटे फिरायला जाणे, योग्य प्राणायाम करणे अतिशय महत्त्वाचे सांगितले गेले आहे.तीव्र शीत लहरी, प्रदूषणमुक्त आल्हादायक, उत्साहवर्धक वातावरण असते. तसेच ज्ञानार्जनासाठी ब्रह्म मुहूर्ताचा काळ उत्तम सांगितला आहे. एकंदरीत बल,बुद्धी,आरोग्याच्या विकासासाठी धनुर्मासाकडे एक व्रत म्हणून बघावेत. पौराणिक, शास्त्रीय, वैज्ञानिक, आरोग्यशास्त्र आणि धर्मशास्त्रांचा मेळ धनुर्मासात आपल्या ऋषीतुल्य पूर्वजांनी घालून दिलेला आहे. जी आपल्या संस्कृतीची देण आहे.

**शशिकांत म. तोटे**
दारव्हा,जि.यवतमाळ
मो :९१३०८३५४५८

# शेतकरी राजा ग्रुपचे पातूर येथे 'रास्ता रोको' आंदोलन

■ **प्रतिनिधी | खेट्री** ■

*शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी राजा ग्रुपच्या वतीने सोमवार, १५ डिसेंबर रोजी पातूर तहसील कार्यालयासमोर 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. तालुक्यात नाफेडचे शासकीय धान्य खरेदी केंद्र केवळ एकच असल्यामुळे शेकडो शेतकऱ्यांची नोंदणी झालेली असून, इतक्या मोठ्या प्रमाणात शेतमालाची खरेदी करणे अशक्य होत आहे.*



## प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन तूर्तास स्थगित

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी नाफेडच्या शासकीय धान्य खरेदी केंद्रांची संख्या वाढवावी, तसेच सोयाबीन खरेदी करताना लागू असलेल्या नियम व अटींमध्ये बदल करावा, अशा प्रमुख मागण्या घेऊन शेतकरी राजा ग्रुपकडून यापूर्वीही प्रशासनाला वारंवार निवेदने देण्यात आली होती. मात्र प्रशासनाकडून ठोस दखल न घेतल्याने अखेर शेतकरी राजा ग्रुपचे रवी सोनोने यांच्या नेतृत्वाखाली पातूर येथे 'रास्ता रोको' आंदोलन छेडण्यात आले.

या आंदोलनाला शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे तसेच सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांनी पाठिंबा देत आंदोलनस्थळी भेट दिली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पातूरचे सहाय्यक निबंधक ज्योती मलिये, नायब तहसीलदार कातखेडे आणि खरेदी-विक्री संस्थेचे अजय देशमुख यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा केली. शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन देत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. या आश्वासनानंतर ग्रुपने 'रास्ता रोको' आंदोलन तूर्तास स्थगित केले.

**आंदोलनात सहभाग नोंदविणारे शेतकरी :** राजा ग्रुपचे रवी सोनोने, गोपाल पजई, गणेश ताले, ज्ञानेश्वर गाडगे, प्रल्हाद नीलखन, दशरथ सरदार, शालिग्राम राऊत, महादेव अडकणे, भगवंता काळदाते, योगेश राऊत, दिनकर लाऊडकर, गजानन राखोंडे, गोपाल सोनोने, मनीष देशमुख, पांडुरंग कुरई, प्रेम पजई, संतोष देशमुख, मंगेश गाडेकर, गजानन झोडपे, रामकिसन ताजने, मंगल गाडेकर, गजानन सोनोने, रामकृष्ण पाटील, जानराव गवई, अतुल वसत्कार, अब्दुल रहीम, सचिन शेळके, राहुल ताले, श्रावण सोनोने यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभाग नोंदविला.

# व्यापार व उद्योगाच्या नवीन प्लॅटफॉर्म साठी विदर्भ चेंबरची विटेक्स २०२६ प्रदर्शनी

■ **प्रतिनिधी | अकोला** ■




विदर्भ चेम्बर ऑफ कॉमर्स एन्ड इंडस्ट्री, अकोला द्वारा आयोजित व मुख्य प्रायोजक मार्वल ट्रिनीटी रियल एस्टेट एलएलपी व सह प्रायोजक विठ्ठल ऑईल असणारी विटेक्स प्रदर्शनी २०२६ चे भव्य आयोजन दि २, ३, ४ व ५ जानेवारी २०२६ रोजी गोरक्षण रोड येथील गोरक्षण संस्थान ग्राउंडवर होत आहे.या विशाल प्रदर्शनीत १८० पेक्षा जास्त स्टॉल्स राहणार असून या माध्यमातून परिसरातील लहान मोठे उद्योग, व्यापारी, सेवा प्रदाता व स्टार्ट-अप्स द्वारे आपले सर्वश्रेष्ठ उत्पादने व सेवांचे प्रदर्शन व विक्री करणार असून सर्व अकोलकर नागरिकांसाठी स १० ते रात्री १० पर्यंत प्रवेश मोफत असणारी ही प्रदर्शनी व्यापारी, उद्योजक व नागरिकासाठी मोठी पर्वणी ठरणार असल्याची माहिती विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी दिली.सोमवारी चेंबरच्या कार्यालयात संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत या व्यापार उद्योग प्रदर्शनीची माहिती देण्यात आली.यावेळी मंचावर चेंबरचे सचिव निरव वोरा,वरीष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया,कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री,सहसंयोजक राहुल मित्तल आदी उपस्थित होते.विटेक्स २०२६चा मुख्य उद्देश्य पश्चिम विदर्भात व्यापार, उद्योग व उद्यमिताला गति मिळावी, स्वदेशी, मेक इन इंडिया व वोकल फॉर लोकलच्या ग्लोबल भावना ला पुढे नेणे,रोजगाराचे नवे दालन उघडणे तथा अकोला जिल्ह्यास एक वाढते प्रमुख व्यापारिक हबच्या रुपात स्थापित करने आहे.हे आयोजन क्षेत्रीय एमएसएमई, स्टार्ट-अप्स, एग्रो-प्रोसेसिंग यूनिट्स व स्थानीय उत्पादनास व्यापक बाजार प्रदान करण्यासाठी एक प्रभावी माध्यम निर्माण करणे होय.या प्रदर्शनीत १८० पेक्षा अधिक आकर्षक स्टॉल्स राहणार असून पश्चिम विदर्भातील उद्योग–व्यापाराची आतापर्यंतचे सर्वात मोठे आयोजन हे राहणार असून यात एकाच छतात सर्व प्रकारचे उत्पादन व सेवा राहणार आहेत. सर्व कुटुंबातील सदस्यांना याचा लाभ घेता येईल असे हे आयोजन असून यात विभिन्न स्वादाने भरपूर विशेष फूड ज़ोन राहणार असून मोफत प्रवेश व मोफत विशाल पार्किंग राहणार आहे. या प्रदर्शनीतष्सोलर पैनल्स व फिटिंग्स, फर्नीचर,गृहपयोगी साहित्य, होम डेकोर व इंटीरियर डिज़ाइनिंग, गिफ्ट आर्टिकल्स, डिजाइनर कपड़े,ऑटोमो बाइल्स, स्पोर्ट्स व फिटनेस, रोबोटिक्स, वेलनेस सेक्टर, वॉटर ट्रीटमेंट सॉल्यूशन, एग्रो प्रोसेसिंग यूनिट्स साठी मशीनरी व साहित्य, डेयरी प्रोडक्ट्स, प्री-फैब्रिकेटेड स्ट्रक्चर,बैंकिंग, फाइनेंस सेवा, करियर गाइडेंस,गृह निर्माण, अकाउंटिंग सॉफ्टवेयर समवेत व्यापारी व नित्य उपयोगी पडणारे सर्व उत्पादने व सेवा राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या व्यापार प्रदर्शनीचा उद्योजक व व्यापारी वर्गाला पण लाभ होणार असून यात त्यांना नवीन व प्रभावी बी टू बी संधी, उद्योग व उद्योजकांसाठी मजबूत नेटवर्किंग प्लेटफॉर्म,ग्राहक, उत्पादनांची प्रत्यक्ष खरेदी व लाइव डेमो,तांत्रिक, मशिनरी व आधुनिक सेवाचे सहज अवलोकन, फूड कोर्ट मध्ये विभिन्न प्रकारचे स्वादिष्ट प्रकार,संपूर्ण प्रदर्शनीत १.५० लाख प्रेक्षकांची येण्याची अपेक्षा आहे.हे चार दिवसीय प्रदर्शन सफल करण्यासाठी उपसमित्या गठीत झाल्या असून त्यात प्रदर्शनी स्थळ निर्माण समिती मध्ये पंकज कोठारी, राजकुमार राजपाल, अनुराग अग्रवाल, नरेश अग्रवाल, अमरीश पारेख, केतन गुप्ता, रितिक अग्रवाल कामकाज बघणार आहेत.स्थळ व्यवस्थापन समितीमध्ये निखिल अग्रवाल, राहुल मित्तल, श्रीकांत गोयनका, आशुतोष वर्मा,ओम अग्रवाल, मनोज मोर राहणार असून प्रदर्शनी स्थळ बनिर्माण समितीत इंजि. कपिल ठक्कर,सिद्धेश मुरारका भुषण अग्रवाल, स्टॉल नोंदणी समितीमध्ये सलीम डोडिया, चंचल भाटी, प्रणय कोठारी, सुधीर राठी, हिमांशू खंडेलवाल,प्रतीक अग्रवाल, यश सिंघनिया राहणार आहेत. स्टेज व कार्यक्रम व्यवस्थापन समितीमध्ये निरव वोरा, किरीट मंत्री, निलेश अग्रवाल, संतोष छाजेड, मधुर खंडेलवाल, सीए प्रशांत लोहिया,मनोज अग्रवाल, पियुष खंडेलवाल राहणार आहेत.

# अकोट येथे राष्ट्रीय लोकअदालत ३,६५२ प्रकरणांचा निपटारा

## १ कोटी ७१ लाखांहून अधिक रकमेची वसुली

■ **प्रतिनिधी | अकोट** ■

अकोट येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दि. १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये चार पॅनलच्या माध्यमातून एकूण ३,६५२ प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात आला. यामधून एकूण १ कोटी ७१ लाख ८३ हजार ७९० रुपयांची वसुली करण्यात आली. जिल्हा न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष बी. एम. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सदर राष्ट्रीय लोकअदालत संपन्न झाली. लोकअदालतीमध्ये दिवाणी व फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात दावे, बँकांची प्रकरणे, दाखलपूर्व प्रकरणे, एम.एस.सी.बी., बी.एस.एन.एल., ग्रामपंचायतीचे घरपट्टी, पाणीपट्टी तसेच घरकुल संबंधित प्रकरणांचा समावेश होता.

या लोकअदालतीत १५५ दिवाणी व फौजदारी प्रकरणांचा तर ३,४९७ दाखलपूर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. अशा प्रकारे एकूण ३,६५२ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

पॅनल प्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश बी. एम. पाटील, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एम. एस. काळे, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आरिफ हारुण शेख व ए. एस. माळी यांनी काम पाहिले. विधीज्ञ म्हणून पी. व्ही. भारसाकळे, एस. एस. नाथे, पी. एस. पागृत व पी. एस. रेखाते यांनी सहभाग नोंदविला. या उपक्रमात बँकांचे अधिकारी व कर्मचारी, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बहुरे, समाजसेवक विजय जितकर, विधी स्वयंसेवक डी. टी. भगत, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले. लोकअदालत यशस्वी होण्यासाठी सहायक अधीक्षक पी. एस. बोराळे, सहायक अधिक्षक तसेच सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मोकाट श्वानांचे निर्बीजीकरणाचे कामाला उद्यापासून सुरूवात



■ **प्रतिनिधी | अकोला** ■

अकोला महानगरपालिका क्षेत्रात मोकाट श्वानांची वाढती संख्या लक्षात घेता आणि यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मनपाने यापूर्वी बीड येथील युनिवर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटीला कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाचा ठेका दिला होता. परंतू या संस्थेचा ठेका ३१ मार्च रोजी संपला होता.

मनपाने तीन वेळा निविदा मागवूनही केवळ बीडच्या याच जुन्या संस्थेने निविदा भरल्यामुळे परत याच संस्थेला पुन्हा या कामाचा कार्यादेश देण्यात आला असून उद्यापासून सदर संस्थाकडून शहरातील मोकाट श्वान पकडून त्यांच्यावर शस्त्रक्रिया आणि लस देण्याच्या कामाला सुरूवात होणार असल्याबाबत कोंडवाडा विभाग प्रमुख अनिल बिडवे यांनी माहिती दिली आहे.

# निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहा.निवडणूक अधिका-यांची नियुक्त्या




■ **प्रतिनिधी | अकोला** ■

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५ करीता मा. राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचार संहिता लागू केली असून मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहा.निवडणूक निर्णय अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ज्यामध्ये प्रभाग क्रं. १-नांयगांव, प्रभाग क्रं. २-आकोट फैल, प्रभाग क्रं. ७-तारफैल करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री मनोज लोणारकर उपविभागीय अधिकारी, आकोट यांची सहा. निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.१ म्हणून राहुल वानखडे तहसीलदार, पातुर तसेच सहा. निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.२ म्हणून मुजीब रेहमान उपविभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, अकोला आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.३ म्हणून विठ्ठल देवकते प्र.सहा.आयुक्त क्षेत्रीय कार्यालय उत्तर झोन क्षेत्रीय कार्यालय, मनपा अकोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच प्रभाग क्रं. ३-जठार पेठ, प्रभाग क्रं. ४-उमरी, प्रभाग क्रं. ५-रामनगर, प्रभाग क्रं. ६-रामदासपेठ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री शरद जावळे, उपविभागीय अधिकारी, अकोला यांची सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.१ म्हणून श्रीमती गोरी धायगुडे तहसीलदार, स.गा.यो.अकोला तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.२ म्हणून श्री मोहन व्यवहारे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.३ म्हणून श्रीमती नंदीनी दामोदर, सहा.अधिक्षक, कर विभाग, मनपा अकोला. यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रभाग क्रं. ८-डाबकी रोड, प्रभाग क्रं. ९-भिम नगर, प्रभाग क्रं. १०-शिवाजी नगर, प्रभाग क्रं.१७- हरिहरपेठ करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एस.एस.अपार उपविभागीय अधिकारी, मर्तीजापुर यांची सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.१ म्हणून पी.झेड.भोसले तहसीलदार, नझूल, जि.अकोला तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.२ म्हणून श्री वि.सा.चौधरी, उपअभियंता, का.अ.यांत्रिकी विभाग, आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.३ म्हणून श्री गजानन घोंगे, प्र.सहा.आयुक्त क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम विभाग, मनपा अकोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# लोकतांत्रिक जनाधार पार्टी मनपा निवडणुकीत ४० उमेदवार उभे करणार



**अकोला :** महानगराच्या सर्वांगीण व स्वच्छ विकासासाठी नव्या दमाची लोक तांत्रिक जनाधार पार्टी आगामी मनपा निवडणुकीत विविध प्रभागात आपले ४० उमेदवार उभे करून महानगराचा साचेबद्ध विकास करणार असल्याची माहिती लोकतांत्रिक जनाधार पार्टीच्या वतीने सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

राष्ट्रात कार्यक्षम व तडफदार कार्यकर्ते निर्माण करून राष्ट्राचा व त्यातील सर्व जाती जमातीच्या नागरिकांचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने निवडणूक आयोगाकडून मान्यताप्राप्त लोकतांत्रिक जनाधार पार्टी लोकसेवा करीत आहे. या अनुषंगाने महानगरात प्रथमच मनपा निवडणुकीत पार्टी निवडणूक लढवीत आहे.प्रत्येक प्रभागाचा सर्वांगीण, स्वच्छ विकास व पारदर्शी प्रशासन हे या पार्टीचे ब्रीद असून यासाठी समर्पित व विकासाचे भोक्ते असणाऱ्या कार्यकर्त्यांनाच कोणत्याही पक्षांची युती न करता पक्ष आपली उमेदवारी बहाल करून प्रलंबित विकासाला चालना देणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पार्टीकडे समर्पित कार्यकर्त्यांची फौज असून अनेक प्रभागातून कार्यक्षम उमेदवार पार्टीकडे उपलब्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या पत्रकार परिषदेत पार्टीचे प्रदेशाध्यक्ष दिनेश श्रीवास, प्रदेश सचिव शाम त्रिपाठी, विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत अग्रवाल,विधि अध्यक्ष एड अभिषेक गौतम, महानगर अध्यक्ष जय तिवारी, शहर अध्यक्ष संजय रील, उत्तरमंडळ अध्यक्ष लक्ष्मीकांत दुबे, प्रसिद्धी प्रमुख मोहन शुक्ला, प्रमुख कार्यकर्ते एड अभय गौतम,संदीप उपाध्याय, प्रकाश गावंडे समवेत पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अकोल्याचे ३० बालवैज्ञानिक विद्यार्थी निघाले इसरो वारीला

**अकोला :** विज्ञानवेध उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ३० बाल वैज्ञानिक विद्यार्थी इसरो अभ्यास दौऱ्याकरीता रवाना झालेत यावेळी जिल्हाधिकारी वर्षा मीना,जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम,उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे,शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार आदी उपस्थित होते.

१५ ते २१ डिसेंबर सात दिवसाच्या दौऱ्यामध्ये विद्यार्थी विमानाने बंगलोर नंतर श्रीहरीकोटा येथील इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन, मैसूर पॅलेस , हैद्राबाद येथील सालारजंग म्युझियम, गोवळकोंडा चा किल्ला, रामोजी फिल्म सिटी व इतर स्तळांना भेट देणार आहेत.


## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे कवल बंडू अहिर यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ, रजी. खरेदी खत क्र. १८४१ दिनांक १३/०८/२०२०, रजी. खरेदी खत क्र. १८९५ दिनांक १८/०८/२०२० या क्रमाकाचे मूळ खरेदी खत दि. २८/११/२०२५ रोजी pkv ते midc, अकोला येथे हरवले आहे त्याबाबत कवल बंडू अहिर यांनी पोलीस स्टेशन midc, अकोला येथे दि. ३०/११/२०२५ रोजी तक्रार दिली आहे त्याचे तक्रार क्र. २६/२५ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ३ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी.तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :-

**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र. ९१७५९३८२४२

## जाहीर नोटीस

दि. १५/१२/२०२५

सर्वत्रास कळविण्यात येते की, माझे पक्षकार वानखडे सचिन पुंजाबराव यांनी गजानन नारायण कपलेइ ३ सर्व रा. मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला यांचेसोबत मौजे उमरी प्र. बाळापुर प्र. ता. जि. अकोला र. डी. र. स. डी. जि.प. प.सं. अकोला पुर्वीची ग्रा.पं. उमरी प्र. बाळापुर व सद्यास्थितीत म.न.पा. अकोल्याच्या हद्दीतील गट क्र. १९ मधील १.८८ हे. आर. शेत जमिनीचे अकोला महानगर पालिका, नगर रचना विभाग यांच्या प्रस्ताव नं. ४३०३९ व प्रस्ताव कोड DDMCO- २३-८२१६० अकोला म.न.पा. मान्यता प्रकरण क. DDMCO/LF/2024/APL/00095 दिनांक ०७/०३/२०२४ नुसार लेआऊट नकाशा मंजुर झालेला आहे. वि. तहसिलदार अकोला यांचे आदेश क्र. जा.क./ तह. / प्रस्तु - १ /कावि/ ११८२/२०२४ नुसार लेआऊट नकाशा मंजुर झालेला आहे. वि. तहसिलदार अकोला यांचे आदेश क्र जा.क./तह. / प्रस्तु-१/कावि/११८२/२०२४ अन्वये सनद अकृषीत वापराची परवानगी मिळाली तसेच मा. तहसिलदार अकोला यांच्या फाईलवरील रा.मा.क. एन. ए. पी. ३४ / उमरी बाळापुर/२२/२०२३ - २०२४ आदेश दिनांक १८/०३/२०२४ अन्वये मंजुर झालेल्या लेआऊट नकाशातील लेआऊट प्लॉट क्र. १६अ (सोळा अ) चा खुला प्लॉट (७/१२ गट क्र. व उपविभाग १९/१६अ)

**त्याचे मोजमाप :-** पुर्व बाजु : १५.९९ मिटर, उत्तर बाजु : ८.०० मिटर, पश्चिम बाज : १५.९९ मिटर, दक्षिण बाजु : ८.०० मिटर, ज्याचे एकुण क्षेत्रफळ १२७.९९ चौ. मिटर (१.३७७.१७ चौ. फुट )

**त्यास चर्तु:सिमा :-** पुर्वेस -लेआऊट प्लॉट नं. १६ब, पश्चिमेस - लेआऊट प्लॉट नं. १५ब उत्तरेस - लेआऊट प्लॉट नं. १८अ दक्षिणेस :- ९ मिटर रूंदीचा लेआऊट रस्ता

अशा वर्णनाची मालमत्ता माझे पक्षकारांनी गजानन नारायण कपलेइ ३ यांचेसोबत सदरहु वर्णनांकीत प्लॉट विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे व त्याचा इसार दि. १३.१२.२०२५ रोजी झाला असुन खरेदी लवकरच म्हणजेच दि. २७/०१/२०२६ किंवा त्यापुर्वी कधीही नोटीस प्रकाशन झाल्या नंतर करण्याचे ठरले आहे. करीता सर्वांना सुचीत करण्यात येते की, वर उल्लेखीत मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, कर्ज, गहाण, बोजा वा इतर कोणताही हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्दी पासुन ७ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी पुराव्यासह व कागदपत्रासह कळवावे. कोणाचीही कोणतीही प्रकारे हरकत न आल्यास माझे पक्षकार वर उल्लेखीत मालमत्ता खरेदी करतील. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे उजर ऐकली जाणार नाही. करीता ही जाहीर नोटीस.

**पक्षकारा तर्फे अधिवक्ता**
ॲड. डी. डी. सावरकर, अकोला
रेणुका नगर, बोरगांव मंजु, अकोला, ता. जि.
अकोला. मो. क्र. ९८५०२७६५८६

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२१४/२०२५ — प्रोसेस नं.२००४०/२०२५
चौ.ता. १६/०१/२०२६ — दिनांक : ०५/१२/२०२५

**अर्जदार :** १. शांताबाई अशोक धांडे रा. हनुमान मंदिराजवळ, संजय नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. दिपाली राजु चाटसे रा. इंदिरा नगर, हिंगोली, ता. जि. हिंगोली ३. उज्वला नितीन बाव्हळ रा. संजय नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ४. गजानन अशोक धांडे रा. संजय नगर, दुर्गा देवी मंदिराजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक पुंजाजी धांडे
**पत्ता :-** रा. हनुमान मंदिराजवळ, संजय नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक पुंजाजी धांडे यांचे दि. १७/ ११/ २०२१ रोजी राहत्या घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६ / ०१ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१८०/२०२५ — प्रोसेस नं.२०१९४/२०२५
चौ.ता. १९/०१/२०२६ — दिनांक : ०८/१२/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती मिरा हरिष अलिमचंदानी २. दुश्यंत हरिष अलिमचंदानी ३. शैलेश हरिष अलिमचंदानी सर्व रा. सितला माता मंदिराजवळ, शास्त्री नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : हरिष तिलुमल अलिमचंदानी
**पत्ता :-** रा. सितला माता मंदिराजवळ, शास्त्री नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत हरिष तिलुमल अलिमचंदानी यांचे दि. २५/०५/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९ / ०१ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८ / १२ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२३२/२०२५ — प्रोसेस नं.२०४०३/२०२५
चौ.ता. २७/०१/२०२६ — दिनांक : ११/१२/२०२५

**अर्जदार :** १. सुनिल संपतराव हुसे रा. शिव मंदिरजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. गजानन संपतराव हुसे रा. ठाकरे चक्की जवळ, पेंशन नगर, पोलीस लाइन टाकळी, काटोल रोड, नागपूर, ता. जि. नागपुर ३. सुनंदा हरिशचंद्र शेगोकार रा. ज्ञानदीप कॉन्व्हेंट जवळ, अवस्थी लेआउट, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ४. मंगला भास्कर लहाने रा. मलकापुर रोड, दुर्गा नगर, वार्ड नं. २, नांदुरा, ता. नांदुरा जि. बुलढाणा. ५. सुरेखा सुरेशभाई बेलसरे रा. ए ७०, शिव बंगलो, वाघोडिया रोड, खातमा बस स्टॅण्ड जवळ, वडोदरा, जि. वडोदरा गुजरात. ६. प्रतिभा शेषराव धनोकार रा. जिल्हा परिषद नगर, खडकी बु, अकोला. ता. जि. अकोला. ७. प्रिती रमेश बेलसरे रा. प्रेम पार्कजवळ, एन / सी-७, फ्लॅट नं. ००२, ममता हाउस सोसायटी अजमेरा कॉलनी, पुणे सिटी, पिंपरी, पी.एफ. पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संपतराव फकिरा हुसे
**पत्ता :-** रा. शिव मंदिरजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संपतराव फकिरा हुसे यांचे दि. १७/०६/१९८४ रोजी राहते घरी, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/१२ /२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१९३/२०२५ — प्रोसेस नं.१९८३१/२०२५
चौ.ता. १५/०१/२०२६ — दिनांक : ०४/१२/२०२५

**अर्जदार :** १. लिला शंकरराव बंबटकार २. सचिन शंकरराव बंबटकार ३. नितीन शंकरराव बंबटकार तिघेही रा. गणेश नगर, छोटी उमरी, उमरी प्रा, अकोला. ता. जि. अकोला. ४. स्मिता ज्ञानेश्वर नागपुरे रा. पुष्प गंधा रेसिडेन्सी, कोठारी वाटिका नं. ३, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शंकरराव जानराव बंबटकार
**पत्ता :-** रा. गणेश नगर, छोटी उमरी, उमरी प्रा, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शंकरराव जानराव बंबटकार यांचे दि. १९/०४/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/ १२/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004


**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# बापू-विनोबांच्या भूमीत नशेचा बाजार

**कारंजा/जनमाध्यम**

बापू आणि विनोबांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या वर्धा जिल्ह्यातील कारंजा शहर आज नशेच्या विळख्यात सापडल्याचे भयावह चित्र समोर येत आहे. अमली पदार्थांसोबतच अवैध दारूचा मोठा आणि संघटित व्यापार खुलेआम सुरू असून, कायदा सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे हा सारा प्रकार गृहराज्य मंत्र्यांच्या जिल्ह्यात घडत असताना, प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे.

कारंजा परिसरात गांजा, एमडीसारख्या अमली पदार्थांची सहज उपलब्धता, तसेच गावोगावी आणि शहरात अवैध दारूचे अड्डे बिनधास्त सुरू असल्याचे नागरिक उघडपणे सांगतात. रात्रीच्या अंधारातच नव्हे, तर दिवसा देखील नशेचा व्यापार फोफावलेला दिसतो. तरुण पिढी नशेच्या आहारी जात असताना, कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. गुन्हेगारी, चोरी, मारहाण, महिलांवरील अत्याचार अशा घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत.पोलीस प्रशासनाकडून अधूनमधून कारवाईचे नाटक केले जाते. एखादा हातभट्टीचा अड्डा उद्ध्वस्त, दोन-चार आरोपी अटक आणि पुन्हा काही दिवसांत परिस्थिती जैसे थे, मोठे मासे मात्र कायम सुरक्षित असल्याचा आरोप जनतेतून होत आहे. एवढा मोठा अवैध व्यापार माहितीशिवाय शक्यच नाही, मग प्रश्न उभा राहतो, पोलीस यंत्रणा अपयशी की हेतुपुरस्सर दुर्लक्ष नागरिकांचा रोष दिवसेंदिवस वाढत आहे. नशामुक्तीचे फलक लावले जातात, भाषणे दिली जातात; पण प्रत्यक्षात पुरवठा साखळीवर घाव घालण्याची हिंमत कुणी दाखवत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.



## कारंज्यात अंमली पदार्थांसह अवैध दारूचा उघड उच्छाद

### गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात कायद्याचा धाक कुठे गेला ?

या प्रकरणाचा तपास स्वतंत्र एसआयटीकडे देण्यात यावा, स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी आणि राजकीय हस्तक्षेपाशिवाय कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.बापू-विनोबांच्या भूमीत नशेचा उच्छाद ही केवळ लाजिरवाणी बाब नाही, तर सत्ताधाऱ्यांसाठी गंभीर इशारा आहे.

गृहराज्य मंत्र्यांच्या जिल्ह्यातच जर कायद्याचा धाक उरलेला नसेल, तर महाराष्ट्रात कायद्याची अवस्था काय, हा प्रश्न आता जनतेच्या मनात घर करून बसला आहे.

# मार्च २०२६ पर्यंत ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा द्या

## अन्यथा सिंदीकर रस्त्यावर उतरणार

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

१९४८ पासून 'क' वर्ग नगरपरिषद असलेले सिंदी (रेल्वे) शहर आजही केवळ प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून आहे, ही बाब प्रशासनाच्या अनास्थेचे ज्वलंत उदाहरण ठरत आहे. शहराची लोकसंख्या २५ हजारांच्या घरात असूनही, तसेच १० किलोमीटर परिसरातील ग्रामीण भागातील हजारो नागरिक याच केंद्रावर अवलंबून असतानाही गेली ३५ वर्षे ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा न मिळणे हे गंभीर असून, मार्च २०२६ पर्यंत दर्जा न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा थेट इशारा सर्वपक्षीय शिष्टमंडळाने दिला आहे.

नागपूर येथील विधिमंडळ अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर तसेच आमदार समीर कुणावर यांना निवेदन देत सिंदीकरांचा संताप व्यक्त करण्यात आला.

फक्त कागदी आश्वासनांवर आता समाधान मानणार नाही, असा स्पष्ट संदेश या निवेदनातून देण्यात आला आहे.

**२५० ते ३०० रुग्ण; मात्र उपचार अपुरे**

सिंदी (रेल्वे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज २५० ते ३०० रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र येथे सर्दी, खोकला, ताप यापलीकडे कोणत्याही मध्यम किंवा गंभीर आजारांवर उपचारांची सुविधा नाही. साधी शस्त्रक्रिया, अपघात किंवा आकस्मिक प्रसंगात रुग्णांना थेट ४० ते ५० किलोमीटर अंतरावरील वर्धा किंवा नागपूरकडे धाव घ्यावी लागते. अनेकदा रुग्ण उपचाराआधीच दगावल्याच्या घटना घडल्याचे वास्तव समोर आले आहे.

**प्रशासनाची उदासीनता जीवघेणी**

शहरात एकही सुसज्ज शासकीय रुग्णालय नसल्याने नागरिकांना खासगी रुग्णालयांच्या लुटीला सामोरे जावे लागत आहे. गरीब, शेतकरी, कामगार वर्गासाठी ही परिस्थिती अक्षरशः जीवघेणी ठरत आहे.

'उपचाराअभावी एकही नागरिक मरणार नाही, यासाठी ग्रामीण रुग्णालय हवेच,' अशी ठाम भूमिका सर्वपक्षीय नेतृत्वाने मांडली.



**सर्वपक्षीय एकजूट; आंदोलनाची तयारी**

या निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते अमोल सोनटक्के, ॲड. पंकज झाडे, रोशना पेटकर, भाजपा शहराध्यक्ष अजया साखळे, राष्ट्रवादी (शरद पवार गट) शहराध्यक्ष गंगाधर कलोडे, काँग्रेस शहराध्यक्ष प्रकाश डफ, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) शहराध्यक्ष सचिन लांबट, राष्ट्रवादी (अजित पवार गट) शहराध्यक्ष दिलीप बावणे, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) शहराध्यक्ष प्रशांत घंगारे आदी मान्यवर उपस्थित होते.

मार्च २०२६ ही अंतिम मुदत

ग्रामीण रुग्णालयाच्या घोषणेसाठी मार्च २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली असून, तोपर्यंत शासनाने ठोस निर्णय न घेतल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

सिंदीकरांच्या संयमाची परीक्षा घेऊ नका, अन्यथा प्रशासनालाच त्याची किंमत मोजावी लागेल, असा स्पष्ट इशाराच या सर्वपक्षीय एल्गारातून देण्यात आला आहे.

# कराटे प्रशिक्षण शाखेचा भव्य शुभारंभ

### कराटे विकसित करून भारतीय परंपरागत कला जोपासण्याची गरज - भन्ते ओमप्रकाश बौद्ध



**वर्धा/जनमाध्यम**

कराटे ही केवळ आत्मसंरक्षणाची कला नसून भारतीय संस्कृतीतून जगभर पोहोचलेली परंपरागत शारीरिक व मानसिक साधनेची शिस्त आहे. या कलेला आपल्या देशात अपेक्षित स्थान मिळावे, यासाठी कराटे खेळाचा विकास करून भारतीय कला जोपासण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन शोधार्थी दर्शनशास्त्र पीएच.डी. धारक भन्ते ओमप्रकाश बौद्ध यांनी केले.

ते समता नगर येथील रमाई बाल उद्यान, वर्धा येथे स्पोर्ट शोतोकान कराटे-डो असोसिएशन ऑफ इंडियाशी संलग्न स्पोर्ट कराटे असोसिएशन, वर्धा जिल्हा यांच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या कराटे प्रशिक्षण शाखेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.भन्ते ओमप्रकाश बौद्ध यांनी आपल्या भाषणात बोधिधर्मन यांच्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की, दक्षिण भारतातील पल्लव साम्राज्यातील कांचीपुरम येथे क्षत्रिय राजपुत्र म्हणून जन्मलेले बोधिधर्मन यांनी लहान वयातच राजवैभवाचा त्याग करून भिक्षू म्हणून जीवन स्वीकारले आणि कराटे या कलेचा प्रचार-प्रसार जगभर केला. आज अनेक देशांनी कराटे विकसित करून जागतिक पातळीवर नाव कमावले असताना, भारतात मात्र या मूळ भारतीय कलेला दुय्यम स्थान दिले जाते, ही खंत असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या स्मिता चव्हाण होत्या. विशेष अतिथी म्हणून स्पोर्ट शोतोकान कराटे-डो असोसिएशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिहान मंगेश भोंगाडे, तर प्रमुख अतिथी म्हणून सुरेश वैद्य, उमा इंगोले, ज्योती मेश्राम, रमाई बाल उद्यानचे अध्यक्ष वसंत बोधिले, रवींद्र कांबळे, विशाल शेंडे, धर्मशील कांबळे, यशवंत कांबळे, अरुण भोवते, अंकुश मुंजेवार, सर्वानंद साहा आदी मान्यवर उपस्थित होते.सर्व मान्यवरांच्या हस्ते बौद्ध धर्माचे संस्थापक भगवान गौतम बुद्ध व भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर फलकाचे अनावरण करून कराटे प्रशिक्षण शाखेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन स्पोर्ट शोतोकान कराटे-डो महाराष्ट्रचे ब्रांच ॲडव्हायझर सेन्साई चेतन जाधव यांनी केले. प्रस्तावना सेन्साई सिद्धार्थ गजभिये यांनी मांडली. संचालन रामनगर शाखाप्रमुख सेन्साई पूजा गोसटकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय पंच व खेळाडू सेन्साई वाणी साहू यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सेन्साई कार्तिक भगत, शुभम राखडे, पियूष हावलदार, आयुषी कुरटकर, भार्गव खेवले, देवांशु लाखे, पियुष सिंग, आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# ज्ञान आणि कौशल्यच जीवनातील समर्थपणे सामोरे जाण्याची ताकद देतात : मोहन अग्रवाल



**वर्धा/जनमाध्यम**

शालेय शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज असून, त्यातूनच शिस्त, आत्मविश्वास आणि जीवनोपयोगी कौशल्यांचा विकास होतो. शिक्षण ही केवळ गुणांची शर्यत नसून ज्ञान, कौशल्य, मूल्ये आणि सकारात्मक दृष्टीकोन घडविण्याची प्रक्रिया आहे. अशी प्रक्रिया विद्यार्थ्यांना जीवनातील प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्यास सक्षम बनवते, असे प्रतिपादन वर्ध्याचे ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लबचे अध्यक्ष निखिल रोकडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून युनिव्हर्सल मार्शल आर्ट अकादमीचे राष्ट्रीय सल्लागार इमरान राही, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, माजी लायन्स अध्यक्ष विजय सत्यम, समाजसेवक राजू लभाणे, युनिव्हर्सल मार्शल आर्ट अकादमीचे संस्थापक अध्यक्ष कोषी उल्हास वाघ, तायकांडो स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष अमोल मानकर व सचिव साहिल वाघ आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.नुकतेच नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय तायकांडो स्पर्धेत उत्कृष्ट यश मिळविणाऱ्या सानवी सागर कवडे, स्वर्श संग्राम मोहिते, समर्थ बजरंग लाजुरकर, प्रेम दिलीप कंवर, दिशांत नितीन यादव, रेयाश गावंडे, आर्या पाटील आणि आर्यण छापेकर या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.यावेळी इमरान राही, मुरलीधर बेलखोडे व निखिल रोकडे यांनीही मनोगत व्यक्त करत खेळाडूंनी शिक्षणासोबत खेळातही सातत्य ठेवावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना कोषी उल्हास वाघ यांनी केली. अमोल मानकर यांनी सूत्रसंचालन केले, तर साहिल वाघ यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विक्रांत गव्हाणे, मिहीर वाघ, वेदांत चौधरी, लीलाताई वाघ, धनश्री मेंद्र, नितीन यादव, रितेश गावंडे, शीतल लाजुरकर, रेखा वाघ आदींनी परिश्रम घेतले.

# संक्षिप्त




## शेतात जात असलेल्या वृद्धाला चिरडले

**आर्वी-** शेतात साकोरीचे काम करण्यासाठी रात्री पायदळ निघालेल्या वृद्धाला भरधाव बोलेरोने जोरदार धडक दिल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आर्वी-पुलगाव मार्गावरील सावंगी पोळ शिवारात घडली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.शंकर चवरे (६५) रा. ओकनाथ, जि. अमरावती, ह.मु. वर्धमनेरी असे मृत वृद्धाचे नाव आहे. ते आर्वी येथील शेतकरी सुनील लोखंडे यांच्या शेतात साकोरीचे काम करीत होते. नेहमीप्रमाणे ते रात्रीच्या सुमारास पायी शेताकडे जात असताना, भरधाव वेगाने आलेल्या बोलेरोने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की चवरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.या घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. सुभाष बढिये यांच्या तक्रारीवरून बोलेरो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातानंतर वाहनचालक पळून गेल्याची माहिती असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**आर्वी -** भरधाव अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आर्वी-वाढोणा मार्गावर घडली. या अपघातामुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.नरेंद्र मांडवकर (४७) रा. वाढोणा असे मृतकाचे नाव आहे. ते आर्वी येथून वाढोणा येथे एम.एच. ३२ ए.जी. ५२९५ क्रमांकाच्या दुचाकीने जात होते. दरम्यान, अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत नरेंद्र मांडवकर गंभीर जखमी झाले असून त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित वाहन घटनास्थळावरून पसार झाले. तक्रारीवरून आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल करून अज्ञात वाहनाचा शोध सुरू केला आहे.

## कोटेश्वर घाटात वाळूमाफियांवर घाला

**देवळी -** अवैध वाळू वाहतुकीविरोधात देवळी पोलिसांनी धडक कारवाई करत तीन ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळूसाठा असा तब्बल २७ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई कोटेश्वर घाटाच्या पांदण रस्त्यावर करण्यात आली. देवळी पोलिस गस्तीवर असताना कोटेश्वर मंदिर शिवारातील घाटातून वाळू भरलेले ट्रॅक्टर रोहणी गावाकडे जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कोटेश्वर मंदिर संस्थानच्या शेताजवळ सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच ट्रॅक्टरचालकांनी घटनास्थळावरून पळ काढला.पोलिसांनी घटनास्थळी तीन ट्रॅक्टर, ट्रॉली व मोठ्या प्रमाणात वाळूसाठा जप्त केला. या प्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार चालकांचा शोध सुरू आहे.

# श्रीमद्भगवद्गीता श्लोक पठण स्पर्धेत आनंदी जोशी प्रथम

**वर्धा/जनमाध्यम**

स्थानिक स्वागत कॉलनी येथील आनंदी सचिन जोशी हिने श्रीमद्भगवद्गीता श्लोक पठण स्पर्धेत शाळेतून प्रथम क्रमांक पटकावून वर्धा शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. ती सांदीपनि शाळेतील इयत्ता चौथीची विद्यार्थिनी आहे. लहान वयात धार्मिक ग्रंथांचे शुद्ध उच्चारांसह पठण करून तिने आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवली आहे.

स्थानिक गीताभ्यासी मंडळाच्या वतीने न्यू इंग्लिश शाळा येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. श्लोकांचे अचूक उच्चार, स्पष्टता आणि भावपूर्ण सादरीकरण या निकषांवर परीक्षकांनी मूल्यमापन केले.या स्पर्धेत आनंदी जोशी हिने उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या यशाबद्दल शाळा, शिक्षक, पालक तसेच परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या यशानिमित्त तिचा सत्कार करण्यात आला असून सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.आपल्या यशाचे श्रेय आनंदीने आई-वडील तसेच आजी-आजोबा यांना दिले आहे. घरातून मिळालेले संस्कार, नियमित सराव आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाल्याचे तिने सांगितले. भविष्यात अशाच प्रकारे अभ्यासासोबत सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमात सहभाग घेण्याची इच्छा तिने व्यक्त केली आहे.लहान वयातच मिळवलेल्या या यशामुळे आनंदी जोशी ही इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे.



# कारंजा चौकात सट्ट्याचा अड्डा उद्ध्वस्त


**हिंगणघाट -** शहरातील कारंजा चौकात सुरू असलेल्या सट्टापट्टीवर स्थानिक पोलिसांनी छापा टाकत दोघा सट्टाव्यावसायिकांवर कारवाई केली. यावेळी पेन, कागद, रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संजय काटकर (५२) रा. नेताजी वार्ड आणि अतुल उताने (३८) रा. नांदगाव हे कारंजा चौकात सट्टापट्टीचे आकडे घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी अचानक छापा टाकला असता दोघेही सट्ट्याचे आकडे लिहिताना रंगेहात आढळून आले. पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. शहरात सट्टापट्टीसारख्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.



# मनरेगाच्या नावाखाली सरकारी पैशांचा चावा

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या नावाखाली सुरू असलेल्या शासकीय निधी लुटीने वर्धा जिल्हा हादरून गेला असतानाच, आर्वी पंचायत समितीतील ७० लाखांहून अधिकच्या अपहार प्रकरणात आणखी एक धक्कादायक स्फोट झाला आहे. कोणतेही व्हाऊचर नसताना तब्बल १० सिंचन विहिरींचा निधी थेट गिळंकृत केल्याचा गंभीर प्रकार आर्वी तालुक्यातील पिपरी ग्रामपंचायत येथे घडल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून स्पष्ट झाले आहे. मनरेगासारख्या गरीबांच्या हक्काच्या योजनेवर डल्ला मारत सरकारी पैशांची खुलेआम लूट झाल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## विना व्हाऊचर १० सिंचन विहिरींचा निधी गिळंकृत; पिपरीत लूट उघड

### ७० लाखांच्या अपहार प्रकरणात नवा स्फोट, तपासाचा फास आवळणार

मनरेगा अंतर्गत सिंचन विहिरींच्या कामांमुळे शेतकऱ्यांना पाणी मिळावे, शेती बहरावी आणि ग्रामीण रोजगार वाढावा, हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. मात्र पिपरी ग्रामपंचायतमध्ये या उद्देशालाच हरताळ फासण्यात आला. सिंचन विहिरींच्या कामांचे अधिकृत व्हाऊचर अस्तित्वात नसतानाही, संबंधितांनी प्रत्येकी १५ हजार रुपये या प्रमाणे १० विहिरींचा निधी लाभार्थ्यांना न देता, तो निधी स्वतःच्या बँक खात्यात वळवून घेतल्याचे सखोल चौकशीत उघड झाले आहे. हा प्रकार म्हणजे थेट शासकीय तिजोरीवर टाकलेला दरोडाच असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.या प्रकरणामुळे आधीच चर्चेत असलेला ७० लाखांहून अधिकचा अपहार आणखी गंभीर बनला आहे. पिपरीतील हा गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतर आर्वी पोलिसांना तपासाचा मोर्चा नव्याने या गावाकडे वळवावा लागणार असून, बँक व्यवहार, लाभार्थ्यांचे जबाब आणि ग्रामपंचायतीच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यात येणार आहे. तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतशी आणखी मोठी नावे समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मनरेगासारख्या महत्वाकांक्षी योजनेत इतक्या मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असताना प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक पातळीवरील संगनमताशिवाय असा अपहार शक्यच नसल्याची चर्चा जोर धरत आहे. गरीब मजुरांचा रोजगार आणि शेतकऱ्यांच्या हक्काचा निधी लुटला जात असताना, जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई कधी होणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**जामिनासाठी न्यायालयात धाव, पण दिलासा नाही**

मनरेगा योजनेतील ७० लाखांहून अधिकच्या शासकीय निधी अपहार प्रकरणी आर्वी पोलिस ठाण्यात प्रणाली कसर व इतर आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २१

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# एस. बी. खोबरागडे यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप नॅशनल अवॉर्ड २०२५' प्रदान



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती येथील माजी शिक्षणाधिकारी एस. बी. खोबरागडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप नॅशनल अवॉर्ड २०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा मानाचा पुरस्कार भारतीय दलित साहित्य अकादमी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ४१ व्या राष्ट्रीय दलित साहित्यकार संमेलनात प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, मेडल,सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

दिनांक १२ व १३ डिसेंबर २०२५ रोजी दिल्ली येथील मॉडेल टाउन-१ येथे हा भव्य कार्यक्रम पार पडला. अकादमीच्या सिल्वर जुबली वर्षानिमित्त (१९८४–२००९) आयोजित या संमेलनास देशभरातील विविध राज्यांमधून, शहरे, गावे व खेड्यांतून आलेले सुमारे एक हजारांहून अधिक स्त्री-पुरुष साहित्यिक उपस्थित होते.

या दोन दिवसीय राष्ट्रीय संमेलनात सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सलग पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत भगवान बुद्ध, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, बाबू जगजीवनराम आदी महामानवांच्या नावाने देण्यात येणारे राष्ट्रीय पुरस्कार या ऐतिहासिक कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

या प्रसंगी अमरावती (महाराष्ट्र) येथील माजी शिक्षणाधिकारी एस. बी. खोबरागडे यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व साक्षरता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप नॅशनल अवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात आला. समाजाला नवी दिशा देणे, वंचित व दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण व सामाजिक जागृती पोहोचवणे, हाच या पुरस्काराचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. एस. पी. सुमनाक्षर यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. या राष्ट्रीय स्तरावरील सन्मानासाठी मधुकर कांबळे – बावलकर यांचे विशेष योगदान लाभले. या दोन दिवसीय राष्ट्रीय संमेलनाचा समारोप शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या सन्मानामुळे अमरावतीसह महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राला राष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त झाला आहे.

# श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालयाचे तन्मय चव्हाण व ओम पवार राज्यस्तरावर

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री, ह. व्या. प्र. मंडळ द्वारा संचालित श्रीरामकृष्ण क्रीडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर दमदार कामगिरी करून राज्यस्तरावर यश गाठले आहे. दि.२३ नोव्हेंबर २०२५ रोजी तखतमल हायस्कूल येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत या दोन्ही खेळाडूंनी उत्तुंग यश मिळवले.

वर्ग अकरावीमध्ये शिक्षण घेणारा तन्मय चव्हाण याने १७ वर्षे वयोगटाखालील ८३ किलो वजन गटामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. त्याचप्रमाणे



वर्ग बारावीचा विद्यार्थी ओम पवार याने ९३ किलो वजन गटातील स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्पर्धेसाठी प्रवेश मिळवला.

या यशाबद्दल संस्थेचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव डॉ.माधुरीताई चेंडके, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, प्राचार्य वाडेगावकर , उपप्राचार्य आडे, पर्यवेक्षक श्री खोब्रागडे ,तसेच शाळेचे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजयी खेळाडूंचे व क्रीडा शिक्षक संजय मालवीय यांचे अभिनंदन केले तसेच विजयी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण असून दोन्ही विद्यार्थ्यांचे शिक्षक, प्रशिक्षक व पालकांकडून अभिनंदन होत आहे.

## नगर पंचायत कार्यालय, भातकुली, जि.अमरावती

जावक क्र. ९८१ दिनांक १५.१२.२०२५

**जनहीत याचिका क्र.७१/२०१३ नुसार समिती आदेशाबाबत जाहीर सुचना**

मा.उच्च न्यायालय, मुंबई मध्ये दाखल PIL 71 of 2013 या जनहीत याचिकेमधील Interim Application (Lodging) No.29119 of 2025 मध्ये दिनांक १३.१०.२०२५ अन्वये दिलेल्या आदेशानुसार नगर पंचायत क्षेत्रात रस्त्यावरील खड्यांमुळे अपघात होऊन कोणी जखमी झाले असल्यास अथवा मृत्यू पावल्यास त्याबाबत चौकशी करणे व नुकसान भरपाई देणेची कार्यवाही करणेसाठी मुख्याधिकारी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती (District Legal Service Authority) यांचे सचिव यांची समिती स्थापन करणे बाबत नमुद केलेले आहे. खालील प्रमाणे नमुद अधिकारी भातकुली नगर पंचायत, भातकुली करीता तयार करण्यात आलेल्या समितीचे सदस्य असतील.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | धारण केलेले पद |
|---|---|---|
| १. | मुख्याधिकारी, नगर पंचायत, भातकुली | अध्यक्ष |
| २. | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती | सचिव |
| ३. | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन भातकुली | सदस्य |
| ४. | नगर अभियंता, नगर पंचायत, भातकुली | सदस्य |
| ५. | रचना सहायक, नगर परिषद, भातकुली | सदस्य |

उपरोक्त प्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीचे कार्यकक्षा मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहीत याचिका क्र.७१/२०१३ व अवमान याचिका क्र.६/२०१९ च्या निर्देशाप्रमाणे राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी,**
**भातकुली नगर पंचायत**

# कल्याणी सोनोने एमए परीक्षेत दहावी मेरिट

**नेरपरसोपंत/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ या परीक्षेत येथील राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालयाची कल्याणी अशोक सोनोने ही विद्यार्थिनी एम. ए. समाजशास्त्र या विषयात विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत गुणानुक्रमे १० वी (मेरिट) आली. विद्यापीठाच्यावतीने नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या एका परिपत्रकाद्वारे ही माहिती देण्यात आली आहे.

यापूर्वीही विद्यापीठाच्या उन्हाळी २०२४ च्या परीक्षेत राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालयाच्या चार विद्यार्थिनी प्रियंका गजभिये (प्रथम मेरिट), पूनम शिंदे (आठवा मेरिट) आणि दीपाली सोनटक्के व मोनिका परळकर (दहावा मेरिट) यांनी एम. ए. समाजशास्त्र या विषयात विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले होते. तीच परंपरा यावर्षी झालेल्या उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत कल्याणी सोनोने हिनेही कायम राखली. कल्याणी सोनोने हिने प्राप्त केलेल्या या यशाबद्दल जीवन विकास शिक्षण सेवा मंडळाच्या अध्यक्ष शुभांगी गावंडे, संस्थापक सचिव सुधाकरराव तलवारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर आणि समाजशास्त्र विभागातील प्रा. येवतीकर, प्रा. के. टी. बन्सोड, प्रा. मोनिका परळकर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८४८/२०२५
**श्रीमती निलिमा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२१.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Nilima Naresh Mantri, Age 71 Yrs. Occu.: Household
2. Shri Nikhil Naresh Mantri, Age 49 Yrs. Occu.: Business
   Both R/o Ramdhan Niwas, Khaparde Bagicha, Amravati.
3. Sau.Nikita Manoj Hurkat, Age 49 Yrs. Occu.: Doctor
   R/o Behind SBI, Gandhi Ward, Hinganghat, Tq.Hinganghat, Dist.Wardha

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नरेश रामदयालजी मंत्री** हे दिनांक 24.10.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निलिमा + 02 विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निलिमा + 02 विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२८१५/२०२५
जाहीरनामा/सायटेशन **श्रीमती सोनिया -वि- गैरअर्जदार प्रतिभा अधिक तीन**
पुढील ता.१५.०१.२०२६

**अर्जदार :** १. सोनिया सुभाष भारसाकळे, वय ४८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.द्वारा-सुभाष भारसाकळे, रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** १. प्रतिभा सुभाषराव भारसाकळे, वय ६८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. सुदीप सुभाषराव भारसाकळे, वय २९ वर्षे, व्यवसाय - व्यापार
३. धनश्री सुभाषराव भारसाकळे, वय २७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रील सर्व गैरअर्जदार नं.१ ते ३ रा.रुक्मिणी नगर, अमरावती,

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुभाष देविदास भारसाकळे** यांचे दिनांक **०२.०४.२०१४** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सोनिया विरुध्द गैरअर्जदार प्रतिभा अधिक तीन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सोनिया विरुध्द गैरअर्जदार प्रतिभा अधिक तीन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ६८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

<u>प्रो.क्र.११०३/२०२४</u>

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**मा.विजय जी. परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

**आर.एम.जे.सी.क्रमांक ४३५ /२०२४** **ने.ता.२३.०१.२०२६**

**अर्जदार :**
1) **Anandilal Radhakrushna Rathi,** Age 73 yrs., Occu.- Agriculturist
   R/o. Ward No.3, Wathoda Shukleshwar, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
2) **Sharad Radhakisan Rathi,** Age 70 yrs., Occu.- Agriculturist
   R/o. Ward No.3, Wathoda Shukleshwar, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
3) **Ramankumar Radhakisan Rathi,** Age 68 yrs., Occu.- Agriculturist
   R/o. Ward No.3, Wathoda Shukleshwar, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
4) **Shyama Vijaykumarji Rathi,** Age 72 yrs., Occu.- Household
   R/o. Near Radhakrishna Temple, Wathoda Shukleshwar,
   Tq. Bhatkuli, Dist. Amravati
5) **Bharat Vijaykumarji Rathi,** Age 51 yrs., Occu.- Agriculturist
   R/o. Near Radhakrishna Temple, Wathoda Shukleshwar,
   Tq. Bhatkuli, Dist. Amravati
6) **Geeta Rampal Rathi,** Age 80 yrs., Occu.- Household
   R/o. Ward No.4 , Wathoda Shukleshwar, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
7) **Pramod Rampalji Rathi,** Age 52 yrs., Occu.- Agriculturist
   R/o. Ward No.3 , Wathoda Shukleshwar, Tq. Bhatkuli, Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदारः** **... Nil ...**

ज्यापेक्षा **Radhakisan Hariram Rathi हे दि.१६.०८.१९७९ रोजी मयत झाले**. **अर्जदार Anandilal Radhakrushna Rathi, Age 73 yrs. Occu- Agriculturist , R/o. Ward No. 3, Wathoda Shukleshwar, Tq. Bhatkuli, Dist. Amravati** यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.०६.१२.२०२५ रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Radhakisan Hariram Rathi** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Radhakisan Hariram Rathi** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **१०.१२.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर)
भातकुली,दि.१०.१२.२०२५

## जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जाचा नमुना

दि.०६/१०/२०२५

**प्रति,**
**निबंधक जन्म/मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत - नानोरी**
**ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

**विषय : - जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव :- रामेश्वर चंपतराव पाटील**
**राहणार :- नानोरी, ता.चांदूर बाजार**
**मो.- ९०२१९२६८९५९**

**मा.महोदय,**

वरील विषयान्वये सविनय अर्ज सादर करतो की माझी बहिण नामे नाव **बेबी चंपतराव पाटील** यांचा जन्म ग्रामपंचायत **नानोरी** कार्यक्षेत्रातील **नानोरी** या गावी दिनांक **१६/०८/१९५७** रोजी झालेला आहे.

सदरील जन्म/मृत्यू घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही.सदरील जन्म/मृत्यू विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला **जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची** आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सदर जोडलेले आहे. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चूकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशिर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करिता मला जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

**अर्जदाराची स्वाक्षरी/ अंगठयाचा ठसा** --------------------

## GOVERNMENT OF MAHARASHTRA
## AMRAVATI ELECTRICAL DIVISION,
## PUBLIC WORKS DEPARTMENT, AMRAVATI
## TENDER NOTICE NO.79 FOR 2025-2026

Online tenders in B-1 form are invited by Executive Engineer, Amravati (Electrical) Division, Public Works Division, Amravati on behalf of Governor of Maharashtra from qualified bidders for the following works under Manually Submittion Tender procedure.

| Sr. No. | Name of Work | Amount Put to Tender | EMD | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | **Estimate No.**1445/EE/AMT/2024-25 Providing Replacement of LED Street Lights in the Premises of Industrial Training Institute Building Premises at AMRAVATI. | 474083.00 | 4800.00 | -- |
| 2. | **Estimate No. 98/ee/amt/2025-26** Providing Additional E.I.& Air Conditioner to Meeting Hall & Water Cooler at the First Floor of the Niyojan Bhavan at AMRAVATI. | 533228.00 | 5400.00 | -- |
| 3. | **Estimate No.**172/EE/AMT/2025-26 Providing Renovation to E.I. of Toilet block (Grounbd + Second floor) LED Street Lights & 3 Nos. Water Cooler at Commissioner office building, AMRVATI. | 490910.00 | 5000.00 | -- |
| 4. | **Estimate No.**280/EE/AMT/2025-26 Providing Replacement of LED Street lights on the Pole in the Premises of Commissioner Colony Camp, AMRAVATI. | 630185.00 | 6400.00 | -- |
| 5. | **Estimate No.** 318/EE/AMT/2025-26 Providing Electrical Renovation to Conference Hall & LT Cable for main lighting panel at Super Speciality Hospital, Phase-1, AMRAVATI. | 614260.00 | 6200.00 | -- |
| 6. | **Estimate No.**466/EE/AMT/2025-26 Providing Electrical Renovation to Suit No.1 & 2 Annex Building, Circuit House, AMRAVATI. | 590357.00 | 6000.00 | -- |
| 7. | **Estimate No.**467/EE/AMT/2025-26 Providing Electrical Renovation to Suit No.4, Office, Store, Passage & Supply Arrangement at Annex Building, Circuit House, AMRAVATI. | 598718.00 | 6000.00 | -- |
| 8. | **Estimate No.**468/EE/AMT/2025-26 Providing Electrical Installation to Kitchen & Dining at Annex Building, Circuit House, AMRAVATI. | 555192.00 | 5600.00 | -- |
| 9. | **Estimate No.**469/EE/AMT/2025-26 Providing Electrical Renovation to Suit No.6 & 7 Annex Building, Circuit House, AMRAVATI. | 594332.00 | 6000.00 | -- |
| 10. | **Estimate No.**478/EE/AMT/2025-26 Providing Additional Electrical Installation of Extension of P.G.T.D.of Chemical Tech. Building at Sant Gadge Baba Amravati University,AMRAVATI. | 605373.00 | 6100.00 | -- |
| 11. | **Estimate No.**586/EE/AMT/2025-26 Providing Electrical Installation to Kaladalan & Yogbhavan in Ambapeth area in A.M.C.Area, AMRAVATI. | 543285.00 | 5500.00 | -- |
| 12. | **Estimate No.**587/EE/AMT/2025-26 Providing Stand by Cable Arrangement at Superspeciality Hospital, Phase-1, at AMRAVATI. | 612288.00 | 6200.00 | -- |
| 13. | **Estimate No.**588/EE/AMT/2025-26 Providing Electrical Installation to Adaptive Manufacturing and CNC Lab. & Supply Arrangement at Government Technical High School Premises, AMRAVATI. | 522662.00 | 5300.00 | -- |
| 14. | **Estimate No.**641/EE/AMT/2025-26 Providing Additional E.I.at Various Wards at Newly Shifted Bedded District Wormens Hospital, AMRAVATI. | 629340.00 | 6300.00 | -- |
| 15. | **Estimate No.**651/EE/AMT/2025-26 Providing Additional LED Lights, LAN Points & Air Conditioners at Newly Shifted Bedded District Wormens Hospital, AMRAVATI. | 614589.00 | 6200.00 | -- |
| 16. | **Estimate No.**655/EE/AMT/2025-26 Providing Renovation to E.I. to Part Portion of the Collector Bunglow, AMRAVATI. | 422653.00 | 4300.00 | -- |
| 17. | **Estimate No.**686/EE/AMT/2025-26 Providing Electrical Renovation to Prarthana Hall at District Central Jail, AMRAVATI. | 319224.00 | 3200.00 | -- |
| 18. | **Estimate No.**775/EE/AMT/2025-26 Providing & Erecting LED Bollard Lights & LED Lantern fixtures at Dist.Collectors Bunglow, AMRAVATI. | 819158.00 | 8200.00 | -- |
| 19. | **Estimate No.**792/EE/AMT/2025-26 Providing Annual Maintenance Contract (AMC) for 5 x 125 KVA and 3 x 250 KVA D.G.Set at Various Hospitals in the City Section, AMRAVATI. | 325316.00 | 3300.00 | -- |
| 20. | **Estimate No.**823/EE/AMT/2025-26 Providing E.I.to Changing Room for Boys and Girls above Water Tank in front of the Basketball Grounnd & Archery Ground at the Divisional Sports Complex, AMRAVATI. | 627271.00 | 6300.00 | -- |
| 21. | **Estimate No.**853/EE/AMT/2025-26 Providing Fire Fighting System at the District Treasury Office,AMRAVATI | 590114.00 | 6000.00 | -- |
| 22. | **Estimate No.**854/EE/AMT/2025-26 Providing Electrical Renovation to the Ground Floor at the District Treasury Office, AMRAVATI. | 818022.00 | 8200.00 | -- |
| 23. | **Estimate No.**865/EE/AMT/2025-26 Shifting of L.T.Overhead Line to UG Cable due to Construction of Administrative Building of District Central Jail, AMRAVATI. | 517003.00 | 5200.00 | -- |
| 24. | **Estimate No.**908/EE/AMT/2025-26 Providing Supplying and installationof air conditioning to SPANDAN Building at Govt.Engineering College, AMRAVATI. | 584670.00 | 5900.00 | -- |
| 25. | **Estimate No.**910/EE/AMT/2025-26 Providing Electrical Installation to Rojgar Hami Yojna Shakha, Collector Office, AMRAVATI. | 426014.00 | 4300.00 | -- |
| 26. | **Estimate No.**967/EE/AMT/2025-26 Providing Street Light on PEB Shed to Spandan Building Govt.Engineering College at AMRAVATI. | 333705.00 | 3400.00 | -- |
| 27. | **Estimate No.**1002/EE/AMT/2025-26 Providing E.I.to Paricharya Prashikshan Mahavidyalay Hospital at District General Hospital, AMRAVATI. | 630131.00 | 6400.00 | -- |
| 28. | **Estimate No.**1150/EE/AMT/2025-26 Providing Renovation to internal Electrical Installation to Agreeculture Lab Building at AMRAVATI. | 336097.00 | 3400.00 | -- |
| 29. | **Estimate No.**1155/EE/AMT/2025-26 Providing CCTV Camera System to P.W.Electrical Division & Sub-Division Building, AMRAVATI. | 445093.00 | 4500.00 | -- |
| 30. | **Estimate No.**1189/EE/AMT/2025-26 Providing & Erecting Solar Highmast Pole 5 Mtr. with LED Light Fitting at Open Spaces at Sant Gadge Baba P.D.M.C.Prabhag No.2, AMRAVATI. | 366722.00 | 3700.00 | -- |
| 31. | **Estimate No.**1190/EE/AMT/2025-26 Providing & Erecting Solar Highmast Pole 6 Mtr. with LED Light Fitting at Open Space at Sant Gadge Baba P.D.M.C.Prabhag No.2, AMRAVATI. | 366722.00 | 3700.00 | -- |
| 32. | **Estimate No.**1191/EE/AMT/2025-26 Providing and Installation of Street Light at Prabhag No.3, Navsari-Kathora Naka, AMRAVATI. | 437346.00 | 4400.00 | -- |
| 33. | **Estimate No.**1259/EE/AMT/2025-26 Providing DC Cable Connection & Lugs to UPS Battery Setup to at New District Women Hospital, AMRAVATI. | 614152.00 | 6200.00 | -- |
| 34. | **Estimate No.**1260/EE/AMT/2025-26 Providing Fencing to the New Substation Yard at 200 Bedded District Women Hospital, AMRAVATI. | 629755.00 | 6300.00 | -- |
| 35. | **Estimate No.**1261/EE/AMT/2025-26 Providing RCBO Protection System to each Board in the SNCU Ward, 3rd Floor, at the New 200 Bedded District Women Hospital, AMRAVATI. | 608940.00 | 6100.00 | -- |
| 36. | **Estimate No.**1162/EE/AMT/2025-26 Providing LED Street Light & Floor Lights in the Premises of District General Hospital at AMRAVATI. | 630020.00 | 6400.00 | -- |
| 37. | **Estimate No.**1316/EE/AMT/2025-26 Providing Supply Arrangement to the existing 200 KVA Transformer for PSA Plant at Super Speciality Hospital at AMRAVATI. | 525753.00 | 5300.00 | -- |

Tender form, conditions of contract, specifications and contract drawings can be bidder must purchase the bidding documents via online mode from www.mahapwd.gov.in by clicking on "Pay PWD Online" after entering the details, payment of Rs.590/- (Including GST) (Rupees Five Hundred Ninety Only) should be paid online using payment gateway. The fees of tender document will be non refundable. Further information regarding the work can be obtained from the above office.

| | | |
|---|---|---|
| Cost of Tender Form | : | Rs.590/- Including GST |
| Last Date & Place of Issue of Tender Form | : | From 16.12.2025 Time 10.00 Hours to 23.12.2025 Time 18.55 Hours |
| Receipt of EMD fees, to be paid FDR/B.G.only | : | Earnest Money in the form of Term Deposit Receipt for a period of one year issued by a scheduled bank duly endorsed in the name of the **Executive Engineer, P.W.Electrical Division, Amravati** to be submitted in Envelop No.1 |
| Receipt of online Tender Document fees, to be paid online only via. Payment Gateway mode only. | : | Document Tender Fee to be paid via online mode only. |
| Last Date & Place of Manually submission of Technical and Financial Tender. | : | Office of the Executive Engineer, P.W.(Electrical) Division, Amravati. Date 26.12.2025 time 14.00 Hours. |
| Registration class of Contractor | : | Contractor Registered in Appropriate Class |

Lr.No./Ex.En./(Ele.)/Amt./T.C.2938/2025
Office of the Executive Engineer (Electrical) Division, Amravati
P.W.(Electrical) Division, P.W.D.Compound, Camp, Amravati.
Email:elamaravati.ee@mahapwd.gov.in
Date : 12.12.2025

**Executive Engineer,**
**Amravati Electrical Division,**
**Public Works Division,**
**AMRAVATI**

**(ROC/C4606)**

## कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार नांदगाव खंडेश्वर यांचे कार्यालय ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

रामाक्र./एम.आर.सी./जन्म-मृत्यू/०३/२०२५ दिनांक १५.१२.२०२४

## जाहीरनामा

**अर्जदार -** **नंदू लहानुजी शिंदे**
रा.तिघारा, ता.नांदगाव खंडेश्वर

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** **निबंधक, ग्रामपंचायत वाढोणा रामनाथ**
ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्यावर कायम रहिवासी आहे. अर्जदार यांचे वडिल नामे लहानुजी गोविंद शिंदे यांचा मृत्यू दि. ०९/०७/२०२४ रोजी त्यांच्या राहत्या घरी तिघारा, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती येथे झाला. निबंधक जन्म-मृत्यू ग्रामपंचायत वाढोणा रामनाथ ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती येथे मृत्यूची नोंद घेतलेली नाही. अर्जदाराला उपरोक्त मृत्यू प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म -मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३(३) अन्वये मृत्यूच्या नोंदीचा आदेश होणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार नांदगाव खंडेश्वर येथील दाखल अर्जातील अर्जदार- नंदु लहानुजी शिंदे, तिघारा, ता.नांदगाव खंडेश्वर यांचे वडिल नामे मयत लहानुजी गोविंद शिंदे यांच्या मृत्यूच्या दिनांकास व ठिकाणास आक्षेप किंवा हरकत असल्यास दि.३१/१२/२०२५ पर्यत स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत येवुन आक्षेप किंवा हरकत, न घेतल्यास सदरहू अर्जदार यांची साक्ष घेवून मृत्यू नोंद घेण्याचा आदेश सदर निबंधकाला देण्यात येईल.

आज दि.१५.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

**कार्यकारी दंडाधिकारी,**
**तथा तहसीलदार नांदगाव खंडेश्वर**

# जाहीर नोटीस

विद्यमान प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब चांदूर बाजार यांचे न्यायालय
मि.अ.क्र./
ने.ता. / /२०२२

१. उमेश शामलाल आके
वय ३८ वर्षे, धंदा – मजुरी
रा. देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती

-- विरुद्ध --

गैरअर्जदार-निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम पंचायत कार्यालय, देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती

वरील अर्जदाराने विद्यमान न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदाराला देण्याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे.

अर्जदार नामे उमेश शामलाल आके ह्याचा दिनांक १६.१२.१९८६ रोजी राहत्या घरी देऊरवाडा येथे जन्म झालेला आहे. करीता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याचे आत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप, प्रकरणात आक्षेप असल्यास नोंदवावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दि.
आदेशानुसार,

**सहाय्यक अधीक्षक,**
**प्रथम श्रेणी न्यायाधीश,**
**चांदूर बाजार**

## संक्षिप्त

### कल्याणी सोनोने एम.ए.च्या परीक्षेत मेरिट



**नेरपरसोपंत**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ या परीक्षेत येथील राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालयाची कल्याणी अशोक सोनोने ही विद्यार्थिनी एम. ए. समाजशास्त्र या विषयात विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत गुणानुक्रमे १० वी (मेरिट) आली. यापूर्वीही विद्यापीठाच्या उन्हाळी २०२४ च्या परीक्षेत राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालयाच्या चार विद्यार्थिनी प्रियंका गजभिये (प्रथम मेरिट), पूनम शिंदे (आठवा मेरिट) आणि दीपाली सोनटक्के व मोनिका परळकर (दहावा मेरिट) यांनी एम. ए. समाजशास्त्र या विषयात विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले होते. तीच परंपरा यावर्षी झालेल्या उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत कल्याणी सोनोने हिनेही कायम राखली.यशाबद्दल जीवन विकास शिक्षण सेवा मंडळाच्या अध्यक्ष शुभांगी गावंडे, संस्थापक सचिव सुधाकरराव तलवारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर आणि समाजशास्त्र विभागातील प्रा. येवतीकर, प्रा. के. टी. बन्सोड, प्रा. मोनिका परळकर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

### महाश्रमदानातून वनराई बंधारा

**परतवाडा**-मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत अचलपूर तालुक्यातील ग्रामपंचायत सावळापूर येथे 'आठवड्यातील एक दिवस गावाकरिता' अभियानात शनिवारी नागरिकांनी सहभाग घेऊन गावालगतच्या पूर्णा नदीपात्रात सिमेंटच्या रिकाम्या पोत्यांचा वापर करीत बनराई बंधारा घातला. रेती व मातीने पोती भरून नदीच्या मध्यभागी यासाठी टाकण्यात आली. जलस्त्रोतांना पूरक आधार, भूजल स्तरात वाढ, रब्बी हंगामातील पाण्याची उपलब्धता तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस थेट हातभार लावण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. जनावरांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होणार आहे. अभियानाला सरपंच, उपसरपंच,सावळापूर येथे वनराई बंधारा उभारतांना स्थानिक गावकरी मंडळी. ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, जिल्हा परिषद मराठी, उर्दू शाळेचे शिक्षक, मुख्याध्यापक, तंटामुक्ती अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते, पोलिस पाटील, महसूल सेवक, सीआरपी, बचत गटांतील महिला, आशा सेविका,अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग, गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला, पुरुष युवा वर्ग, सार्वजनिक मंडळ कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन श्रमदान केले.

### मंगळवारी मका पिका संदर्भात बैठक

**अमरावती**-मेळघाट व अचलपूर परिसरातील मका पिक घेणारे आदिवासी शेतकरी व अन्य समाजबांधव यांच्या मुलांच्या प्रश्न सोडविण्याच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी तसेच संबधित विषयाशी निगडित इतर अधिकाऱ्यांची बैठक १५ डिसेंबर रोजी आदिवासी विकास अपर आयुक्त यांच्या अध्यक्षतेमध्ये होणार होती. परंतु, ती रद्द करण्यात आली असून आता ही बैठक १६ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालयात होणार आहे.

### शहरात विविध कारणांनी वृक्षतोड वाढली

**अमरावती**- स्वातंत्र्यपूर्व व त्यानंतरच्या काळात लावलेली झाडे रस्ते रुंदीकरणाच्या कामात तोडली गेली. त्यामुळे मुख्य मार्गाच्या कडेला जवळपास एकही झाड शिल्लक नाही. आता शहरातील गल्लोगल्ली जेथे अडसर ठरतील, अशी झाडे तोडण्याचा सपाटा खासगी व्यक्ती तसेच समुदायाने लावला आहे.

# महावितरणच्या ३१ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

## वीज बिल वसूलीसाठी धरले जबाबदार

**अमरावती/क्रा.प्र.**

वीजबिलाच्या वसूलीसाठी जबाबदार धरत नोव्हेंबर महिन्याची डिमांड वसूल करण्यातही अपयशी ठरणाऱ्या महावितरण अमरावती परिमंडळातील ५ अधिकारी यांच्यावर कारवाई करत त्यांच्या पगारातून एक तृतियांश रक्कम कपात करण्यात आली असून २६ क्षेत्रिय अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. जबाबदारीतील निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही असा सूचक इशारा देत वीजबिल वसूली आणि वीज सेवेला प्राधान्य देण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले.

शंभर टक्के वीज बिलाच्या वसूलीवरच महावितरणचे अस्तित्व आहे. वीज बिलाची अपेक्षीत वसूली होत नसल्याने ऑक्टोबर २०२५ अखेर अमरावती परिमंडळातील लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, पाणी पुरवठा योजना, पथदिवे आणि इतर वर्गवारीतील वीज ग्राहकाकडे एकुण ९०६ कोटी रूपये थकले होते. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ३६९ कोटी ७९ लाख आणि यवतमाळ जिल्ह्यातील ५३६ कोटी ५२ लाख रूपये थकीत बिलाचा समावेश आहे. परंतू नोव्हेंबर महिन्यात अमरावती ८९



कोटी ७६ लाख आणि यवतमाळ जिल्ह्यात ५५ कोटी ६९ लाख रूपयाच्या वीजबिलाची वसूली झाली. अद्याप ७५५ कोटी रूपयाच्या वीजबिलाची वसूली बाकी आहे. वीजबिल वसूलीबाबत महावितरणने आक्रमक पवित्रा घेत धडक कारवाईला सुरवात केली आ. यात थकबाकीदार वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्याचे सक्त निर्देश दिले आहे. शिवाय वीजबिल वसूलीबाबत हयगय करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावरही कारवाई करण्याच्या स्पष्ट सुचना मुख्य अभियंता यांनी दिल्या आहेत. महावितरणच्या प्रत्येक महिन्याच्या डिमांडपेक्षा वसूली अधिक झाली तरच एकुण थकबाकी कमी करणे शक्य आहे. नोव्हेंबर महिन्याची डिमांडच वसूल न झाल्याने कारवाई झालेल्या आणि कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये अमरावती जिल्ह्यातील ४ आणि यवतमाळ जिल्ह्यातील २७ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

## स्वराज गोधनकर यांनी 'युवा सेना एकनाथ चषक' जिंकला

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा युवा सेनेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत स्वराज गोधनकर यांनी यावर्षीचे विजेतेपद पटकावले. ७५ किलोपेक्षा जास्त वजन गटात भाग घेत त्यांनी असाधारण कामगिरी केली आणि यावर्षीचा 'युवा सेना एकनाथ चषक २०२५' जिंकला. महिला शरीरसौष्ठवपटू स्वाती गाडे या प्रसंगी विशेष पाहुण्या होत्या.

जिल्हा युवा सेनेच्या वतीने आणि माजी खासदार आणि शिवसेना नेते आनंदराव अडसूळ, युवा सेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक आणि शिवसेनेचे राष्ट्रीय सचिव आणि अभिजित अडसूळ, युवा सेनेचे लोकसभा अध्यक्ष प्रवीण दिघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली. शनिवारी, शेगाव नाका येथील अभियंता भवनात माजी आमदार दिवंगत संजय बंड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'युवा सेना एकनाथ कप २०२५' ही भव्य जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. शिवसेना शिंदे गटाच्या उपनेत्या आणि स्टार प्रचारक प्रीती बंड, विठ्ठल सरप पाटील, युवा सेना पश्चिम विदर्भ निरीक्षक



राहुल कराळे, माजी जिल्हाप्रमुख गोपाल अरबट, भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, रवींद्र गणोरकर, उपजिल्हाप्रमुख उमेश घुरडे, एसटी बँक संचालक धीरज तिवारी, वैद्यकीय मदत कक्षाच्या विदर्भ अध्यक्षा सोनाली देशमुख, स्वराज गोधनकर 'युवा सेना एकनाथ कप २०२५' चे विजेते होते. विविध वजन गटात, पोझर हंसराज हडाळे यांनी ६० किलो पर्यंत वजन गटात प्रथम, भावेश राज यांनी दुसरे, हेमंत उईके यांनी तिसरे, मोहम्मद अख्तर यांनी चौथे आणि वैभव बोरकर यांनी पाचवे स्थान पटकावले. ६५ किलो पर्यंत वजन गटात वैभव वाघमारे यांनी प्रथम, प्रवीण घोरमले यांनी दुसरे, मनीष महातो यांनी तिसरे, तोसिफ शाह यांनी चौथे आणि जहांगीर शाह यांनी पाचवे स्थान पटकावले. ७० किलो पर्यंत वजन गटात अजय इंगळे यांनी प्रथम, रमजान रैलीवाले यांनी दुसरे, जमीर उद्दीन यांनी तिसरे, हर्षल दाभाडे यांनी चौथे आणि आविश खान यांनी पाचवे स्थान पटकावले. त्याचप्रमाणे ७५ किलो पेक्षा जास्त वजन गटात स्वराज गोधनकर यांनी प्रथम, हंसराज हडाळे यांनी दुसरे, समीर चौधरी यांनी तिसरे, मोहम्मद फैजान यांनी चौथे आणि रुद्रेश बिसेटवार यांनी पाचवे स्थान पटकावले. बक्षीस वितरण समारंभाला शिवसेना सहसंपर्कप्रमुख श्याम देशमुख, युवासेना विस्तारक निलेश हेलोंडे पाटील, जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे, माजी जिल्हाप्रमुख व समन्वयक निशांत हरणे, धनंजय बंड, दिलीप ठाकरे, राहुल मातोडे आदी उपस्थित होते. विकास पांडे, सचिव संतोष कुकडे, जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे अध्यक्ष निर्मल सोनोने, नागेश डोंगरे, चेतन वानखडे, राजेश विजयकर, मो.नासीर, नीलेश सवाई, अल्ताफ जावेद, आनंद लुगिने, लोकनेते लंडन आणि लोकनेते लंडन यांनी केले.

## चांदूर रेल्वेत होमगाड वर्धापन दिन



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूर रेल्वे येथील होमगार्ड पथकाचा ६९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने चांदूर रेल्वे शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशाने व केंद्रनायक दीपक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

वर्धापन दिनानिमित्त होमगार्ड पथकाने साप्ताहिक परेड घेतली तसेच चांदूर रेल्वे शहरात पुरुष व महिला होमगार्ड सैनिकांची पायदळ रॅली काढण्यात आली. या रॅलीद्वारे होमगार्ड संघटनेच्या कार्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. यावेळी तालुका समादेशक अधिकारी चंद्रकांत पवार यांनी उपस्थित पुरुष व महिला होमगार्ड सैनिकांना मार्गदर्शन करत वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. रॅलीदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व चंद्रशेखर आझाद यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पथकातील सुभाष घोडेस्वार यांनी समारोप केला. तसेच सैनिक मुरायते, टेवरे, सोनवणे, तांडेकर, अग्रवाल, गोगटे, काळबांडे यांनी कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले.

## मालमत्ता कराद्वारे ८८.२८ लाख वसूल

**अमरावती** - महानगर पालिकेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष मालमत्ता कर वसुली शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या माध्यमातून शहरातील विविध प्रभाग समित्यांमधून एकूण ८८.२८ लाखांची मालमत्ता कर वसुली करण्यात आली.

यात प्रभागनिहाय झालेली वसुलीमध्ये प्रभाग समिती १ मध्ये १२.८० लाख, प्रभाग समिती २ मधून २६.८५ लाख, प्रभाग समिती ३ मध्ये २५.१० लाख, प्रभाग समिती ४ मध्ये ८.७५ लाख तर प्रभाग समिती ५ मधून १४.७९ लाख मालमत्ता कर वसुली करण्यात आली. येत्या काळात अशा प्रकारची कर वसुली शिबिरे सातत्याने आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे महसूल वाढीस चालना मिळत आहेत.

## स्व.शरद जोशी यांची पुण्यतिथी व शहीद दिन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अमरावती जिल्हा शेतकरी संघटनेच्या वतीने १३ डिसेंबर रोजी युगात्मा स्व. शरद जोशी यांची दहावी पुण्यतिथी तसेच हुतात्मा झालेल्या शेतकऱ्यांच्या स्मरणार्थ शहीद दिनाचा कार्यक्रम चांदूर रेल्वे तालुक्यातील शहीद स्मारक, नेकनानपुर येथे भावपूर्ण वातावरणात पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित बहाळे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार ॲड. वामनराव चटप तसेच हुतात्मा शहीद प्रकाश काळे यांच्या मातोश्री अनुसया काळे यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. शरद जोशी यांच्या जीवनकार्यावर विविध पैलूंनी प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज व्यक्त केली. शेतकरी हितासाठी त्यांनी दिलेल्या



लढ्याचा व विचारांचा उपस्थितांनी गौरव केला. कार्यक्रमात शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष राजाभाऊ पुसदेकर, युवा आघाडी अध्यक्ष सतीश दानी, जिल्हाध्यक्ष माधव गावंडे, विदर्भ राज्य महिला आघाडी अध्यक्ष रंजना मामर्डे, विदर्भ प्रमुख आर. पी. राजपूत, माजी जिल्हाध्यक्ष दिनकर निस्ताने, सतीश देशमुख, माया पाटील, स्मारक समिती अध्यक्ष शिवाजी चौधरी, राजाभाऊ आगरकर आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष दिनकर निस्ताने यांनी केले. सूत्रसंचालन धामणगाव तालुकाध्यक्ष दिवाकर राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन चांदूर रेल्वे तालुकाप्रमुख सुधाकर थेटे यांनी मानले. या कार्यक्रमास शेतकरी संघटनेचे नारायण सिरस्कार, अशोक बोबडे, वसंत सावंत, सुदाम सरोदे, दिलीप वानखडे, अशोक देशमुख, अशोक वानखडे, स्वप्निल वाकोडे, सागर गावंडे, शुभम काळे, रामेश्वर काळे, पुरुषोत्तम मारोटकर, धनराज मोहोड, जीवन पचगाडे, अरुण लोखंडे, रणजीत राऊत, विनोद कडू, बाबाराव जाधव, अशोक हांडे, सुशील कचवे, धनराज गोटे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## हिवरा बुद्रुक शाळेच्या मैदानात बीट स्तरीय क्रीडा महोत्सव

**लोणी टाकळी/वार्ताहर**

लोणी टाकळी परिक्षेत्रातील बीट स्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सव जिल्हापरिषदशाळा हिवराबुच्या भव्य मैदानामध्ये उत्साहात पार पडला. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटनिय कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शिक्षण विस्तार अधिकारी वैशाली महाजन यांनी तर उद्घाटक म्हणून हिवरा ग्रामपंचायतच्या सरपंच मीना सोळंके यांनी भूषविले होते. बक्षीस वितरक म्हणून माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गुल्हाने उपस्थित होते.

लोणी टाकळी परिक्षेत्रातील लोणी टाकळी, जमुना आणि धानोरा फसी या तीन केंद्रातील विद्यार्थ्यांनी या क्रीडा महोत्सवामध्ये सहभाग घेतला. दोन दिवसीय ता या महोत्सवात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. हिवरा बू गावामध्ये ३५ वर्षांनंतर क्रीडा महोत्सव होत असल्याने सरपंच, उपरसपंच, ग्रामपंचायत चे पूर्ण पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे पूर्णपदाधिकारी, आणि गावातील नागरिकांनी मोलाची साथ देत हा कार्यक्रम यशस्वी करून दाखविला. स्व. विठ्ठलराव तुळशीराम गुल्हाने आणि स्वर्गीय विनाताई विठ्ठलराव गुल्हाने त्यांच्या स्मृतीपित्यर्थ कार्यक्रमाचे बक्षीस वितरक प्रवीण गुल्हाने, मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय हिवरा बुद्रुक यांच्या हस्ते विजयी, उपविजयी चमूला स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. निदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये हिवरा यू. शाळेची चमू प्रथम क्रमांकाचे मानकरी तर दाभाशाळेची चमू द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले. बीट स्तरावर स्व. लक्ष्मीबाई भगवान डिघोळेयांच्या स्मृती पिक्संविष्णूडि घोळे त्यांच्याकडून चॅम्पियन शील्ड ठेवण्यात आले होते. प्राथमिक विभाग चॅम्पियनशिप दाभा शाळेने माध्यमिक विभाग चॅम्पियनशिप वर जळू शाळेने तर जनरल चॅम्पियनशिप वर पुन्हा एकदा हिवरा बुद्रुकच्या शाळेने नाव कोरले. श्रीमती ब्राह्मणे, प्राचार्य अभिनव विद्यालय जमुना, डाफे, मुख्याध्यापिका, अशोक विद्यालय लोणी टाकळी, सयाम, मुख्याध्यापिका सुखदेवराव पाटील विद्यालय वडूरा यांनी निदर्शने व सांस्कृतिक कार्यक्रमाचे परीक्षण केले. मीना सोळके, मयूर मेश्राम उपसरपंच, प्रवीण मोखळे, राजकुमार मेश्राम, प्रफुल मोखळे, प्रकाश सोळके, सुशील थोरात, शंकरराव चव्हाण, संतोष चव्हाण, महेंद्र बोरकर, बाळूभाऊ ढवळे, विलास सोळंके, मिथुन चव्हाण, वर्षा चव्हाण, मोनिका साखरकर, लता मेश्राम, अश्विनी ओगले, विशाखा ओगले, प्रतीक मेश्राम, साहिल खडसे, समीर मेश्राम, अभय सोळंके, वैभय बनसोड, समीर नितनवरे, शोहेब शेख, प्रसिद्ध वानखेडे, प्रेम चव्हाण तसेच शाळेचे मुख्याध्यापक अनंत राठोड, आणि शिक्षक सुरज वाघमारे, प्रतिभा पवार, सरोज रघुवंशी, भाग्यश्री पानसरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रतिभा पवार, अलका वर्षे यांनी तर आभार प्रदर्शन अनंत राठोड यांनी केले.

## लोणी टाकळी येथे जागतिक दिव्यांग दिन समता सप्ताह

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त समता सप्ताह अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा लोणी टाकळी येथे लुईस ब्रेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून समता सप्ताह अंतर्गत जाणीव जागृती, विविध स्पर्धा आनंददायी खेळाचे आयोजन व दिव्यांग विद्यार्थी-पालक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. वर्गामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या वर्गशिक्षकांचा ही विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रसंगी समुह साधन केंद्र प्रमुख पं.स. नांदगाव खंडेश्वर येथील, जिल्हा परिषद प्राथ मराठी शाळा मुख्याध्यापक देविचंद, अलका वर्धे, प्रणिता




बोडखे, सुजाता तेलगोटे, राजेश्री भडांगे तसेच जिल्हा परिषद प्रा उर्दु शाळा लोणी टाकळी येथील मुख्याध्यापक अब्दुल फहीम अब्दुल गफार, रजिया परवीन उपस्थित होत्या. तसेच केंद्रातील केंद्रास्तरीय विशेष शिक्षक गोपाल ढवळी, निरंजन नांदुरकर, संदीप गुल्हाने, प्रवीण ठाकरे, गजानन उल्हे, अजय गावंडे तसेच केंद्रस्तरीय विशेष शिक्षिका नीलिमा रंगारी, चारुशीला लिंगोट, शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, दिव्यांग विद्यार्थी पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष देवीचंद राठोड यांनी दिव्यांग दिव्यांगांच्या क्षमता आणि समस्यांबद्दल समाजात अधिक संवेदनशीलता निर्माण करणे, त्यांना समाजात समान संधी आणि समान वागणूक मिळावी यावर भर देणे,शिक्षण, नोकरी, सार्वजनिक ठिकाणे आणि इतर क्षेत्रांमध्ये त्यांचा समावेश वाढवणे, त्यांच्या संवैधानिक आणि कायदेशीर हक्कांबद्दल माहिती देणे विषयी विचार व्यक्त केले. जागतिक दिव्यांग दिन समता सप्ताह'म्हणजे दिव्यांगांना सन्मान,समान हक्क आणि समाजात योग्य स्थान मिळवून देण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करणे होय असे विचार केंद्रस्तरीय विशेष शिक्षकांनी मांडले,आपल्या उर्वरित क्षमतांच्या जोरावर यश संपादन करण्यास विदयार्थ्यांना प्रोत्साहित केले. तसेच समता सप्ताह अंतर्गत यूडीआयडी कार्ड ई- केव्हायसी व नवीन नोंदणी करण्यासाठी कॅम्प तसेच न्यूरोथेरपी शिबिर, अलिमको कॅम्प, शस्त्रक्रिया शिबीर विषयी माहिती देऊन त्याचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलिमा रंगारी (वि.शि.) व आभार प्रदर्शन चारुशीला लिंगोट यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आभार मानले.

## होमगार्ड वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण



**मोर्शी/वार्ताहर**

मोर्शी येथे होमगार्ड पथकातर्फे ७९ वा होमगार्ड वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. होमगार्ड वर्धापन दिनानिमित्त मोर्शी पथकामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांचे आदेशाने व केंद्रनायक दिपक राजपुत यांचे मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मोर्शी पथकामध्ये साप्ताहिक परेड घेऊन. संपूर्ण परिसर स्वच्छता करण्यात आले त्यानंतर वृक्षारोपण करण्यात आले. पी एस आय पवार साहेब, ए एस आय गुल्हाने साहेब यांनी रॅलीला हिरवी झंडी

दाखवून मोर्शी शहरात पायदळ रॅली काढण्यात आली. होमगार्ड सैनिकांनी कोरोना काळात कर्तव्य करून शासनाला मोलाचे सहकार्य केले. होमगार्डच्या कार्याची प्रशंसा करत सर्व मान्यवरांनी होमगार्ड सेवा ही पोलिसांचे सच्चे साथीदार असल्याचे तालुका समदेशक मनोज कटोलकर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. त्यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात होमगार्ड सैनिकांच्या कर्तव्याचे कौतुकास्पद केले.

# मानव विकासाची सांगड घालून शाश्वत विकासाला बळकटी- आ.संजय खोडके

## संत कंवरराम, साई नगर, गडगडेश्वर प्रभागातील विविध पायाभूत सुविधांच्या कामांचा शुभारंभ

**अमरावती/का.प्र.**

विकासाच्या संकल्पनेत पायाभूत सुविधा जितक्या महत्वाच्या आहेत, तितकाच आरोग्य ,शिक्षण , उद्योग , क्रीडा सारख्या सुविधा निर्माण करून तसेच नागरिकांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देऊन मानवविकास साधणे सुद्धा महत्वाचे आहे. आपल्या प्रभागाचा विकास अबाधित राखण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहून साथ द्या, आम्ही महापालिका क्षेत्रात विकासासाठी कुठलाही निधी कमी पडू देणार नाही, असे आवाहन महाराष्ट्र विधान परिषद सदस्य संजय खोडके यांनी केले आहे.

१५ डिसेंबर २०२५ रोजी अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक- १७ गडगडेश्वर, प्रभाग क्रमांक - १८ राजापेठ- संत कंवरराम, प्रभाग क्रमांक -१९ साईनगर -अकोली मध्ये स्थानिक विकास निधी २०२५-२०२६ अंतर्गत विविध पायाभूत सुविधांच्या विकासकामांचे भूमीपूजन आ. संजय खोडके यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामुळे आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून नेहमीच प्रशासनासोबत संवाद व समन्वय निर्माण करून अमरावती शहर



हे स्वच्छ,सुंदर,हरित व विकसित बनविण्यासाठी आमचा पूर्णपणे सहभाग दिला.

शहरात विकासाचे नियोजन करत असतांना अमरावती महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक- १७ गडगडेश्वर, प्रभाग क्रमांक - १८ राजापेठ- संत कंवरराम, प्रभाग क्रमांक- १९ साईनगर -अकोली येथे सुद्धा विकासाचे पर्व नांदण्याकरिता एक कृती कार्यक्रम सुद्धा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचा विश्वास आ.संजय खोडके यांनी व्यक्त केला.गेल्या प्रदीर्घ काळापासून विकासापासून वंचित असलेल्या या भागात रस्ते बांधकाम, नाली बांधकाम, पेव्हिंग ब्लॉक, खुल्या मैदानांना चेनलिंग फेन्सिंग, वॉकिंग ट्रॅक, सौंदर्यीकरण अशी विविध विकासकामे मार्गी लागावी व पायाभूत सुविधांच्या पूर्ततेतून स्थानिक नागरिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी आ. संजय खोडके यांनी निधी उपलब्ध करून दिल्याबद्धल स्थानिक प्रभागवासीयांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी माजी महापौर- रीना नंदा, माजी नगरसेवक लकी नंदा, प्रा.डॉ.- अजय बोन्डे,सरोज चिखलकर, आशिष कपले, ॲड. प्रणाक्षी झाम्बानी, अभिषेक हजारे, कर्नलसिंह राहल, मयूर झाम्बानी, दादाराव कलाने, शक्ती तिडके, पप्पू खत्री, बाबूशेठ मतानी, बाबूशेठ खत्री, मनीष करावा, अशोक हजारे, दिलीप विधळे, अतुल कडू, आदींसह कंवर नगर,पटेल नगर , सिद्धीविनायक कॉलनी, साने गुरुजी नगर, परमहंस कॉलनी,गडगडेश्वर, व्यास लेआऊट, कृष्णार्पण कॉलनी घनश्याम नगर, खंडेलवाल नगर, चिंतामणी गणेश मंदिर ड्रीम पार्क आदी भागातील नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

# भाजी बाजारात प्रॉपर्टी ब्रोकरची हत्या



## अज्ञात हल्लेखोरांचा पोलीसांकडून शोध सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील भाजी बजार परिसरात एका प्रॉपर्टी ब्रोकरची पाठलाग करून हत्या करण्यात आल्याची घटना सोमवार १५ डिसेंबरच्या रात्री ९ वाजताच्या सुमारास उघडकीस आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस अज्ञात हल्लेखोरांचा शोध घेत आहेत. पवन पंजाबराव वानखडे (वय ४५,रा.खडकाडीपुरा,अमरावती) असे मृतकाचे नाव आहे. माहितीनुसार पवन वानखडे प्रॉपर्टी ब्रोकर होता. त्याच्या विरुद्ध खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात काही गुन्हे दाखल आहे. एक महिन्यापूर्वीच तो प्राणघातक हल्ला प्रकरणात जामीनवर कारागृहाच्या बाहेर आला होता. सोमवारी रात्री पवन काही कामासाठी भाजी बाजार चौकात आला असता त्यावेळी ३ ते ४ आरोपी त्याचा पाठलाग करत होते. पवन वानखडे भाजी बाजार परिसरात थांबला होता. दरम्यान (पान २ वर)




### ■ समर्थकांची परिसरात दगडफेक

पवन वानखडे याच्या हत्येची माहिती मिळताच भाजीबजार परिसरात तणावची स्थिती निर्माण झाली होती. पवनच्या समर्थकांनी भाजी बाजार परिसरात दगडफेक करून परिसरातील दुकाने बंद करायला लावली. एका दुकानावर नारळ फेकण्यात आले. पोलिसांनी बलप्रयोग करून समर्थकांना तेथून पळविले. प्रकरणाचे गांभीर्य पाहून पोलीस उपायुक्त श्याम घुगे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसराचे निरीक्षण केले आणि आवश्यक दिशा निर्देश अधिकारी कर्मचाऱ्यांना दिले.

# मनपा आचारसंहिता लागू होताच प्रशासन सतर्क

## १५ जानेवारीला मतदान व १६ ला मतमोजणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** निवडणूक आयोगाने महानगरपालिका निवडणुकीची सोमवारी सायंकाळी घोषणा करून तत्काळ प्रभावाने आचारसंहिता लागू केली. आचार संहिता लागू होताच मनपा प्रशासन मध्ये लगीनघाई सुरू झाली. प्रशासन लगबग करताना दिसून पडले. नागपूर अधिवेशन संपताच महानगरपालिका निवडणुका घोषित होण्याचे संकेत सत्ताधारी नेत्यांनी दिले होते. रविवारी नागपूर अधिवेशन आटोपताच सोमवारी सायंकाळी निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला. १५ जानेवारी २०२६ ला मतदान व १६ जानेवारीला मतमोजणी होऊन निकाल घोषित केले जातील. त्यापूर्वीच अमरावती महापालिकेने जवळपास २३० कामाचे वर्क ऑर्डर कंत्राटदारांना वाटले.जिल्हा नियोजन समिती, दलित वस्ती आणि मनपा मधील कोट्यावधीच्या कामाची निविदा प्रक्रिया तडका फडकी आटपून वर्क ऑर्डर काढण्यात आल्या. त्याच प्रमाणे आचार संहिता लागू होताच अमरावती शहरातील राजकीय पोस्टर बॅनर हटवण्याचे कारवाईस देखील सुरू झाली. आता आचारसंहितेमध्ये कुठल्याच राजकीय घोषणा किंवा मतदारांना आमीष देण्याचे काम होणार नाही. आमदार रवी राणा यांनी देखील तडका फडकि ने गोपाल नगर अंडरपासचे लोकार्पण उरकले. विशेष म्हणजे रेल्वेने ४५ करोड चे काम केले आहे. अद्यापही महानगरपालिकेच्या हिश्यातील पाच करोड (पान २ वर)



**महापालिका निवडणूकः**

# अतिवृष्टी मदतीचा निधी रखडला, शेतकरी संतप्त

## शेकडो शेतकऱ्यांची तहसील कार्यालयावर धडक



**चांदूरबाजार/प्रतिनिधीः** २०२५ मधील अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान , यासाठी शासनाने आर्थिक सहाय्य म्हणून शेतकऱ्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र अद्यापही अनेक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर, ही मदत जमा झाली नाही.तालुक्यात अतिवृष्टीचा मदत निधी वाटप मागिल काही दिवसांपासून रखडलेला आहे.त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर आज लोकविका संघटनेचे नेतृत्वात, तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी एकत्र येत तहसील कार्यालावर धडकले.
यावेळी (पान २ वर)

### ■ प्रशासनाला इशारा

तातडीने मंजूर अतिवृष्टीचा निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावा, अन्यथा येत्या आठ दिवसांत उग्र आंदोलन छेडण्यात येईल व शासन-प्रशासनाचा जाहीर निषेध करण्यात येईल असे लोकविकास संघटनेचे संस्थापक गोपाल भालेराव यांनी, प्रशासनासह शासनालाही लेखी निवेदनातून इशारा दिला आहे.

# वखार महामंडळाच्या कार्यालयासमोर 'वंचित'चे ठिय्या आंदोलन

## कमिशनखोरी बंद करून कामगारांना पूर्ववत करण्याची मागणी

**तिवसा/प्रतिनिधीः-** राज्य वखार महामंडळ तिवसा येथे अनेक वर्षापासून कामावर असलेल्या कामगारांना कुठलेही कारण नसताना अचानक कामावरून काढल्याच्या बाबीची वंचित बहुजन आघाडीने गंभीर दखल घेत कामगार, हमाल यांचे समवेत वखार महामंडळाच्या कार्यालयासमोर आज तीव्र ठिय्या आंदोलन केले. दिवसभर चाललेल्या ठिय्या आंदोलनाला अखेरीस यश मिळाले.



गेल्या १० वर्षापेक्षा अधिक काळापासून वखार महामंडळ तिवसा येथे काम करणाऱ्या कामगार व हमालांना डावलून ऐनवेळी बाहेरच्या कामगारांना कामावर रुजू केल्याने १० वर्षांपासून काम करणाऱ्या कामगारांनी तीव्र संताप व्यक्त केला होता. हमालीच्या दर कट्टयामागे २ रुपये कमिशन अधिकारी (पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणूकः

## प्रभाग १२ मध्ये अपक्ष उमेदवाराचा बोलबाला

### सामाजिक कार्यकर्ते मनिष तव्वर यांना मतदारांची पसंती



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १२ मधून अपक्ष उमेदवार म्हणून सामाजिक कार्यकर्ते मनिष तव्वर यांना पसंती दिसत आहे.

सामाजिक कार्यात सक्रिय आणि प्रभागातील नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवणाऱ्या मनिष तव्वर यांनी यापूर्वी विविध स्थानिक प्रश्नांवर पुढाकार घेतल्याचे मानले जाते. त्यांच्या उमेदवारीनंतर प्रभागातील स्थानिक राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

मनिष तव्वर हे अपक्ष उमेदवार असून त्यांना बोधचिन्ह म्हणून ' निशाणी बॅट मिळाली आहे.'या निवडणूकीत प्रचारात या चिन्हाभोवती प्रभाग क्रमांक १२ मध्ये बटन क्रमांक तीन वर रणनीती अधिक गती घेण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

प्रभागातील पायाभूत सुविधांचा विकास, नागरिकांच्या मूलभूत सुविधा व स्थानिक प्रश्नांवर उपाययोजना या प्रमुख मुद्यांवर येणाऱ्या दिवसांत चर्चा रंगतील, अशी अपेक्षा आहे. अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसतसे प्रभाग १२ मधील राजकीय वातावरण अधिक उत्सुकता निर्माण करत असल्याचे चित्र आहे.

सामाजिक कार्यकर्ते मनिष (पान २ वर)

# वेलकम पॉइंटवर ट्रॅफिक पोलिसांचा फिक्स पॉईंट

## शिवसेना नेते जगदीश गुप्ता यांच्या प्रयत्नांना यश

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर मार्गावर वेलकम पॉइंट ,पॉवर हाऊस येथे अस्वच्छतेमुळे खाजगी बसच्या प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. या परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. शिवसेना नेते व माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांनी तत्काळ याची विस्तृत तक्रार तत्कालीन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांना केली होती. त्या तक्रारीची दखल घेत पोलीस आयुक्तांनी वेलकम पॉइंट परिसरात ट्राफिक पोलिसाची फिक्स ड्युटी लावली आहे. यामुळे जगदीश गुप्ता यांनी केलेल्या प्रयत्नांना यश मिळाले.

शिवसेना नेते जगदीश गुप्ता यांनी आपल्या तक्रारीमध्ये प्रवाशांना होणारी अडचण मांडली होती. विशेष करून महिला प्रवाशांना फारच त्रास होत होता. रात्री अपरात्री दूर गावावरून येणाऱ्या खाजगी बसेस मधील प्रवाशांना भीती वाटत होती. अस्तव्यस्त ट्रॅफिकमुळे ही कुचंबना होत होती. (पान २ वर)

# गंगोत्री सोसायटीवासी धडकले जिल्हाधिकारी कार्यालयावर

## जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** गणराज सोसायटी व गंगोपी कॉलनीमधील नागरिकांनी जाण्यायेण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी आज सोमवारी १५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मौजे कटोरा बू. ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या सर्वे नंबर ६६/१/अ,१(ब),१(क) मधील चांडक लेआउट च्या कंपाउंडमुळे गंगोपी कॉलनी तसेच गणराज सोसायटी मधील नागरिकांना जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे त्यांना मोठी अडचण येत आहे. कंपाउंड (पान २ वर)

# चाकू घेऊन दहशत पसरविणारा ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** चाकू घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडून लोखंडी चाकू जप्त करण्यात आला आहे. युवराज उर्फ अजय विजय कुरवाने (वय २५,चिंचफैल) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहिती मिळाली की, आरोपी युवराज उर्फ जय विजय कुरवाने हातात लोखंडी चाकू घेऊन चिंचफैल परिसरात फिरत आहे. या वरून पथकाने तिथे जाऊन त्याला चाकू सह ताब्यात घेतले. ४/२५ आर्म ॲक्ट,सहकलम १३५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ ,सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पथकाने केली.

# सेवानिवृत्त रेल्वे अधीक्षकाला २१.६५ लाखांनी गंडविले

## सायबर ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** रेल्वे विभागातील सेवानिवृत्त अधीक्षकाला शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यावर जास्त नफ्याचे आमिष देऊन २१ लाख ६५ हजारांने गंडविण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात विवेक तुलसीराम बनसोड (वय ६१,भीम ज्योती कॉलनी, साईनगर ) यांच्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहिती नुसार विवेक बनसोड यांना ११ नोव्हेंबर रोजी शेअर मार्केटच्या सुप्रसिद्ध कंपनीचा लोगो वापरून जास्त पैसे गुंतवल्यावर नफ्याचे आमिष देण्यात आले. आरोपीने बनसोड यांना फोन करून त्यांना आपल्या जाळ्यात ओढले आणि पैसे गुंतवल्यावर जास्त नफा देण्याचे आश्वासन दिले. यामुळे बनसोड त्यांच्या जाळ्यात अडकले आणि त्यांनी २१ लाख ६५ हजार रुपये वेळोवेळी दिले.आरोपींनी पैसे गुंतवल्या (पान २ वर)

# बस चालकावर हल्ला महागात; दोघांना कारावास व दंड

## वरुड येथील न्यायालयाचा निर्णय

**अमरावती/प्रतिनिधीः-** सार्वजनिक सेवकावर हल्ला करून शासकीय कामात अडथळा आणणा-या दोघांना न्यायालयाने कठोर शिक्षा ठोठावली आहे. एसटी बस चालकास रस्त्यात अडवून शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी जिल्हा न्यायालय (क्र. ०१) व अतिरिक्त सत्र न्यायालय, वरूड यांनी दोन आरोपींना दोषी ठरवित सहा महिन्याच्या कारावासासह दंडाची शिक्षा सुनावली. हा निकाल



मंगळवार (दि. १५ डिसेंबर २०२५) रोजी देण्यात आला. नंदू शंकरराव वानखडे आणि गोकुल विठ्ठलराव मेघरासे (दोघेही वय ३५, रा. राजुरवाडी, रिद्धपूर) अशी दोषी ठरविण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. विधी सुत्रानुसार, (पान २ वर)

# भरधाव कारने शेतकऱ्याला चिरडले

## तिवसा येथील वणी फाट्यानजीकची घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** भरधाव कारने महामार्ग ओलांडून जातं असलेल्या एका ५४ वर्षीय शेतकऱ्याला चिरडले. ही घटना आज (ता.१५) रात्री सात वाजता दरम्यान नागपूर -अमरावती महामार्गावरील वणी फाट्यावर घडली.या अपघातात शेतकऱ्याचा जागी मृत्यू झाला असून प्रदीप लक्ष्मणराव मकेश्वर रा. तिवसा असे अपघातात मृत पावलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.एमएच ३२एएस ७८८४ क्रमांकाची येक्सव्ही कार ही नागपूरवरून अमरावतीच्या दिशेने जातं होती. याच दरम्यान आपल्या शेतातून पायदळ महामार्ग ओलांडून जातं असताना भरधाव कारने जबरदस्त धडक दिल्याने शेतकरी प्रदीप मकेश्वर यांच्या डोक्याला व छातीला गंभीर मार लागला आणि यातच त्यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी मृतदेह उत्तरिय तपासणीकरिता तिवसा उपजिल्हा रुग्णालयात ठेवला. कारमालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

# अकोटमध्ये उद्योगाच्या नावाखाली शासनाची लूट?

## -नगररचना,तहसील,उद्योग खात्यातील संगनमताचा गंभीर आरोप

**भाग १**

**अकोट/प्रतिनिधीः-** अकोट तालुक्यात उद्योग उभारणीच्या नावाखाली शासनाची फसवणूक करून कोट्यवधी रुपयांची सबसिडी लाटली जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या प्रकरणात नगररचना विभाग, तहसील कार्यालय व उद्योग विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशय व्यक्त केला जात आहे.

अकोट तालुक्यातील मौजे बाळेगाव येथील एका शेतजमिनीवर कृषी प्रक्रिया उद्योगाच्या नावाखाली बांधकामासाठी नगररचना विभागाच्या GRAS प्रणालीद्वारे विकास शुल्क भरणा करण्यात आल्याचे चौकशीत समोर आले आहे. संबंधित भरणा नियमबाह्य पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप असून, त्याच आधारे तहसील कार्यालयाकडून बांधकाम परवानगी देण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे.

या प्रकरणात नगररचना विभागाची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर विभागाकडून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याचे तसेच संबंधित बांधकाम परवानगी रद्द करण्याचे लेखी निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, निर्देश देऊनही दीर्घ कालावधी उलटून गेला तरी प्रत्यक्ष कारवाई झालेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

याच प्रकरणात संबंधित शेतजमीन प्रथम अकृषक करण्यात आली आणि नंतर उद्योगाचा नेमका वापर नमूद न करता 'औद्योगिक व वाणिज्यिक' असा अस्पष्ट उल्लेख करून परस्पर विकास शुल्क भरत बांधकाम परवानग्या मिळवण्यात आल्याचा आरोप आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांनी फौजदारी कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले असतानाही कारवाई पुढे सरकलेली नाही.

या जमिनीवर अनेक उद्योग उभारण्यात आल्याचा दावा असून, त्यासाठी शासनाच्या विविध योजनांतर्गत सबसिडी मिळवण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र व संबंधित विभागांकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. नियमबाह्य परवानग्यांच्या आधारे उभारलेले उद्योग आणि त्यावर मागितलेली सबसिडी म्हणजे थेट शासनाच्या तिजोरीवर घाला असल्याची चर्चा अकोट तालुक्यात सुरू आहे.

अकोट तालुक्यात अशा प्रकारचे आणखीही प्रकरणे असल्याचा आरोप असून, काही विशिष्ट घटकांनी प्रशासनातील काही अधिकाऱ्यांशी संगनमत करून (पान २ वर)

# जलतरणपटू राम गोतमारेला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कास्यपदक

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरणपटूंनी नेत्रदीपक कामगिरी करत अमरावतीचे नाव उज्वल केले. राम गोतमारे याला पॅरा एशियन ऐज ग्रुप २०२५, दुबई येथे कास्यपदक प्राप्त झाले. तो आपला जलतरणाचा नियमित सराव श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्विमिंग पूलावर करतो. त्याला श्री ह.व्या. मंडळात सर्व सोयी सुविधा व प्रशिक्षण मोफत दिल्या जाते.



या यशाचे श्रेय त्याने श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, अमरावती जलतरण संघटनेचे अध्यक्ष वसंतराव हरणे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, प्रशिक्षक प्रा. डॉ. योगेश निर्मळ, तसेच मयूर कुमार व वैभवी थेटे यांना दिले आहे.या घवघवीत यशाबद्दल मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, उपाध्यक्ष डॉ श्रीकांत चेंडके डॉ. विकास कोळेश्वर, कोषाध्यक्ष डॉ.श्रीनिवास देशपांडे आणि इतर सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व मंडळातील खेळाडूंनी जलतरणपटूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.